**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेली पहिली अर्धा तास चर्चा मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे नंतर घेण्यात येईल. आता सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांची अर्धा तास चर्चा घेण्यात येईल. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये 13 अर्धा तास चर्चा दाखविण्यात आल्या आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी मुद्देसूदपणे आपले विचार मांडावेत.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी दोन ते तीन मिनिटेच अर्धा तास चर्चेवर माझे विचार मांडणार आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. या अधिवेशनात एकही अर्धा तास चर्चा झालेली नसल्यामुळे त्या आज घेतलेल्या आहेत. त्यामुळे सगळ्यांना न्याय मिळेल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आज जवळ जवळ 13 ते 14 अर्ध्या तासाच्या चर्चा आहेत. त्या दोन तासात घ्यावयाच्या असल्याने मूळ हेतूला बगल दिल्यासारखे होत आहे.

**तालिका सभापती** : अर्धा तास चर्चा होणारच नव्हत्या. पण त्या घेतलेल्या आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आम्ही आपले आभारी आहोत.

**तालिका सभापती** : आपणा सर्वांना माननीय सभापती महोदयांनी न्याय दिलेला आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये अर्धा तास चर्चा दाखविण्यात आल्या आहेत. कालच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेली माझी अर्धा तास चर्चा आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेली नाही.

**तालिका सभापती** : अर्धा तास चर्चेची निवड माननीय सभापती महोदयांनी केली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कोणत्या सन्माननीय सदस्यांची अर्ध्या तासांची चर्चा घ्यायची हे कोण ठरवणार ? गेल्या चार अधिवेशनात आम्ही दिलेल्या अर्धा तास चर्चा चर्चेला येत नाहीत. सचिव आपणाला मार्गदर्शन करताना सांगतात की, कोणत्या चर्चा घ्यायच्या हे माननीय सभापतींनी ठरविले आहे. तेव्हा यासंबंधातील नियम काय आहेत ते आम्हाला कळले पाहिजेत. कोणत्या सन्माननीय सदस्यांच्या कुठल्या अर्धा तास घ्यायच्या हे कोण ठरविणार आहे ? जो प्रश्न मिटला आहे अशा लॅप्स झालेल्या अर्ध्या तासाच्या चर्चा देखील आपण चर्चेला घेत आहात.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

ज्या दोन वर्षापूर्वी अर्धा तास चर्चा मांडलेल्या होत्या त्या देखील कार्यक्रमपत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या आहेत. कोणत्या अर्धा तास चर्चा घ्यायच्या यासंबंधी आपण सन्माननीय सदस्यांशी चर्चा करणार आहात की नाही ? समजा एखाद्या शेतकऱ्याला जमीन मिळाली असेल तर त्यासंबंधातील अर्धा तासाच्या चर्चेची आवश्यकता नाही. कशा प्रकारे आपले कामकाज चालले आहे. आपण कशाही प्रकारे कामकाज करीत आहात. रात्री 8.30 वाजेपर्यंत कामकाज करीत आहात. हे काय चालले आहे? आपण मेहरबानी असे म्हटलेले आहे. माझे असे मत आहे की, ही मेहरबानी नाही. सभापती महोदय, आमच्यावर मेहरबानी करीत नाही हे मी सन्मानपूर्वक बोलत आहे. सभागृहाचे कामकाज हे नियमाप्रमाणे चालले पाहिजे. त्याची जाणीव आपण सचिवांना करून द्यावी. सचिव अदृश्य असले तरी ते आपल्याला मार्गदर्शन करताना जे काही बोलतात ते आम्हाला ऐकू येते. या सर्व बाबींवर आमचा आक्षेप आहे हे मी माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो. यात आम्हाला संसदीय कार्य मंत्र्यांकडून न्याय हवा आहे. हे काय चालले आहे. असे जर असेल तर मग आम्ही हाऊस मध्ये बसणार नाही. सभापती महोदय, आपण देखील आम्हाला सन्मानपूर्वक सांगितले पाहिजे की, आज अशा प्रकारचे कामकाज आहे. गेली दोन वर्षे अर्धा तास चर्चाच होत नाहीत. बिले देखील झालेली नाहीत. काहीच कामकाज झालेले नाही. मी सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांचे कालच्या कामकाजाकडे लक्ष वेधू इच्छितो. चार दिवसांचे कामकाज एकाच दिवशी दाखविले जाते आणि बिले कधीही मागे पुढे चर्चेसाठी घेण्यात येतात. हे योग्य नाही. तेव्हा या सभागृहात काय चालले आहे ?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचा मुद्दा माझ्या लक्षात आला आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, आमच्या अर्ध्या तासाच्या चर्चा या यापूर्वीच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आल्या होत्या. त्यापैकी फक्त तीनच अर्धा तास चर्चा आपण घेणार आहात. त्यासाठी पाच मिनिटांचा अवधी दिला तरी चालेल. अर्धा तास चर्चा उपस्थित करताना वेळेचे बंधन असते. या चर्चेसाठी अर्धा तास वेळ दिलेला आहे म्हणून त्याला अर्धा तास चर्चा असे नाव देण्यात आले आहे. आमच्या अर्ध्या तासाच्या चर्चा लॅप्स करून टाकणार असाल तर.....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आपली अर्धा तास चर्चा लॅप्स करण्यात आलेली नाही.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, आम्ही लोकांचे प्रश्न येथे मांडत असताना कष्ट घेतो. त्याकरिता आम्हाला त्यांचे 10 वेळा उंबरे झिझवावे लागतात. तेव्हा या सगळ्या गोष्टी होतात. तेव्हा अर्ध्या तासाच्या चर्चा होणार नव्हत्या असे आम्हाला कोणी सांगू नये.

**तालिका सभापती** : हा आपल्या अर्धा तास चर्चेचा विषय आहे काय ?

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, याची आपण दखल घ्यावी. माननीय संसदीय कार्यमंत्री देखील येथे उपस्थित आहेत. त्यांनी याची गंभीर दखल घ्यावी.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, याची नोंद घेण्यात आली आहे.

**तालिका सभापती** : आपल्या सूचनेची गंभीर दखल घेण्यात आली आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नाशिक विभागातील कृषी खात्यात कृषी सेवक व लिपिक या पदाची बेकायदा करण्यात आलेली भरती

**मु. शी.** : नाशिक विभागातील कृषी खात्यात कृषी सेवक व लिपिक या पदाची बेकायदा करण्यात आलेली भरती या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 49369 ला दिनांक 3 जून 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, नाशिक विभागातील कृषी खात्यात कृषी सेवक व लिपिक या पदाची बेकायदा करण्यात आलेली भरती या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 49369 ला दिनांक 3 जून 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मी पाच मिनिटांमध्ये अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे. नाशिक विभागातील कृषी खात्यात कृषी सेवक व लिपिक या पदाची बेकायदा भरती करण्यात आलेली आहे. सदरहू भरतीमध्ये अनियमितता झाली आहे काय, असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी विचारला असता त्यास अनियमितता झाली असल्याचे उत्तर शासनातर्फे देण्यात आले होते. मला येथे सन्माननीय श्री.आर.आर.पाटील यांचे कौतुक करावेसे वाटते. त्यांनी पोलीस भरतीमध्ये पारदर्शकता आणली. पूर्वी पोलीस भरतीवर खूप मोठे आक्षेप येत असत. त्यामुळे त्यांनी पोलीस भरतीमध्ये पारदर्शकता आणली. त्या जागेवर योग्य उमेदवार मिळाला तर शासनाला देखील एक चांगला कर्मचारी तेथे मिळतो. येथे अनियमितता झाल्याचे शासनाने मान्य केले आहे. तेव्हा या अनियमिततेची चौकशी झाली आहे काय, ही अनियमितता कोणाकडून झाली हे आढळून आले आहे काय, याबाबतची जबाबदारी कोणावर निश्चित करण्यात आली आहे व जबाबदारी निश्चित करून संबंधितांवर कारवाई करण्यात आली आहे काय ?

..5

श्री.एकनाथराव खडसे (कृषी मंत्री) : सभापती महोदय, येथे जी नोकर भरती झाली त्यासंबंधात सरकारकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या म्हणून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे चौकशी देण्यात आली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि शासन यांच्या माध्यमातून चौकशी करीत असताना मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली हे शासनाच्या लक्षात आले. या भरतीसंबंधात जाहिरात न काढणे, मुलाखती न घेणे, रोस्टर न पाळणे, अशा प्रकारच्या अनेक तक्रारी होत्या. त्यात तथ्य आढळल्यामुळे नियमबाह्य भरती प्रक्रियेमध्ये पुढील अधिकारी व कर्मचारी जबाबदार असल्याचे आढळून आले. (1) श्री.ए.डी.नाईक, तत्कालीन प्रशासन अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक, (2) श्री.के.जे.जाधव, तत्कालीन सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक,

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे .......

श्री.आर.डी. पगार तत्कालीन लिपिक, विभागीय कृषी सह संचालक नाशिक, श्री. पंजाबराव दौलतराव पाटील, वरिष्ठ लिपिक, श्री. हेमंत खरे, वरिष्ठ लिपिक, श्री. ए.जी.गायकवाड, वरिष्ठ लिपिक तसेच या प्रकरणात जबाबदार असलेले श्री. ए.डी.नाईक, प्रशासन अधिकारी, श्री. कृष्णा गुलाब जाधव, सहाय्यक प्रशासन अधिकारी या कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात आले असून या सर्वांवर कारवाई करुन त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : केकतपांगरी(ता.गेवराई, जि.बीड) येथे साठवण तलाव योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत

**मु. शी.** : केकतपांगरी(ता.गेवराई, जि.बीड) येथे साठवण तलाव योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 49432 ला दिनांक 5 जून, 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, "केकतपांगरी (ता.गेवराई, जि.बीड) येथे साठवण तलाव योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 49432 ला दिनांक 5 जून, 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, प्रशासनातील हलगर्जीपणामुळे हा प्रकार घडला असून तो दुर्दैवी आहे. 7 वर्षापूर्वी या साठवण तलावाला मंजुरी मिळाली हाती. या साठवण तलावाचे जवळ जवळ 75 ते 80 टक्के काम पूर्ण झालेले आहे. या तलावाचे केवळ गॉर्ज फिलींगचे काम शिल्लक राहिलेले आहे. जर या साठवण तलावाचे गॉर्ज फिलींगचे काम झाले तर गेवराई शहराला पिण्याचे पाण्याचे बॅकअप मिळू शकेल. या साठवण तलासाठी लोकांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या असून शेतकऱ्यांना अर्धवट मावेजा मिळालेला आहे. या साठवण तलावाचे केवळ तांत्रिक दोष काढत या ना त्या कारणाने प्रशासन सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास टाळाटाळ करीत आलेले आहे. या साठवण तलावाला सन 2008 मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांनी दि. 17/7/2012 सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविला होता. दि. 1/6/2013 रोजी जलसंधारण महामंडळाने या प्रस्तावात एकंदर 7 वेळ त्रुटी काढल्या आहेत. सातही वेळा त्रुटींची पूर्तता करुन हा प्रस्ताव पुन्हा पाठवण्यात आला. योजनेचा सुधारित खर्च शासन निर्णय 30/4/2011 अन्वये निर्धारित आर्थिक निकषात सफल होत असल्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे आर्थिक अधिकार महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांना आहे. यासंदर्भातील तसे पत्रही सहाय्यक मुख्य अभियंता, लघुसिंचन, पुणे यांनी दि.7/7/2014 अन्वये कळवलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3...

श्री. अमरसिंह पंडित.......

सभापती महोदय, दुष्काळाच्या चर्चेदरम्यान मी हा विषय उपस्थित केला होता. केवळ टोलवाटोलवी केल्यामुळे हा प्रस्ताव प्रलंबित आहे. 7 वर्षापूर्वीच्या साठवण तलावाच्या संदर्भात मेरीला किंवा इतर कोणाला विचारण्याचे काम सुरु आहे. या साठवण तलावालाचे काम जवळपास 80 टक्क्यापेक्षा जास्त पूर्ण झालेले असल्यामुळे या प्रकल्पाचे काम आपल्याला करावेच लागणार आहे. यासंदर्भात मी प्रश्न विचारु इच्छितो की, मुख्य अभियंता, लघु सिंचन यांनी दिनांक 8/6/2012 रोजी जलसंधारण महामंडळाला दिलेल्या पत्रात ही योजना दि. 30/4/2011 च्या शासन निर्णयानुसार सफल होत असल्याचे कळवलेले आहे. असे असतांना महामंडळाने हा प्रस्ताव शासनाकडे का पाठविला ? योजनेचा प्रस्ताव सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी 17/7/2012 पासून जलसंधारण विभागाकडे प्रलंबित आहे. बदल्यांचा कायदा सन 2006 नुसार प्रस्तावाच्या मान्यतेत झालेल्या विलंबाची चौकशी करुन सदरील संचिका कोणकोणत्या स्तरावर प्रलंबित राहिलेली आहे ? सुधारित प्रशासकीय मान्तया देण्याच्या अगोदर ज्या लोकांच्या हलगर्जीपणामुळे हे प्रस्ताव प्रलंबित राहिलेले आहेत अशा लोकांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? तालुक्यात दुष्काळ व टंचाई परिस्थिती लक्षात घेता या बाबतीत शासन किती दिवसात कार्यवाही करेल यासंदर्भात मंत्री महोदय काही ठोस आश्वासन देणार आहेत काय ?

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही.

श्री. विजय शिवतारे (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, केकतपांगरी(ता.गेवराई, जि.बीड) येथील साठवण तलाव योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी वेळ झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. मुख्य अभियंत्यांनी नवीन 2011 च्या प्रचलित मापदंडानुसार हा प्रकल्प सफल होतो असे पत्र पाठविले होते. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. सन 2011 चा जो नवीन मापदंड झाला त्यानुसार कलम(3) अन्वये 2008-2009 च्या अगोदर जी अंदाजपत्रके तयार केली गेली आहेत त्याला हा नवीन मापदंड लागू होत नाही. सन 2008 च्या जुन्या मापदंडाने वाढीव किमतीचा हिशोब केला तर जुन्या मापदंडानुसार हा प्रकल्प पूर्णपणे असफल होतो. या प्रकल्पाचे कामकाज जवळपास 75 ते 80 टक्के झालेले आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी हा प्रस्ताव पुन्हा शासनाकडे पाठवावा लागला. 2011 च्या मापदंडानुसार हा प्रकल्प निश्चितपणे सफल होतो आहे परंतु 2011 च्या मापदंडातील कलम (3) अन्वये सन 2008-2009 पर्यंत ज्या प्रकल्पांची अंदाजपत्रके झाली होती त्यांनाच तो लागू होतो. आपले प्रकरण सन 2003-2004-2005 च्या अंदाज पत्रकानुसार झालेले आहे. यामध्ये जवळ जवळ दुप्पट वाढ झालेली आहे. 94 लाख रुपये भूसंपादनाच्या फरकामुळे या प्रकल्पाची वाढ झाली आहे. नवीन भूसंपादन कायदा व त्यातील अटींना अधीन राहून साधारणत: 94 लाख रुपये भूसंपादनामुळे किंमत वाढली आहे. यासंदर्भातील सर्व अंदाजपत्रके 2005 च्या डीएसआर नुसार तयार झालेली आहेत. सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी आताचा जो नवीन डीएसआर आहे त्यानुसार 49.2 लक्ष रुपयांनी किंमत वाढली आहे. भूसंपादन करताना रेडीरेकनर पाहिले जाते. सन 2004-2005 चा रेडीरेकनर आणि आजचा जो रेडीरेकनर आहे त्यामध्ये जी वाढ झाली आहे त्यामुळे भूसंपादनाची कॉस्ट वाढली आहे. वित्त विभागाकडून जे शेरे आले होते त्यामध्ये असे म्हटले आहे की, "या प्रकल्पाची किंमत साधारणत: डबल झालेली आहे. क्वॉन्टिटी वाढत असल्यामुळे या प्रकल्पाची चौकशी वाल्मी अथवा मेरी यांच्याकडून करुन घेण्यात यावी." खरे म्हणजे वाल्मी आणि मेरी हे प्रकल्पांच्या चौकशीचे काम करीत नाहीत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सांगून डिपार्टमेंटला हे काम द्यावयास पाहिजे होते. 2011 साली जे नवीन मापदंड झ ााले त्यामध्ये हा प्रकल्प बसतो परंतु 2011 च्या नवीन मापदंडातील कलम (3) नुसार 2008-2009 पर्यंत जे अंदाजपत्रक करण्यात आले होते

..5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय शिवतारे..........

त्यांनाच हा नवीन मापदंड लागू होतो. आपले अंदाजपत्रक 2004-2005 मधील आहे. भूसंपादनामुळे या प्रकल्पाची कॉस्ट वाढत असल्यामुळे स्पेशल केस करण्याची आवश्यकता आहे. या प्रकल्पाचे काम जवळपास 80 टक्के पूर्ण झालेले आहे. या प्रकल्पाचा फायदा 133 हेक्टरला होणार आहे. त्यामुळे यासंदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करुन या बाबतीत मी स्वत: लक्ष घातले असून अधिकाऱ्यांना लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहे. या प्रकरणाच्या संदर्भात मी स्वत: फॉलोअप करीत आहे एवढे या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. अमरसिंह पंडित :सभापती महोदय, मंत्री महोदय सकारात्मक उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु मंत्री महोदयांकडून आम्हाला ठोस आश्वासन अपेक्षित आहे. हे प्रकरण असेच प्रलंबित राहिले तर मेरी नाही तर दुसऱ्याच संस्थेकडे जाईल. आपल्याला कल्पना आहे की, उच्च न्यायालयाने लँड ॲक्वीझिशनची प्रकरणे निकाली काढण्याच्या संदर्भात काही प्रकरणांना स्थगिती दिलेली आहे. या ठिकाणचा एक माणूस जरी न्यायालयात गेला तर एका व्यक्तीमुळे हे प्रकरण प्रलंबित राहू शकते. त्यामुळे लवकरात लवकर नको, तर एक महिन्याच्या किंवा दीड महिन्याच्या आत हे प्रकरण निकाली काढण्यासंदर्भात ठोस आश्वासन आपल्या सारख्या बाणेदार मंत्र्यांकडून आम्हाला अपेक्षित आहे.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनीच त्यांच्या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. भूसंपदानासाठी 94 लाख रुपयांच्या वाढीव रकमेची आवश्यकता आहे. आपणास माहीत आहे की, आता भूसंपादनाचे नवीन नियम झालेले आहेत आणि ते सर्व नियम शेतकऱ्यांना माहीत आहेत, त्यामुळे त्यांनी वाढीव किंमत मागण्यास सुरुवात केली आहे. महामंडळाकडे हा प्रस्ताव प्रलंबित आहे. त्या संदर्भातील क्वेरीज लवकरात लवकर पूर्ण करुन त्या वित्त विभागाला कळविण्यात येतील. मी आपणास चुकीचे आश्वासन देऊ इच्छित नाही. मी आपणास सांगू इच्छितो की, एक महिन्याच्या आत सर्व क्वेरीज पूर्ण करुन त्या वित्त विभागाला कळविण्यात येतील. हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहील. तसेच प्रशासकीय मान्यतेसाठी प्रयत्न करण्यात येईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. :रायगड तालुक्यातील वडखळ कोळवे रस्त्यासाठी संपादित करण्यात आलेली जमीन शेतकऱ्यांना परत करणे

**मु.शी**.: रायगड तालुक्यातील वडखळ कोळवे रस्त्यासाठी संपादित करण्यात आलेली जमीन शेतकऱ्यांना परत करणे यासंबंधी श्री.जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"पेण, जि.रायगड तालुक्यातील नियोजित वडखळ कोळवे रस्त्यासाठी सर्व्हे नं 153 पैकी 1 व 2, 150 पैकी 8,156 पैकी 1 व 2,157 पैकी 4, 7, 8 व 10, 169, 153 पैकी 4, 5, 7, मिळून 87.3 क्षेत्र सन 1970 मध्ये संपादित करुन जमिनीचा अंतिम निवाडा दिनांक 24 जून, 1970 रोजी होणे, प्रत्यक्षात संपादित केलेली जागा नियोजित रस्त्यासाठी वापरात न येणे, संपादित केलेली जमीन नियोजित रस्त्यासाठी वापरात न आल्याने संबंधित जमीनधारकांनी जमिनी परत मिळणेबाबत मागणी करणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक 01 जानेवारी, 2012 रोजी वा त्या सुमारास जमीन मालकांना वापरात न आलेल्या संपादित जमिनी परत करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात येणे, संबंधित शेतकऱ्यांनी सन 2006 पासून संपादित केलेल्या जमिनी वापरात येत नसल्याने मागणी करुनही 7 वर्षाचा कालावधी ओलांडून संबंधित शेतकऱ्यांना जमिनी परत न करणे, त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, वडखळ ते कोळवे रस्त्यासाठी जमीन संपादित करण्यासाठी मी आणि तत्कालीन सन्माननीय सदस्य श्री.मोहन पाटील यांनी शेतकऱ्यांना विनंती केली होती. त्यानंतर तेथे इस्पात प्रोजेक्ट आल्यामुळे तेथील रस्ता वेगळ्या मार्गाने काढण्यात आला. आज त्या भागातील जमिनीच्या किंमती मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या आहेत. ज्या कारणासाठी जमीन घेतली असेल त्या कारणासाठी जमिनीचा वापर झाला नसेल, तर ती जमीन मूळ मालकाला देण्यात यावी असा कायदा आहे. सिंचनासाठी ज्या जमिनी घेतल्या असतील आणि त्या जमिनीचा वापर त्याच कारणासाठी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

झाला नसेल तर त्या जमिनी परत कराव्यात असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. शेतकऱ्यांना जमिनी परत न देण्याचा निर्णय हा सरकारचा आहे. माझा प्रश्न आहे की, ज्या कारणासाठी जमीन संपादित करण्यात आली होती, तेथे आता रस्ता होणार नाही. त्या जागेच्या दोन्ही बाजूला शेती असल्यामुळे सरकारला त्या जमिनीचा काही उपयोग होणार नाही. तेव्हा जी जमीन रस्त्याच्या कामासाठी संपादित करण्यात आली होती ती मूळ मालकाला परत करण्यात येईल काय ?

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, सन 1970-71 मध्ये या जमिनीचे अवॉर्ड झाले होते. त्या ठिकाणी रस्ता झाला नाही, परंतु ती जमीन सरकारच्या ताब्यात आहे. 1997 मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, ज्या प्रयोजनासाठी जमीन घेतली असेल आणि त्या प्रयोजनासाठी वापरण्यात आली नसेल तर ती जमीन मूळ मालकाला देता येणार नाही. त्या जमिनीचा लिलाव करावा व त्यामध्ये मूळ मालकाने भाग घ्यावा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे ती जमीन मूळ मालकाला देण्यात आली नाही.

सभापती महोदय, आता नवीन भूसंपादनाचा कायदा आहे त्यामध्ये ती तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु या नवीन कायद्याच्या अनुषंगाने जमिनीचे अवॉर्ड झाले असेल तरच ती तरतूद लागू होईल. म्हणजे नवीन भूसंपादनाच्या कायद्यानुसार जमीन संपादित केली असेल तर त्यासाठी ती तरतूद लागू आहे. 1970-71 मध्ये जो कायदा होता त्या कायद्याला ही तरतूद लागू नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जुन्या कायद्याप्रमाणे ते लागू असेल तर त्यास माझी काही हरकत नाही. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, या जमिनीच्या दोन्ही बाजूला शेती असल्यामुळे सरकारला त्या जमिनीचा काही उपयोग होणार नाही. तेव्हा ती जमीन कोणत्या तरी प्रोजेक्टमध्ये जाण्यापेक्षा शासन त्या जमिनीचा लिलाव करणार काय ?

श्री.एकनाथराव खडसे :सभापती महोदय, यामध्ये दोन तरतुदी आहेत. एक तर त्या जमिनीचा लिलाव करावा आणि त्यामध्ये सर्वांना सहभागी करुन घ्यावे. दुसरे म्हणजे सरकारने ती जमीन घेतली नसेल तर ती डिस्ट्रीक्ट लँड बँकेमध्ये जमा केली जाते. ती जमीन डिस्ट्रीक्ट लँड बँकेत जमा असेल आणि त्या जमिनीचा लिलाव करता येणे शक्य असेल तर त्या संदर्भात तातडीने लिलाव करण्याच्या सूचना करण्यात येतील.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बीड जिल्हा परिषदेमध्ये कोट्यवधी रुपयांचा झालेला घोटाळा

**मु. शी.** : बीड जिल्हा परिषदेमध्ये कोट्यवधी रुपयांचा झालेला घोटाळा यासंबंधी श्री.अमरसिंह पंडित,वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.अमरसिंह पंडित ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"बीड जिल्हा परिषदेच्या लेखा व वित्त विभागात विधीनुसार मान्य कोणत्याही प्रकारची वित्तीय शिस्त न पाळल्यामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा निधीमध्ये प्रचंड भ्रष्टाचार होणे, जिल्हाधिकारी, बीड यांनी याबाबत नेमलेल्या चौकशी समितीने 336 पानांचा सविस्तर अहवाल दिनांक 19 सप्टेंबर, 2014 रोजी सादर करुनही अद्याप दोषींविरुध्द कोणतीही कार्यवाही न होणे, चौकशी समितीने आपल्या अहवालात कोट्यावधी रुपयांच्या बोगस कामांचा ऊहापोह करणे, तरतुदीपेक्षा अनेक पटीने जास्त रक्कम अदा करुन रोख पुस्तिका व लेखा अभिलेखे पूर्ण न केल्याच्या बाबी स्पष्ट करणे, विविध लेखाशीर्ष अंतर्गतचा निधी विना परवानगी बेकायदेशीररित्या इतर लेखाशीर्षांना वर्ग करुन मोठा आर्थिक अपहार करण्यात येणे, समाजाच्या सर्व स्तरातून प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय, संबंधित विभागाचे मंत्री उपस्थित नसले तरी या अर्धा तास चर्चा तातडीने निकालात काढण्याचे शासनाने ठरविले आहे काय ? हा विभाग आपल्या अखत्यारीत नाही तेव्हा आपण फक्त उत्तरे देणार की ठोस आश्वासन सुद्धा देणार हे मंत्री महोदयांनी सांगावे.

सभापती महोदय, बीड जिल्हा परिषदेतील वित्तीय घोटाळ्याच्या संदर्भात मी अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित केलेली आहे. मी यापूर्वी बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या विरोधात पुराव्यासह तक्रार केली होती. या वित्तीय घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जावळेकर आहेत. इतका धाडसी माणूस मी माझ्या आयुष्यात पाहिला

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

नाही. त्यांनी कोणत्याही नियमांचे पालन न करता कारभार केलेला आहे. डी.एड.न झालेल्या उमेवाराची शिक्षक म्हणून नियुक्ती केलेली आहे. तसेच शिपायाला शिक्षक म्हणून पदोन्नती दिलेली आहे. धुळे जिल्हा परिषदेमध्ये भास्कर वाघ याने केलेला घोटाळा सर्वांना माहीत आहे. परंतु त्या घोटाळ्याला लाजवेल असा महाघोटाळा श्री.जावळेकरांनी केलेला आहे. त्यांनी हे सर्व स्वत:च्या सहीने केलेले आहे. श्री.जावळेकर यांची बदली झालेली आहे. त्यांच्या अनियमिततेबाबतचा अहवाल आयुक्तांनी दिलेला आहे. या अहवालाचा आधार घेऊन तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जावळेकर यांच्यावर कारवाई करणार काय, ही कारवाई किती दिवसांत करणार आहात ?

---------

..7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या प्रकरणातील अनियमितता लक्षात आलेल्या आहेत. त्या संदर्भात अपर आयुक्तांनी श्री.जावळेकर यांच्या विरोधात दिनांक 26 सप्टेंबर, 2013 रोजी चौकशी केलेली आहे. त्यांच्याकडून कोणती अनियमितता झालेली आहे हे त्यांनी नमूद केलेले आहे. बीड जिल्हा परिषदेमध्ये अनियिमतता झाली म्हणून दिनांक 24.9.2014 रोजी अपर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. त्या समितीने देखील अनिमिततेबाबत कळविले आहे. दिनांक 30.7.2014 रोजी जिल्हा परिषद सदस्य सर्वश्री दशरथ आणि मदनराव चव्हाण यांनी उपोषण करुन त्यांनी या बाबी निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्यावर जिल्हाधिकारी यांनी दिनांक 6.8.2014 रोजी एक चौकशी समिती स्थापन केली. या समितीमध्ये श्री.माडे, जिल्हा कृषी अधिकारी, श्री.मळगुंडे, लेखाधिकारी, श्री.कांबळे, कार्यकारी अभियंता, श्री.तनवे, सहायक संचालक, श्री.सय्यद, उप कार्यकारी अभियंता यांचा समावेश आहे. या समितीने अभिप्राय देताना तरतुदीपेक्षा अनेक कामांना मान्यता देणे, अर्थसंकल्पातील तरतुदीपेक्षा जास्त पटीने रक्कम अदा करण्यात येणे, तसेच वित्त विभागात अनेक लेखाशीर्षांतर्गत मंजूर रकमेच्या अधिक प्रमाणात रक्कम खर्च होणे, सदरचा खर्च कोणत्या लेखाशीर्षाखाली खर्च केला जात आहे याबाबतीत सखोल चौकशी करण्याची गरज आहे असे अभिप्राय दिलेले आहेत. या प्रकरणामध्ये अनियमितता झालेली आहे यामध्ये दुमत नाही. दिनांक 21.11.2014 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जावळेकर यांची बदली करण्यात आली. दिनांक 29.11.2014 रोजी वित्त व लेखा अधिकारी यांची देखील बदली करण्यात आली आहे. या संदर्भातील चौकशी चांगल्याप्रकारे साक्षेपपणे होण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बदली करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे....

विभागाच्या सचिवांनी ऑडिट करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत. ही संपूर्ण कार्यवाही करण्यासाठी चार-पाच महिन्यांचा कालावधी लागणार आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्याने सन 2013 चे इतिवृत्त अजूनपर्यंत सादर केलेले नाही. अशा प्रकारच्या गंभीर बाबी त्यामध्ये आहेत. हे खरे आहे की, सदरहू जिल्हा परिषदेचे लेखा परीक्षण झाले पाहिजे. त्या ठिकाणी नक्की किती रकमेचा अपहार झाला या बाबत.......

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी आपल्या उत्तरात सांगितले की, या प्रकरणी विभागीय आयुक्तांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. याचाच अर्थ चौकशी केल्याशिवाय त्यांच्याकडून अहवाल आलेला नाही. विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी बीड जिल्हा परिषदेच्या लेखा विभागात 15 दिवस कागदपत्रांची तपासणी करीत होते. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घेतलेला प्रत्येक निर्णय त्यांनी तपासून बघितला आणि त्यानुसार त्यांनी आयुक्तांना लेखी अहवालाद्वारे कळविले आहे. तरी सुध्दा माननीय राज्यमंत्री सांगत आहेत की,....

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, याच अधिकाऱ्यांनी 2013 मध्ये शिक्षकांच्या बदलीमध्ये केलेले घोटाळे लक्षात आले . हे घोटाळे 2013-14 मध्ये झाले होते. परंतु तत्कालीन सरकारने त्याच वेळी त्यांच्यावर ॲक्शन घेतली नाही. गेल्या वर्षी शिक्षकांच्या बदल्यांमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला असताना....

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय,

(विरोधी पक्षाचे काही सदस्य उभे राहून एकत्रित बोलतात.)

श्री.विजय शिवतारे : महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, त्यांनी कृपया माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. मी या ठिकाणी स्पेसिफिक उत्तर देत होतो. सन 2013 मध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शिक्षकांच्या बदलीमध्ये घोटाळा केला तेव्हाच या विषयी दखल घेतली असती तर दुसरा घोटाळा करण्यासाठी त्या अधिकाऱ्याचे धाडस झाले नसते. तत्कालीन सरकारने त्या अधिकाऱ्यावर वेळीच प्रशासकीय कारवाई केली नाही.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, या प्रकरणी आम्ही लेखी तक्रार केली होती. मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, सभागृहात अशा प्रकारे बोलण्याची पध्दत नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे : महोदय, 2013 च्या दरम्यान आयुक्तांकडून अहवाल आल्यानंतर त्याचवेळी संबंधित अधिकाऱ्यांवर ताबडतोब कारवाई झाली असती तर पुढच्या गोष्टी टळल्या असत्या. परंतु जी नवीन तक्रार आलेली आहे ते प्रकरण गेल्या दोन-तीन महिन्यातील आहे. वास्तविक पाहता नवीन सरकार सत्तेवर येऊन केवळ दोन महिने झाले आहेत. अशा प्रकरणी नवीन सरकार कडक कारवाई करीत आहे. या निमित्ताने सांगतो की, एखाद्या दोषीवर योग्य कारवाई करावयाची असेल तर ती परफेक्ट असावयास पाहिजे. नाही तर ते त्यातून सुटतील. त्या अधिकाऱ्यावर अगोदरचे आरोप शिक्षकांच्या बदल्यांच्या अनियमिततेबाबतचे आहेत. परंतु गत तीन महिन्यातील आरोप हे वित्तीय अनियमिततेच्या स्वरूपातील आहेत. उदाहरणार्थ प्रशासकीय मान्यता दीड पटीपेक्षा जास्त देणे, एका बाबीवरील पैसे दुसऱ्या बाबीवर वळते करणे, अशा प्रकारचे ते आरोप आहेत. या निमित्ताने सांगतो की, हे सरकार चुकीच्या व्यक्तीला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करणार नाही. चुकीचे काम करणाऱ्याला शासन करावयाचे असेल तर, कारवाईमध्ये लूपहोल्स राहता कामा नयेत. त्यामुळे या प्रकरणी परफेक्ट ऑडिट करुन, तसेच जबाबदारी निश्चित करुन कारवाई केली जाईल. अपहार मोठ्या रकमेचा असेल तर दोषी अधिकाऱ्याला केवळ निलंबितच नाही तर त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यापर्यंतची कारवाई करता येते. विभागाचे प्रधान सचिव श्री.गिरीराज यांनी दिनांक 15 डिसेंबर, 2014 रोजी संबंधित जिल्हा परिषदेचे ऑडिट करण्यासाठी पत्र दिले आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, "बीड जिल्हा परिषदेचे विशेष लेखा परीक्षण करावे, सदर लेखा परीक्षण नि:पक्ष पध्दतीने व सखोल होण्यासाठी इतर विभागातील तज्ज्ञ व निस्पृह अधिकाऱ्यांमार्फत सत्वर पूर्ण करण्याबाबत संचालक, स्थानिक निधी लेखा यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे." या प्रकरणी ऑडिट करुन व संबंधित अधिकाऱ्यांवर आरोप निश्चित करुन त्यांच्यावर कारवाई केली जाईल. मी पुन्हा एकदा सांगतो की, शासन कोणत्याही दोषी अधिकाऱ्याला पाठीशी घालणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी माननीय राज्यमंत्र्यांना विचारु इच्छितो की, संबंधित अधिकारी सध्या कोठे आणि कोणत्या पदावर कार्यरत आहेत, कार्यरत नसतील तर त्यांना निलंबित केले आहे काय आणि निलंबित केले नसेल तर त्यांना शासन निलंबित करणार काय ?

..3..



SJB/ AKA/ AKA/ KTG/ पूर्वी श्री.अजित... 10:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्यांना कार्यमुक्त केले आहे. तसेच मी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना सांगू इच्छितो की, ते अधिकारी आय.ए.एस. कॅडरचे नसून एम.डी.एस. कॅडरचे आहेत. त्यांची कोठेही पोस्टींग करण्यात आलेली नाही.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, या प्रकरणी योग्य ती कारवाई करीत आहोत. वरिष्ठ आय.ए.एस. अधिकरी श्रीमती राधिका रस्तोगी यांनी शासनाला या प्रकरणी अहवाल दिलेला आहे. मी सांगू इच्छितो की, तत्कालीन प्रधान सचिव श्री.एस.एस. संधू यांना मी सात पत्र देऊन तक्रार केली होती. या निमित्ताने मी विचारतो की, सदरहू प्रकरणात माननीय आयुक्तांनी जो अहवाल दिलेला आहे तो समोर ठेवून ऑडिटची सर्व प्रक्रिया एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल काय ?

श्री.विजय शिवतारे : महोदय, ऑडिट करण्यासाठी नक्की किती वेळ लागेल हे सांगता येणार नाही. परंतु सदरहू ऑडिट 30 दिवसांच्या आत त्वरित करावे, अशा सूचना देण्यात येतील. त्या बाबतचा अहवाल आल्यानंतर संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल याबद्दल थोडे सुध्दा दुमत नाही.

**तालिका सभापती** : आता अर्धा-तास चर्चा क्रमांक-4 घेण्यात येईल.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**संबंधित विभागाचे माननीय मंत्री किंवा माननीय राज्यमंत्री उपस्थित नसल्याबाबत**

श्री.जयवंतराव जाधव : महोदय, ज्या विभागाच्या संदर्भातील ही अर्धा-तास चर्चा आहे त्या विभागाचे मंत्री कोण आहेत, या अर्धा-तास चर्चेला विभागाचे माननीय मंत्री उत्तर देणार आहेत की ते नसल्यामुळे माननीय राज्यमंत्री उत्तर देणार आहेत ? मी या ठिकाणी माननीय राज्यमंत्री श्री.विजय शिवतारे यांचे स्वागत करतो की, ते स्वत:चा विभाग सांभाळून दुसऱ्या विभागाच्या मंत्र्यांची जबाबदारी योग्यप्रकारे सांभाळत आहेत.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, कोणत्याही बाबीचे उत्तर हे सरकार म्हणून द्यावयाचे असते. किंबहुना ही सामूहिक जबाबदारी आहे. एखादे मंत्री महोदय उपस्थित नसतील तर अन्य विभागाचे वरिष्ठ मंत्री उत्तर देऊ शकतात.

श्री.जयवंतराव जाधव : महोदय, माननीय सभागृह नेत्यांनी जी माहिती दिली त्याबद्दल मी त्यांचा सन्मान करतो. मी सभागृह नेत्यांना निदर्शनास आणून देतो की, संबंधित विभागाचे मंत्री अनुपस्थित आहेत. मला हे मान्य आहे की, विधानसभा सभागृहात प्रश्नोत्तराचा तास असल्यामुळे त्यांना तेथे जावे लागले असेल. परंतु या विभागाचे राज्यमंत्री सुध्दा उपस्थित नाहीत.

श्री.विजय शिवतारे : महोदय, माननीय श्री.दीपक केसरकर हे ग्राम विकास विभागाचे राज्यमंत्री आहेत. त्यांना एक अडचण आल्यामुळे ते परवानगी घेऊन मतदारसंघात गेले आहेत. तसेच या विभागाच्या मंत्री माननीय श्रीमती पंकजा मुंडे या विधानसभा सभागृहात प्रश्नोत्तराचा तास सुरु असल्यामुळे त्या सभागृहात आहेत. या अर्धा-तास चर्चेला उत्तर देण्याबाबत त्यांनी मला लेखी विनंती केली आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : यशवंत ग्राम समृध्दी योजनेसंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे

**मु. शी.** : यशवंत ग्राम समृध्दी योजनेसंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, या संबंधी श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"यशवंत ग्राम समृध्दी योजनेसाठी सन 2010-2011 वर्षापासून राज्यातून वीस जिल्हा परिषदांचे रु.423.87 कोटीचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असून गेल्या दोन वर्षापासून कोणत्याही जिल्हा परिषदेस निधी वितरण करण्यात न येणे, ग्रामीण महाराष्ट्रामध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध होण्याकरिता यशवंत ग्रामसमृध्दी योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून सतत होणारी मागणी, राज्यातील ग्रामीण भागातील विकास कामांसाठी अन्य कोणतीही योजना नसल्याने शासनाने यशवंत ग्रामसमृध्दी योजना पूर्ववत किंवा सुधारित करुन कार्यान्वित करण्याची आवश्यकता व याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महोदय, राज्यात शहरीकरण होत असल्याचे आपण बघतो. ग्रामीण भागातील मध्यमवर्गीय माणूस किंवा मजूर हे शहराकडे येत आहेत. ग्रामीण भागातील कोणताही शिक्षक असेल, अधिकारी/कर्मचारी असेल तो ग्रामीण भागात नोकरी करण्यास तयार नसतो. कारण ग्रामीण भागात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर असुविधा आहेत. राज्यामध्ये यशवंत ग्राम समृध्दी योजना कार्यरत होती. या योजनेच्या माध्यमातून ग्राम सुविधांच्या ज्या योजना असतील, उदाहरणार्थ सांडपाण्याची व्यवस्था असेल, गाव अंतर्गत रस्ते असतील, सभागृह बांधकाम असेल किंवा तत्सम कामे असतील, ही कामे ग्राम विकासाच्या योगदानामध्ये भर टाकणारी आहेत. पूर्वी ही कामे यशवंत ग्राम समृध्दी योजनेच्या माध्यमातून केली जात होती. 2010-2011 पासून यशवंत ग्राम समृध्दी योजनेसाठी राज्यातून जिल्हा परिषदांचे प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी आलेले आहेत. माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार 423.87 कोटी रूपयांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत.

नंतर श्री.कांबळे....

श्री. जयवंतराव जाधव ....
शासनामार्फत यशवंत ग्राम समृध्दी योजनेच्या माध्यमातून कोणताही निधी या योजनेवर दिला जात नाही. मला या संदर्भात शासनाला विनंती करावयाची आहे. आपण ग्रामविकासाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास करता, अनेक योजना करता. अगोदर कोण होते, या संदर्भात माननीय मंत्र्यांनी सांगितले. मी सांगू इच्छितो की, त्यांनी हा भाग सोडून द्यावा. ग्रामीण भाग देशाचा, राज्याचा गाभा आहे. आपण येथे किती विकास करू शकलो आहोत ? माझे स्पेसिफिक प्रश्न आहेत की, यशवंत ग्राम समृध्दी योजनेचे प्रलंबित असलेले प्रस्ताव तातडीने मंजूर करणार का, बंद अवस्थेत असलेली ही योजना अधिक सुधारणा करून पुन्हा सुरू करणार का ?

श्री. विजय शिवतारे (जलसंपदा राज्यमंत्री) : सन्माननीय सदस्यांनी ही योजना पुन्हा सुरू करणार का, असा प्रश्न विचारला. दिनांक 4 एप्रिल, 2012 रोजी मंत्रिमंडळाने ही योजना सुधारित करून मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला होता. इतर विभागाकडून कन्व्हर्शन्स करण्याचा प्रयत्न होता. योजनेसाठी जे पैसे लागतील त्यातील 20 टक्के रक्कम सामाजिक न्याय विभागाकडून यावी, आदिवासी विभागाकडून 20 टक्के रक्कम यावी आणि अल्पसंख्याक विभागाकडून 10 टक्के रक्कम यावी, असे प्रस्तावित होते. सदर योजनेसाठी साधारणत: 500 कोटी रूपये उपलब्ध करून द्यावेत, अशी वित्त विभागाला मागणी केली होती. परंतु, वित्त विभागाने स्पष्ट सांगितले की, 2515 च्या हेडखाली यशवंत ग्राम समृध्दी योजनेखाली होणारी कामे आहेत. अगदी सिमिलर, टिपिकल कामे 2515 च्या योजनखाली देखील होतील. त्यामुळे तुम्हाला वेगळी योजना करण्याची गरज नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, या 3 विभागांकडून 50 टक्के पैसे मागण्यासाठीचा प्रस्ताव होता, त्याला तीनही विभागांनी स्पष्ट असमर्थता दाखविली आहे. वित्त विभागाने स्पष्ट सांगितले आहे की, आपण 2515 मध्ये ही सर्व कामे घेत असल्यामुळे आणि ते हेडही आपल्याकडे ओपन असल्यामुळे आपण त्यातूनच संबंधित कामे घ्यावीत. वित्त विभागाने असे अभिप्राय दिले आहेत. राज्यातील सर्वच ठिकाणांहून यासाठी मागणी येत आहे. सन्माननीय सदस्यांनी सागितले ते खरे आहे की, राज्यभर या योजनेंतर्गत खूप चांगली कामे झाली आहेत. सन 2002 ते सन 2008-09 पर्यंत जवळपास 137 कोटी रूपयांची चांगली कामे झाली आहेत. सरकारचा या संदर्भात सुधारित योजना करण्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E.2

MSK/ AKA/ KTG/ पूर्वी श्री. बोर्डे 10:40

श्री. विजय शिवतारे ....

विचार सुरू आहे. सध्याचे योजनेचे स्वरूप मी सांगतो. अगोदर मागासवर्गीयांठी 10 टक्के वर्गणी होती, ती आता 15 टक्के करण्याचे प्रस्तावित केले आहे. सामान्यांसाठी 15 टक्के वर्गणी होती, ती 30 टक्के करण्यात आली आहे. योजनेची निधीमर्यादा अगोदर 10 लाख होती, ती आता आपण 20 लाख रूपये करण्याचे प्रस्तावित केले आहे. सध्या या बाबतीत संपूर्ण विचार सुरूआहे. मी सन्माननीय सदस्यांच्या विचारांशी सहमत आहे. शासन पातळीवर या योजनेचा विचार करून योग्य तो निर्णय लवकरात लवकर घेतला जाईल.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, 2515 च्या माध्यमातून ही कामे होतात, असे माननीय मंत्र्यांनी सांगितले, ते आम्हाला मान्य आहे. शासन एका निर्णयाप्रत येऊन, एखादी योजना कार्यान्वित करून तिच्या माध्यमातून विकास होत असतो आणि त्याकरिता एक स्पेसिफिक निधीची तरतूद करून त्या योजनेखाली पर्टिक्युलर गावाकरिता, विभागाकरिता त्याचा विनियोग होऊन कामे होत असतात. यशवंत ग्राम समृध्दी योजनेचा निधी पूर्वी दिला आहे. हा हेड ओपन आहे, असे माननीय मंत्री म्हणत आहेत, ते मान्य आहे. मग यशवंत ग्राम समृध्दी योजनेच्या माध्यमातून होणारा खर्च 2515 ला आपण वाढवून देणार का, वाढवूनच देणार असाल तर ही योजनाच सुधारित करून आपण का चालू करीत नाही ? आपल्याला असे करायचे नसेल तर 2515 च्या हेडमध्ये बंधनकारकरित्या ग्राम समृध्दी करिता हा निधी वाढवून दिला पाहिजे, अशी मी सभागृहाच्या वतीने शासनाला विनंती करीत आहे.

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, अगोदरच्या योजनेत लोकवर्गणी 10 टक्के होती. सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते बरोबर आहे. सदर बाबतीत पुन्हा एकदा आवाहन केले होते. 423 कोटी रूपये इतक्या मोठ्या प्रमाणात पैसा जमा झाला होता, त्यासमोर शासनाचा सहभाग असता तर ती रक्कम फार मोठी झाली असती. सध्याची आर्थिक परिस्थिती पाहता ते ताबडतोब करणे शक्य नव्हते. शासनाने सुधारित योजनेत 10 लाख रूपयांऐवजी 20 लाख रूपये निधी केला आहे. आता डीएसआर वाढले आहेत, किंमती वाढल्या आहेत. त्यामुळे शासनाने 20 लाख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

24-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E.3

MSK/ AKA/ KTG/ पूर्वी श्री. बोर्डे 10:40

श्री. विजय शिवतारे ....

रुपयांची तरतूद केली आहे. सामान्यांची वर्गणी 15 टक्के होती, ती आता 30 टक्के केली आहे. लोकसहभाग वाढला तर बरे होईल. प्रॅक्टिकली असे दिसून आले की, एखादे काम 10 लाख रुपयांचे करायचे असेल तर 10 टक्के वर्गणी कोण भरत होते, हे मी सांगण्याची गरज नाही. त्यामुळे काम चांगल्या दर्जाचे व्हायचे नाही. ती वर्गणी ठेकेदार भरत होते. आता 30 टक्के वर्गणी कोणी भरु शकत नाही. कारण 30 टक्के नेट प्रॉफिट असू शकत नाही. आमचा हाच हेतू आहे. लोकवर्गणी देणाऱ्यांनी चांगल्या कामासाठी 30 टक्के लोकसहभाग केला तर निश्चितपणे सरकार त्या बाबतीत विचार करते. सरकारने आता कामाचा निधी 10 लाख रुपयांवरुन 20 लाख रुपये केला आहे. सरकारने तोही चांगला विचार केला आहे. सुधारित योजना करण्याचा प्रस्ताव आहे. सरकार त्यावर विचार करीत आहे. लवकरच त्या संदर्भातील सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्री सकारात्मक उत्तर देत आहेत. योजना कस्टमाईज केली आहे. 2515 मध्ये 5 लाख रुपयांपर्यंतची मर्यादा होती. यशवंत ग्राम समृध्दी योजनेत सुध्दा 5 लाख रुपयांच्या जवळपास निधी होता. आता 20 लाख रुपये देण्याचा विचार व्यक्त केला आहे. योजना मंजूर करताना राज्य सरकार काय निकष लावणार आहे, हे देखील पाहिले पाहिजे. केवळ 30 टक्के लोकवर्गणी देणाऱ्या ग्रामपंचायतीला पैसे देणार आहात. आपण त्या संदर्भात निकष लावणार नाही का ? 10 टक्के कोण भरत होते, हे मी सांगण्याची गरज नाही. काही लोक याही पुढे गेले आहेत. अनियमितता, गैरव्यवहार टाळण्याच्या हेतूने सरकार योजना मंजूर करीत असताना काही निकष लावणार आहे का ? सभापती महोदय, हे केवळ तेवढ्यापुरते मर्यादित नाही. 30 टक्के रक्कम भरली की प्रस्ताव मंजूर करुन देऊ, हेच निकष असतील तर त्यातूनही मार्ग निघू शकतील. आपल्याला सर्व अनियमितता टाळण्यासाठी काही तरी केले पाहिजे. काही ग्रामपंचायतींमध्ये कमालीचे चांगले काम झाले आहे. आपण त्याची कल्पनाही करु शकत नाही. 4-5 फुटांच्या बोळ्यामध्ये सुध्दा नाली करुन तेथील रस्ता चांगला करुन दिला आहे. पावसात

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

चिकचिक होते. माय-माऊली डोक्यावर घागर घेऊन चालत असतात. तेथे चिखल होऊ नये म्हणून गोटे टाकलेले असतात. रस्ता झाल्यामुळे आज त्या घरापर्यंत व्यवस्थित जातात.

..4



श्री. अमरसिंह पंडित ....

चांगल्या ग्रामपंचायतींना काम मंजूर करण्याच्या हेतूने निकष लावले पाहिजेत. ग्रामपंचायतीच्या कार्यभाराबद्दलचे निकष लावले तरच ही योजना यशस्वी होईल. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, योजना मंजूर करताना संबंधित ग्रामपंचायतीच्या संदर्भात नव्याने कोणते निकष तयार करून लावणार आहात ?

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, आपण नवीन योजना करीत आहोत आणि त्यासाठी 15 टक्क्यांऐवजी 30 टक्क्यांचे निकष लावले आहेत. 10 टक्के लोकवर्गणी कोण भरत होते, काय करीत होते, ते मी सांगितले आहे. ही योजना प्रस्तावित आहे. अनेक गोष्टी सरकारच्या नजरेस आल्या आहेत. सुधारित प्रस्ताव पूर्ण निकषात बसून शासन करीत आहे. सर्व बाबीचा विचार करून हे केले आहे. पूर्वी योजनेतून 10 लाख रुपये रक्कम मिळायची. कित्येक गावांत योजनेचे 10 लाख रुपये आणि आमदार निधीतील काही रक्कम एकत्र करून चांगले प्रकल्प केले गेले आहेत. हे वास्तव आहे. त्यामुळे ती योजना पुन्हा प्रस्तावित करण्याचा सरकार विचार करीत आहे. लोकसहभाग किती असावा, प्रॅक्टिकली वास्तव काय, कसे, ग्रामपंचायतीला कोणत्या अडचणी होत्या या सर्व गोष्टी राज्य सरकारपर्यंत पोहचल्या आहेत. आपण थोडीशी वाट पहावी. ज्या दिवशी प्रस्ताव येईल त्या दिवशी सर्व निकषांचा विचार करून त्याचा समावेश केला जाईल आणि चांगल्या प्रकारे योजना पुढे आणली जाईल.

----

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय राज्यमंत्री श्री.विजय शिवतारे यांच्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री श्री.विजय शिवतारे यांचा आज वाढदिवस आहे. मी माझ्यातर्फे त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो.

**तालिका सभापती** : मी देखील सर्व सभागृहाच्या वतीने माननीय जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री श्री.विजय शिवतारे यांचे अभीष्टचिंतन करतो.

(सर्व सन्माननीय सदस्य बाके वाजवून राज्यमंत्री महोदयांचे अभीष्टचिंतन करतात.)

------------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अर्धा-तास चर्चा क्रमांक 6 बाबत**

**तालिका सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक 6 वर दाखविण्यात आलेली सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांची अर्धा-तास चर्चा संबंधित विभागाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे नंतर घेण्यात येईल.

--------------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: खाड्या लगत शेत जमिनीत खारे पाणी शिरुन होणारे जमिनीचे नुकसान

**मु.शी.**: खाड्या लगत शेत जमिनीत खारे पाणी शिरुन होणारे जमिनीचे नुकसान यासंबंधी श्री.जयंत प्र.पाटील,वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"रायगड जिल्ह्यातील बहुतांशी भागात खाड्या लगत मोठ्या प्रमाणावर भातशेतीचे पीक घेतले जात असणे, गेल्या ४ ते ५ वर्षापासून भात पिकाखालील मोठ्या प्रमाणावर समुद्राचे खारेपाणी शिरल्याने बाधित क्षेत्रात वाढ होणे, गेल्या अनेक वर्षापासून खाडी लगतच्या शेतीला संरक्षक खारभूमी योजना वेळीच कार्यान्वित होत नसल्याने भात पिकांखालील जमिनी नापीक होणे, याबाबत शासनाकडे अनेक वेळा विविध आयुधांमार्फत मागणी करुनही शासन या योजनांमध्ये जाणूनबुजून करीत असलेले दुर्लक्ष तसेच आवश्यक निधी उपलब्ध न करणे, त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे व घबराटीचे वातावरण निर्माण होणे व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करणे आवश्यक असणे, सालाबादप्रमाणे शासनाच्या अकार्यक्षमतेमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान होत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, कोकणामध्ये मोठा समुद्रकिनारा आहे. मी काल या विभागाच्या मंत्री महोदयांबरोबर चर्चा देखील केली आहे. ते या संदर्भातील अभ्यास करीत आहेत. बांध फुटला की, समुद्राचे खारे पाणी शेत जमिनींमध्ये शिरते आणि त्या ठिकाणी ताबडतोब मॅनग्रोव्ह तयार होतात. हा अतिशय गंभीर प्रश्न कोकणात निर्माण झाला आहे. शेत जमिनीत मॅनग्रोव्ह झाले की, मग तलाठी 7/12 उताऱ्यावर मॅनग्रोव्हची नोंद करतात व त्यामुळे शेतकऱ्याला त्या जमिनीत कोणतेही पीक घेण्यास बंदी घालण्यात येते. या संदर्भात आपल्याला खास बाब करावी लागेल. एखाद्या जमिनीत मोठे मॅनग्रोव्ह असतील, गेल्या 10 वर्षांपासून, 5 वर्षांपासून असतील तर ते तोडू नयेत, हे आम्ही समजू शकतो. मी या संदर्भातील आकडेवारीच सभागृहाला सादर करतो.

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.........

सभापती महोदय, रायगड जिल्ह्यात सरकारी खार जमीन क्षेत्र 22579 हेक्टर एवढे आहे. सरकारी योजना नसलेले, शेतकरी स्वत: योजना चालवित असलेले खाजगी खार क्षेत्र 4382 हेक्टर एवढे आहे. लागवडीखालील सरकारी क्षेत्र 18000 हेक्टर आणि लागवडी खालील खाजगी क्षेत्र 3000 हेक्टर, 22 सरकारी क्षेत्र, ज्यामध्ये खारे पाणी येऊन पीक येत नाही, असे क्षेत्र 4559 हेक्टर आणि बाधित खाजगी क्षेत्र 1385 हेक्टर एवढे आहे.

सभापती महोदय, निधीची कमतरता आहे, हे मला मान्य आहे. परंतु, बाहेरकाट्यातून येणारे पाणी थांबविण्यासाठी, शेत जमिनींमध्ये येणारे समुद्राचे खारे पाणी थांबविण्यासाठी आपल्याकडे निधी नाही. म्हणून तेथे मॅनग्रोव्ह येतात.

सभापती महोदय, माझे मूळ गाव डेरड आहे. त्या गावाच्या पलीकडे मानकुळे आणि बहिणीचा पाडा ही गावे आहेत. मी ही गावे दाखविण्यासाठी मंत्री महोदयांना स्पीड बोटने नेणार आहे. ते शेतकरी आहेत. त्यामुळे त्यांना याची जाण आहे. तेथील 4 हजार एकर जमिनीमध्ये पूर्णपणे मॅनग्रोव्ह झाले आहेत. याचे कारण असे आहे की, कोणताही खाजगी मुंबईकर 10 एकर जमीन घेतो. खाजगी क्षेत्रामधील बाहेरकाटा आमच्या काठी प्रमाणे वाटला जातो. एका शेतकऱ्याने एक करायचा, दुसऱ्या शेतकऱ्याने एक करायचा, असे असते. ज्या मुंबईकराने जमीन घेतली आहे, तो हे करीत नाही. त्यामुळे त्याचा हिस्सा कोणी करायचा, हा खरा प्रश्न रायगड जिल्ह्यामध्ये निर्माण झाला आहे. याबाबत शासनाने तातडीने वेगळा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शेती पूरक रस्त्यांसाठी नाबार्डकडून निधी मिळत असतो. हा निधी आपण इतर कामांसाठी वापरतो. तशा प्रकारची विनंती आम्ही लोकप्रतिनिधीही शासनाला करीत असतो. नाबार्ड अंतर्गत किनारपट्टीचे पक्के रस्ते करण्यासाठी घेतलेल्या कामांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे. अगदी पक्षनिहाय ज्याचे जेवढे वजन असेल त्याला खार लॅण्डचे अधिकारी पैसे वाटतात. ही वस्तुस्थिती आहे. त्यावर आपल्याला उपाय करावा लागेल. खाडी क्षेत्रालगत असलेल्या भात शेतीचे संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासन कशा प्रकारे घेणार आहे ?

----------

...5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे (जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री) : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर विषय आहे. सततची भरती आणि ओहोटी यामुळे बांधांची खूप हानी होते. बोर होण्याअगोदर साधारणत: रायगड जिल्ह्यातील 165 योजनांव्दारे 22559 हेक्टर क्षेत्र पुनर्प्रस्थापित करण्याचे नियोजन असून 133 योजनांव्दारे 20065 क्षेत्र पुनर्प्रस्थापित झाले आहे. पूर्ण झालेल्या 133 योजनांपैकी 116 योजनांची बांधकामे ईईसी टप्पा क्रमांक 1 अंतर्गत झाली असून पुन्हा ती कमकुवत होतात. या झालेल्या 66 योजनांच्या नूतनीकरण कामावर आतापर्यंत 10.50 कोटी रुपये खर्च झालेला आहे. सद्य:स्थितीत नाबार्ड 16,17 व 19 अंतर्गत रायगड जिल्ह्यातील 28 योजनांचे नूतनीकरण व नवीन दोन योजना, अशा 41.57 कोटी एवढ्या रकमांच्या एकूण 3 खारभूमी योजनांना मान्यता मिळालेली आहे.

सभापती महोदय, या योजनेचे मापदंड जुने आहेत. या मापदंडात कामे करण्यास अडचण निर्माण होते. मापदंडाबाबत सर्वंकष विचार व्हावा, ही बाब सुध्दा सरकारच्या विचाराधीन आहे.

सभापती महोदय, नाबार्डबाबत मी आता खुलासा केला आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय चक्रीवादळ प्रकल्पात समाविष्ट, सन्माननीय सदस्यांची अतिशय आवडती नारवेल-बेनवेले योजनेअंतर्गत 1388 हेक्टर क्षेत्र सरंक्षित करावयाचे आहे व त्याची किंमत 10.98 कोटी रुपये आहे. यासाठी वर्ल्ड बँकेकडून निधी मिळणार आहे. परंतु, या बँकेने काही त्रुटी काढल्या होत्या. त्याची पूर्तता करुन नवीन सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर झाला आहे. लवकरात लवकर या महत्त्वाच्या योजनेबाबत निर्णय घेण्याच्या मन:स्थितीत सरकार आहे.

-------------

...6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जयंतराव जाधव)**

**पृ.शी.**: बीड जिल्ह्यातील कर्जमाफी झालेल्या बलुतेदार सहकारी संस्थांना कर्जमाफी होऊनही बँकांनी कर्ज फेडीसाठी लावलेला तगादा

**मु.शी.**: बीड जिल्ह्यातील कर्जमाफी झालेल्या बलुतेदार सहकारी संस्थांना कर्जमाफी होऊनही बँकांनी कर्ज फेडीसाठी लावलेला तगादा या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 49412 ला दिनांक 3 जून, 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.अमरसिंह पंडित यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, "बीड जिल्ह्यातील कर्जमाफी झालेल्या बलुतेदार सहकारी संस्थांना कर्जमाफी होऊनही बँकांनी कर्ज फेडीसाठी लावलेला तगादा", या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 49412 ला दिनांक 3 जून, 2014 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, कर्जमाफी देण्याबाबतचा निर्णय सन 2008 मध्ये झाला आहे. बलुतेदार संस्थांना कर्जाच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी राज्य सरकारने प्रस्ताव मागविले, पूर्ण माहिती मागविली. परंतु, दुर्दैवाने आजतागायत संबंधित बँकांकडून पूर्ण कर्जमाफी झाल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र संस्थांना मिळालेले नाही. याचे कारण हे आहे की, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडून या बँकांना कर्जमाफी रकमेची प्रतिपूर्ती करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, या विभागाच्या मंत्री महोदयांनी अनौपचारिकरित्या असे सांगितले आहे की, मार्च महिन्यात हा निधी देण्यात येणार आहे. बलुतेदारांच्या कर्जमाफी संबंधीचा हा विषय आहे. मंत्री महोदय जर स्पेसिफिक उत्तर देणार असतील तर लांबलचक भाषण करण्याऐवजी एकच प्रश्न विचारुन मी थांबतो. बलुतेदारांना कर्जमाफी देण्याच्या हेतूने शासन तातडीने निर्णय घेणार आहे का ?

-----------

...7.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दादाजी भुसे (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बीड जिल्ह्यापुरता हा प्रश्न उपस्थित केला असला तरी संपूर्ण राज्यात महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग महामंडळाअंतर्गत बलुतेदार सहकारी संस्थांना कर्ज वाटप करण्यात आले होते. काही कारणास्तव सदरचे कर्ज वसूल न झाल्यामुळे सन 2012 मध्ये कर्जमाफी करण्यासंबंधी तत्त्वत: निर्णय घेण्यात आला होता.

यानंतर श्री.वि.खर्चे..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दादाजी भुसे..

साधारणत: 82,731 सभासद आहेत, 311 संस्था आहेत, यांची मूळ कर्जाची रक्कम 43 कोटी 97 लाख रुपये आहे. त्यावरील व्याज 35 कोटी 18 लाख रुपये झाले आहे. अशी एकत्रित रक्कम 79 कोटी 16 लाख रुपये आहे. ही सर्व रक्कम माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सन 2015-2016 च्या बजेट अधिवेशनात मध्ये उद्योग विभागाच्या माध्यमातून रकमेची तरतूद करण्यात येईल व बलुतेदार सहकारी संस्थांचे कर्ज माफ करण्यात येईल. तोपर्यंत या संस्थांकडे कर्जाचा तगादा लावण्यात येऊ नये असे आदेश शासनाच्या वतीने सर्व संबंधितांना देण्यात येतील.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विना अनुदानित सेवा वेतन निश्चिती, वरिष्ठ व निवड श्रेणी यासाठी ग्राह्य न धरणे.

**मु.शी.**: विना अनुदानित सेवा वेतन निश्चिती, वरिष्ठ व निवड श्रेणी यासाठी ग्राह्य न धरणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"शालेय शिक्षण विभागाने आदेश निर्गमित करुन शिक्षक-शिक्षकेतरांची विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळेतील मान्यता प्राप्त सेवा वेतन निश्चितीसाठी ग्राह्य धरण्याचा निर्णय घेणे, तंत्रशिक्षण विभागातील अनेक निदेशकांना व कर्मचाऱ्यांना विनाअनुदान तत्वावर मान्यता असणे, मान्यता प्राप्त विनाअनुदानित सेवा वेतन निश्चितीसाठी ग्राह्य न धरण्याचा निर्णय सहसंचालकांनी घेणे, काही प्रकरणांमध्ये विनाअनुदानित सेवा वेतन निश्चितीसाठी ग्राह्य धरण्याचा निर्णय घेणे, घेतलेला निर्णय पुन्हा रद्द करणे, विनाअनुदानित सेवा वेतन निश्चितीसाठी ग्राह्य न धरल्याने कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होणे, उच्च न्यायालयाने व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने निर्देश देऊनही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय, अर्धा तास चर्चेचा विषय असा आहे की, तंत्रशिक्षण विभागात काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तंत्र माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतरी कर्मचारी आणि एमसीव्हीसीमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी असतील तसेच तंत्र शिक्षण विभागात काम करणारे पूर्णवेळ शिक्षक, निदेशक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संदर्भातील विषय मी उपस्थित केला आहे.

सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय छोटा आहे, कर्मचारी ज्या संस्थेत काम करतात त्या संस्था अगोदर विना अनुदानित तत्वावर असतात. शासनाकडून टप्प्या टप्प्याने या संस्थांना व संस्थेत काम करणाऱ्या परंतु मान्यता असणाऱ्या कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना शासनाकडून वेतन मिळते. शासनाकडून किंवा विभागाकडून कर्मचारी ज्या दिवशी अनुदानावर येतात किंवा त्यांची नियमित सेवा सुरु होते तेव्हा पासूनचा कालावधी वेतन निश्चितीसाठी, त्यांच्या बारा वर्षाच्या वरिष्ठ





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..

श्रेणीसाठी किंवा 24 वर्षाच्या निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरला जातो. त्या कर्मचाऱ्यांची विनाअनुदानित किंवा अस्थायी सेवा त्यांना मिळणाऱ्या अन्य लाभासाठी ग्राह्य धरली जात नाही. हाच विषय तंत्रशिक्षण व व्यावसायिक शिक्षण विभागात आहे, तोच विषय शालेय शिक्षण विभागात देखील होता. शालेय शिक्षण विभागाने दिनांक 28 नोव्हेंबर 2006 रोजी आणि 6 मे 2014 रोजी स्पष्ट शासन आदेश काढले आहेत. त्यांची विनाअनुदानित व अस्थायी सेवा वेतन निश्चितीसाठी, वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी किंवा निवड श्रेणीसाठी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्याचा निर्णय घेतला आहे. एका विभागाने निर्णय घेतला व त्या कर्मचाऱ्यांना सर्व फायदे दिले आहेत. दुसऱ्या विभागाने त्याप्रमाणे निर्णय घेण्याची आवश्यकता व अपेक्षा आहे, तसा निर्णय अद्यापही घेण्यात आलेला नाही. गेल्या अनेक वर्षापासून मी सातत्याने प्रयत्न करीत आहे. मला असे उत्तर मिळाले आहे की, आर्थिक बोजा किती पडेल यासाठी वित्त विभागाची परवानगी घ्यावी लागेल, या संदर्भातील माहिती घेण्यात येत आहे. या संदर्भातील लेखी उत्तरे मला आली आहेत. या अर्धातास चर्चेच्या माध्यमातून शासनाला माझी विनंती आहे की, शालेय शिक्षण विभागाने ज्या पध्दतीने निर्णय घेतला, त्याच पध्दतीने उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाने तंत्र विद्यालयात काम करणारे शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी, एमसीव्हीसीचे शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी, यांची अस्थायी सेवा वेतन निश्चितीसाठी ग्राह्य धरावी. त्यांची विनाअनुदानित सेवा वरिष्ठ आणि निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरावी. यासंदर्भातील आदेश मंत्री महोदय किती दिवसात काढणार आहेत. या संदर्भातील ठोस आश्वासन मिळावे अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

------- ..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रवींद्र वायकर (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी जी अर्धातास चर्चा उपस्थित केली आहे. याबाबत त्यांनी असे सांगितले आहे की, शालेय शिक्षण विभागात ज्या पध्दतीने निर्णय झाला तसा निर्णय तंत्र शिक्षण विभागात देखील व्हावा. या विषयाचे दोन गट पडतात. कायम विनाअनुदानित तत्वावर शाळांना मान्यता देणे आणि विना अनुदान तत्वावर शाळांना मान्यता देणे. विना अनुदान तत्वांच्या शाळांबाबत जो निर्णय घेण्यात आला आहे, तो निर्णय इतर शाळांसाठी घ्यावायाचा असेल आणि या शाळांमधील 431 शिक्षकांना त्याचा लाभ देण्यासाठी जवळपास 404 कोटी 25 लाख रुपयांची गरज लागणार आहे. विना अनुदान तत्वाच्या माध्यमिक शाळेतील शिक्षकांनी केलेली सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात यावी. याबाबत माननीय उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकेच्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाने दिनांक 28 नोव्हेंबर 2006 रोजी शासन निर्णय काढला आहे. या विभागाने घेतलेल्या निर्णयाच्या धर्तीवर तंत्र शिक्षण विभागात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. आपण असे सांगितले आहे की, लवकरात लवकर हा निर्णय घेण्यात यावा. सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, ही बाब वित्त विभागाशी निगडित आहे त्या विभागाशी लवकर चर्चा करुन येत्या तीन महिन्यात या संदर्भातील निर्णय घेण्यात येईल. त्या संदर्भातील माहिती आपणाला कळविण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे, हा प्रश्न सोडविण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. मंत्री महोदयांकडून माझी इतकीच अपेक्षा आहे की, पुढील अधिवेशनात हा विषय पुन्हा कोणत्या ना कोणत्या आयुधाचा उपयोग करुन सभागृहात मांडण्याची वेळ येणार नाही याबाबत त्यांनी खात्री द्यावी.

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, पुढील अधिवेशनापूर्वी सन्माननीय सदस्यांना या संदर्भातील निर्णय कळविण्यात येईल.

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, हा विषय एका मूलभूत संकल्पनेशी संबंधित आहे. शासनाचे धोरण कायम विना अनुदान तत्वावर शाळांना मान्यता देणे, विना अनुदान तत्वावर शाळांना मान्यता देणे व अनुदान तत्वावर शाळांना मान्यता देणे. परंतु या शाळांमध्ये काम करणाऱ्या

..5..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा एकाच कायद्याच्या व नियमाच्या अखत्यारीत येतात. त्यामध्ये शाळा कायम विना अनुदान तत्वावर आहे, विना अनुदान तत्वावर आहे किंवा अनुदान तत्वावर आहे या आधारावर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या कायदेशीर लाभापासून वंचित ठेवता येणार नाही. त्यामुळे माझी मागणी अशी आहे की, विना अनुदान तत्वावर काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, कायम विना अनुदान तत्वावर काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी किंवा अनुदान तत्वावर काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सर्व प्रकारचे आर्थिक आणि अन्य लाभ देण्याबाबत शासनाने तत्काळ निर्णय घ्यावा अशी माझी मागणी आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सकारात्मक दिशेने उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. मंत्री महोदयांनी एकदा आश्वासन देऊन देखील हा प्रश्न आम्हाला वारंवार सभागृहात उपस्थित करावा लागतो. सभापती महोदय, आपणाला देखील शिक्षणाची जाणीव आहे. शालेय शिक्षण विभागाने सन 2006 मध्ये शालेय शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी ज्या सेवा शर्ती आहेत त्या तंत्र शिक्षण विभागासाठी देखील लागू केल्या आहेत. असा धोरणात्मक निर्णय शासनाने अनेक वर्षापूर्वी घेतला आहे. एखादा निर्णय शालेय शिक्षण विभागात झाला तर तो निर्णय जशाचा तसा तंत्र शिक्षण विभागाला लागू होतो. परंतु आम्ही शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय घेऊन तंत्र शिक्षण विभागात जातो व असा शासन निर्णय काढा असे सांगतो. त्या विभागात कागदी घोडे नाचविल्याशिवाय दुसरे काहीही होत नाही. हा प्रश्न आम्ही गेल्या 8 वर्षापासून सभागृहात उपस्थित करीत आहोत. मंत्री महोदयांनी तीन महिन्यात याबाबत निर्णय घेऊ असे उत्तर दिले आहे. मंत्री महोदयांकडून आम्हाला ठोस उत्तराची अपेक्षा आहे. आपण कार्य कर्तृत्ववान आमदार होता आता मंत्री झाला आहात, यासाठी तरतूद करण्यासाठी मार्च महिन्यातील बजेट अधिवेशन आहे. आर्थिक तरतुदीसह हे शैक्षणिक वर्ष संपण्याअगोदर शासन निर्णय काढणार आहात काय ? सन्माननीय सदस्य श्री. नागो गाणार म्हणाले, त्यानुसार हा फक्त विना अनुदान काळातील शिक्षकांचा व शिक्षकेतर कमचाऱ्यांचा विषय आहे. त्याच प्रमाणे काही कायम विनाअनुदानित देखील संस्था आहेत. त्यांची सेवा देखील अशा प्रकारे ग्राह्य धरण्यासाठी शासन निर्णय काढण्यात येईल काय ?

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, होय.

या नंतर श्री.मा.शिगम..

अस्पष्टांकित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ AKA/ MMP/ पूर्वी श्री. व्ही खर्चे 11:10

श्री. श्रीकांत देशपांडे : शासकीय आयटीआय मध्ये मागील 5-6 वर्षापासून विहित पध्दतीने कंत्राटी पद्धतीवर निदेशकांची भरती झालेली आहे. त्यांची जरी कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती झालेली असली तरी त्यांना सलग 5-7 वर्षे सेवेचा अनुभव आहे. भविष्यामध्ये या निदेशकांना निवडश्रेणी किंवा वरिष्ठ निवडश्रेणीचा लाभ देतांना त्यांनी कंत्राटी पध्दतीवर केलेल्या सेवेचा फायदा देण्यात येईल काय ?

श्री. रवींद्र वायकर : ही बाब तपासून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

--

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात महिला, बालके आणि अनुसूचित जमातीच्या व्यक्तींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ

**मु. शी.** : राज्यात महिला, बालके आणि अनुसूचित जमातीच्या व्यक्तींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ यासंबंधी डॉ. नीलम गो-हे, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"पुरोगामी महाराष्ट्रात महिला, बालके आणि अनुसूचित जातीच्या व्यक्तींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठी वाढ होत असून महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांत ४६ टक्क्यांनी वाढ होणे, दहा वर्षाच्या खालील मुलींवर अत्याचाराच्या अडीचशे घटना घडल्याचे निदर्शनास येणे, अनुसूचित जातीच्या व्यक्तींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये ५३ टक्क्यांनी वाढ होणे, या सर्व घटनांना आळा घालण्याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, राज्यामध्ये महिला, बालके तसेच अनुसूचित जातीच्या व्यक्तींवर होणाऱ्या अत्याचारामध्ये जवळ जवळ 46 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. गुन्हे शाबित होण्याचे प्रमाण 6-7 टक्क्यावरुन 13-14 टक्क्यापर्यंत गेलेले आहे. या अत्याचाराच्या वर्णनामध्ये मी जाणार नाही. नागपूरमध्ये झालेल्या शिक्षिकेवरील बलात्कार असेल, अल्पवयीन मुलींवर झालेले बलात्कार असतील, भंडाऱ्यामध्ये झालेले विविध अत्याचार असतील या सर्व घटनांतील आरोपींना पकडण्यासाठी आणि पुनश्च अशा प्रकारचे गुन्हे होऊ नयेत यासाठी कडक पावले उचलण्याची गरज आहे याकडे मी माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते. पहिली बाब अशी की, अशी घटना कुठे घडते किंवा अत्याचार होतो त्यावेळी त्या महिलेची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी तिला हॉस्पिटलमध्ये नेले जाते. वर्मा कमिटीच्या रिपोर्ट नंतर सर्व हॉस्पिटल्सना मेडिकल प्रोटोकॉल लागू करण्यात आला. यामध्ये पोलिसांची देखील जबाबदारी आहे. महिलेला हॉस्पिटलमध्ये नेल्यानंतर तिच्यावर योग्य प्रकारे औषधोपचार केला पाहिजे, तिचे समुपदेशन केले पाहिजे. नागपूर मधील मेयो हॉस्पिटलचा अपवाद वगळता, तसेच पुण्यामधील ससून हॉस्पिटल आणि मुंबईतील काही

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

ठराविक हॉस्पिटलचा अपवाद वगळता अन्य ठिकाणी पीडित महिलेची, बलात्कारीत महिलेची तपासणी आणि औषधोपचार हे मेडिकल प्रोटोकोलनुसार होत नाहीत. या संदर्भात शासन कोणती पावले उचलणार आहे याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 2010 मध्ये एक समिती नेमली होती. या समितीने शासनाच्या सर्व विभागांबरोबर काम करुन जवळ जवळ 70 सूचना राज्य सरकारला केल्या होत्या. दिनांक 2 डिसेंबरला या समितीने राज्य शासनाला अंतिम अहवाल सादर केला. समितीने केलेल्या शिफारशींपैकी काही शिफारशींची अंमलबजावणी विभागांनी केली असली तरी न्यायमूर्ती धर्माधिकारी साहेबांनी सरकार पुढे कोणती कारवाई करणार आहे यासंबंधी म्हणजे ॲक्शन टेकन संबंधी चिंता व्यक्त केली आहे. तेव्हा न्यायमूर्ती धर्माधिकारी समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत शासन कोणती पावले उचलणार आहे याचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा.

सभापती महोदय, पुणे, नागपूर, मुंबई या सारख्या शहरामधील जवळ जवळ 50 टक्क्या पेक्षा जास्त अधिकारी हे त्यांच्या बदल्या त्याच जिल्ह्यामध्ये अथवा शहरामध्ये करुन घेतात. पुणे जिल्ह्याची परिस्थिती अशी आहे की, पुणे शहरातील अधिकारी आपली बदली ग्रामीण रेल्वेमध्ये करुन घेतात, रेल्वेमधून एटीएसमध्ये करुन घेतात. जवळ जवळ 50 टक्क्यापेक्षा जास्त अधिकारी हे त्या त्या जिल्ह्यामध्ये कॉन्सन्ट्रेट झालेले आहेत. ज्या गुन्ह्यांचा तपास लागलेला नाही अशा गुन्ह्याचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे.ज्या गुन्ह्यांचा तपास लागलेला आहे, ज्या चौकशी अधिका-याने चांगले काम केलेले आहे अशा अधिकाऱ्याला पदोन्नती दिली पाहिजे. परंतु पदोन्नतीसाठी हा निकष न लावल्यामुळे गुन्हे शाबित होण्याच्या कामाला कुठे तरी फटका बसतो. म्हणून याबाबतीत देखील लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, विविध ठिकाणचे तडीपार केलेले गुंड हे तडीपारीमधून सुटतात आणि दुसऱ्या जिल्ह्यामध्ये जाऊन गुन्हे करतात. या तडरपार गुंडाची तडीपारी मंत्रालयातून कोण रद्द करते ? गेल्या वर्षभरामध्ये जे गुंड तडीपार झालेले आहेत आणि ज्यांची तडीपारी रद्द झालेली आहे

..4..



MSS/ AKA/ MMP/ पूर्वी श्री. व्ही खर्चे 11:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

त्याबाबतीत पुन्हा आढावा घेऊन वेळीच त्याबाबतीत गंभीर स्वरूपाची कारवाई शासन करणार आहे काय ?

----

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. राम शिंदे ( गृह (ग्रामीण) राज्यमंत्री) : या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गो-हे यांनी महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. न्यायमूर्ती धर्माधिकारी समितीची 9 जुलै 2010 रोजी स्थापना झाली. या समितीच्या माध्यमातून 5 अंतरिम अहवाल आणि शेवटचा अंतिम अहवाल देण्यात आलेला आहे. अंतरिम अहवालामध्ये एकूण 141 शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी 109 शिफारशी स्वीकारण्यात आलेल्या आहेत. स्पेशल टास्क फोर्सकडे खात्याच्या माध्यमातून 21 शिफारशी सोपविलेल्या आहेत. दिनांक 15.11.2014 रोजी अंतिम अहवाल सादर झाला. अंतिम अहवालामध्ये 32 शिफारशी केलेल्या आहेत. त्यांची छाननी सुरु आहे. गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. दिल्लीमध्ये झालेल्या निर्भया हत्याकांडानंतर 376 कलमामध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानुसार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार आल्यानंतर पोलिसांनी ताबडतोब ती तक्रार नोंदवून घ्यावी अशा प्रकारच्या सूचना सर्व पोलीस स्टेशनला दिलेल्या आहेत. गुन्ह्यांमध्ये वाढ झालेली असली तरी आवश्यक त्या सर्व उपाययोजना खात्याच्या माध्यमातून तसेच एनजीओला बरोबर घेऊन केलेल्या आहेत. पीडित महिलेची तपासणी मेडिकल प्रोटोकॉल प्रमाणे व्हावी अशी सन्माननीय सदस्यांनी सूचना केली. त्यांनी असेही सांगितले की, नागपूर, पुणे, मुंबई या ठिकाणी मेडिकल प्रोटोकॉलप्रमाणे तपासणी होते. अन्य ठिकाणी मेडिकल प्रोटोकॉल प्रमाणे तपासणी होत नसेल तर तेथे देखील मेडिकल प्रोटोकॉल प्रमाणे तपासणी करण्याच्या सूचना देण्यात येतील.

सन्माननीय सदस्यांनी पोलिसांच्या बदल्यांचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला. अनेक वेळा अधिकारी एका पदावरुन दुसऱ्या पदावर बदली होत असताना त्याच जिल्ह्यामध्ये अथवा शहरामध्ये राहतात आणि याचा परिणाम गुन्हे अन्‌डिटेक्टेड राहतात तरीही त्यांना पदोन्नती देण्यात येते, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. बदल्या करताना याबाबतीत रिव्ह्यू घेतला जाईल. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा आधार घेऊन पुढील कालखंडामध्ये कार्यवाही केली जाईल. तडीपार झालेल्या गुंडांच्या बाबतीत खालच्या स्तरावरुन कारवाई होत असताना त्यास मंत्रालयीन स्तरावरुन स्थगिती देण्यात येते असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. या संदर्भात मी सांगू इच्छितो की,

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तडीपारीच्या संदर्भात पुन्हा एकदा रिव्ह्यू घेऊन, गुन्हेगारा विरुध्द काय कारवाई केली, ती कोणी केली, त्याच्या पाठीमागे कोण आहे याचा आढावा घेऊन तडीपारी करण्याची आवश्यकता असेल तर तडीपारीची कारवाई निश्चितच करण्यात येईल.

--

...नंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्यासाठी महिला गेल्यानंतर तिच्याशी योग्यप्रकारे बोलले जात नाही. तक्रार करण्यासाठी गेलेल्या महिलेला जबानी देण्यासाठी 10 ते 12 तास थांबावे लागते. अनेकदा असे तक्रारदार उपाशी थांबलेले असतात. दुसऱ्या दिवशी त्यांची सुटका होते. फिर्यादी हेच जणू काही आरोपी आहेत अशी त्यांना वागणूक मिळते. त्यामुळे पोलीस स्टेशनना मार्गदर्शक सूचना देऊन संवेदनशीलता वाढविण्याबाबत सरकार विचार करणार आहे काय?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, पीडित महिला पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्यास गेल्यानंतर तिला 10 ते 12 तास थांबून ठेवून गुन्हयाची नोंद करुन घेतली जात नसेल, पोलीस अधिकारीकडून जाणीवपूर्वक असे प्रकार केले जात असतील तर माननीय सदस्यांनी स्पेसिफीक माहिती शासनाला द्यावी, ती माहिती तपासून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, अनुसूचित जातीच्या व्यक्ती, महिला व बालकांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे, ही राज्याच्या दृष्टीने शरमेची गोष्ट आहे. अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याखाली ज्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविला जातो त्याचा तपास योग्य प्रकारे होत नाही असे आढळून आले, संबंधित पोलीस अधिकारी अकार्यक्षम ठरत असतील तर त्यांच्या कामाचा आढावा घेऊन त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्याचे धोरण गृह खाते अंमलात आणणार आहे काय?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यांतर्गत गुन्हा नोंदविला जातो त्याबाबत कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा झाला असेल तर माननीय सदस्यांनी एखादे उदाहरण निदर्शनास आणून द्यावे. अशा प्रकारच्या गुन्हयाची चौकशी डीवायएसपी दर्जाचे अधिकारी करीत असतात. अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यान्वये चैकशी करणे आणि गुन्हा नोंदविणे याबाबत हलगर्जीपणा केला असेल तर सक्त सूचना देण्यात येतील आणि आवश्यक ती कारवाई सुध्दा करण्यात येईल.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये महिलांवरील अत्याचारात वाढ झाल्याबाबत अनेक संस्थांचे अहवाल आले असल्याचे शासनाने मान्य केले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी, महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे नोंदवून घेण्यासाठी स्वतंत्र महिला पोलीस ठाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर........

निर्माण केले नसले तरी पोलीस ठाण्यामध्ये महिलासांठी वेगळा कक्ष स्थापन करण्याबाबत सूतोवाच केले होते. त्यानुसार पोलीस ठाण्यांमध्ये महिलांसाठी वेगळा कक्ष केव्हा स्थापन करण्यात येईल? सध्या वृत्तपत्रातून असे वाचावयास मिळते की, एसीबीकडून दररोज पोलीस अधिकारी भ्रष्टाचाराच्या प्रकरणात पकडले जात आहेत. राज्यातील संपूर्ण पोलीस दल भ्रष्ट आहे असे मी म्हणणार नाही. परंतु भ्रष्टाचार निश्चितपणे बोकाळला आहे. गेल्या वर्षभराच्या काळात मोठया प्रमाणात एसीबीने पोलीस अधिकाऱ्यांना पकडले आहे. या संदर्भात शासन कोणती कारवाई करणार आहे?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, महिलांवरील अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी राज्यस्तरीय महिला अत्याचार कक्षाची स्थापना दिनांक 29.9.1995 रोजी करण्यात आली. सदर कक्षाचे कार्यालय पुणे येथे असून विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी या कक्षाचे प्रमुख म्हणून काम करतात. समितीच्या शिफारशीच्या अंमलबजावणीच्या संदर्भात सूचना करण्यात आली आहे. म्हणून प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कक्ष व पोलीस स्टेशनच्या आवारात महिला समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. याबाबत सुध्दा समितीची शिफारस आलेली आहे. माननीय सदस्यांनी सांगितलेल्या सूचनेचा आदर राखून निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल. भ्रष्टाचाराच्या संदर्भात जो मुद्दा मांडला आहे, त्याबाबत सांगू इच्छितो की, निश्चितपणे शासनाने सूचना दिल्या आहेत. माननीय सदस्यांनी दिरंगाई किंवा हलगर्जीपणा झाल्याचे उदाहरण निदर्शनास आणून दिले तर ती बाब तपासून कारवाई करण्यात येईल.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे जिल्हयामध्ये आदिवासी व्यक्तींच्या नावावरील जमिनींची बिगर आदिवासी व्यक्तींकडून होत असलेली खरेदी

**मु. शी.** : पुणे जिल्हयामध्ये आदिवासी व्यक्तींच्या नावावरील जमिनींची बिगर आदिवासी व्यक्तींकडून होत असलेली खरेदी यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"पुणे जिल्हयात जुन्नर, मावळ, मुळशी व भोर तालुक्यातील 360 गावांमधील आदिवासींकडे साधारणत: चाळीस हजार हेक्टरहून अधिक जमिनीची मालकी असणे, राज्य सरकारच्या परवानगी शिवाय आदिवासींच्या जमिनीची खरेदी विक्री करण्यावर राज्य सरकारने निर्बंध घातलेले असणे, बिगर आदिवासी व्यक्तींमार्फत मोठया प्रमाणात आदिवासींच्या जमिनी पुण्यात खरेदी केलेल्या असणे, पुणे जिल्हयात बिगर आदिवासी व्यक्तींनी राज्य सरकारची परवानगी न घेता खरेदी केलेल्या जमिनी मूळ मालक असलेल्या आदिवासींना परत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही "

सभापती महोदय, पुणे जिल्हयातील या पाच तालुक्यातील आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासी व्यक्तींकडून शासनाची परवानगी न घेता खरेदी करण्यात आल्या आहेत. या जमिनी आदिवासींना परत करण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय?

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना घ्यायची असेल तर राज्य शासनाची परवानगी धेणे आवश्यक आहे. अशा विना परवानगी जमिनींचे हस्तांतरण झाले असेल, खरेदी विक्री व्यवहार झाले असतील तर ते बेकायदेशीर आहेत. आदिवासींची फसवणूक करुन शासनाची परवानगी न घेता जर बिगर आदिवासींनी त्यांच्या जमिनी घेतल्या असतील तर त्या जमिनी परत करण्याची कार्यवाही सुरु आहे. या भागात 66 व्यवहार झालेले आहेत. त्या प्रकरणातील जमिनी परत घेण्यात आल्या, तपासणीची मोहीम सुरु आहे. तक्रारी आल्या तर तातडीने कारवाई करुन ते व्यवहार रद्द ठरवून आदिवासींच्या जमिनी त्यांना परत देण्याबाबत शासन कार्यवाही करीत आहे.

श्री.अनिल भोसले : अशा जमीन व्यवहाराच्या अनेक केसेस प्रलंबित आहेत. आदिवासी बांधवांनी शासनाकडे तक्रार अर्ज दाखल केले आहेत. परंतु त्या अर्जाची दखल घेतली गेली नाही. वारंवार हे आदिवासी बांधव शासकीय कार्यालयात दाद मागण्यासाठी जातात परंतु त्यांना न्याय मिळालेला नाही. भविष्यात शासनाची परवानगी न घेता आदिवासींच्या जमिनी विकत घेतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल काय?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, पुणे जिल्हयातील जुन्नर, आंबेगाव, मावळ, मुळशी, खेड व भोर या 6 तालुक्यातील 362 गावांमध्ये 44319.31 हेक्टर जमीन आदिवासी खातेदारांच्या नावावर आहेत. या जमिनीची शासनाच्या परवानगीशिवाय खरेदी विक्री करता येत नाही. यासाठी राज्य सरकारने दक्षता घेतली आहे. काही सूचना दिलेल्या आहेत. आदिवासींच्या जमिनी राज्यभर आहेत. त्या जमिनींच्या दस्तऐवजावर लाल रंगामध्ये 'अहस्तांतरणीय' अशा स्वरुपाचा शिक्का मारण्याच्या सूचना तलाठ्यांना दिलेल्या आहेत. अशा जमिनींचे हस्तांतरण करता येणार नाही. अशा स्वरुपाचा शिक्का मारण्याची कार्यवाही सुरु आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आम्ही रजिस्ट्रारला सुध्दा सूचना दिल्या असून अशा स्वरुपाचे व्यवहार ग्राह्य धरले जाणार नाहीत. जर अशा स्वरुपाचे खरेदी विक्री व्यवहार कोणी केले असतील तर त्याबाबत आणखी एक सूचना दिलेली आहे. तो आदिवासी स्वत: रजिस्ट्रारच्या समोर हजर असला पाहिजे. पॉवर ऑफ

...5..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे......

ॲटर्नीद्वारे जमीन खरेदी करता येणार नाही अशाही सूचना दिलेल्या आहेत. आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींकडे शासनाच्या परवानगी शिवाय जाता कामा नये यासाठी शासनाने काळजी घेतली आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मुंबई उपनगर जिल्हयात मालाड, कांदिवली, बोरीवली आणि दहिसर या परिसरात आदिवासी पाडे आहेत. 7/12 च्या उताऱ्यावर आदिवासींच्या नावाची नोंद असताना बोगस 7/12 उतारे तयार करुन त्यात खोट्या नोंदी दर्शवून आदिवासी लोकांच्या जमिनीवर बिगर आदिवासी लोकांनी कब्जा केला आहे.

नंतर जे.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .......

आणि मोठमोठी बांधकामे झालेली आहेत त्यासंदर्भात आदिवासींनी तक्रारी नोंदविल्या असतानाही त्यांना न्याय मिळाला नाही म्हणून शासन पुन्हा एकदा या आदिवासींना न्याय मिळण्यासाठी संधी उपलब्ध करुन देणार काय ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, कांदिवली, मालाडसारख्या भागातच नव्हे तर संपूर्ण राज्यात आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरणाचे अशा प्रकारचे बेकायदेशीर व्यवहार झाले असतील ते सर्व व्यवहार रद्द करण्यात येतील तसेच विना परवाना ज्या खरेदी झाल्या असतील त्या जमिनी ताब्यात घेऊन त्या त्या आदिवासींना परत करण्याची कार्यवाही शासनाकडून केली जाईल.

श्री. भाई गिरकर : महोदय, अहमदाबाद रस्त्यावरील वडवली गावातील तसेच उल्हासनगर येथील भू माफियांनी आदिवासींना फसवून त्यांच्या जमिनी बळकावल्यासंबंधीची कागदपत्रे माझ्याकडे आहेत ते मी मंत्री महोदयांकडे सुपूर्द करतो, त्यानुसार त्यांनी कार्यवाही करावी.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री. जयवंतराव जाधव : महोदय, शासनाने आदिवासींच्या बाबतीत अत्यंत सकारात्मक भूमिका घेतलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे आभार व्यक्त करतो. पण अशी काही प्रकरणे आहेत की, आदिवासींना योग्य मोबदला मिळत असेल आणि त्यांना स्वत:ला त्यांची जमीन विकावयाची असेल तर तशी परवानगी शासन देणार काय ?

श्री. एकनाथराव खडसे : महोदय, आदिवासींनी आदिवासीलाच आपली जमीन विकण्यास परवानगी आहे. परंतु बिगर आदिवासीला जर आदिवासीची जमीन विकत घ्यावयाची म्हटले तर त्यासाठी जोपर्यंत शासनाची परवानगी मिळत नाही तोपर्यंत तसे करता येत नाही मधल्या काळात माजी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे आदिवासी आमदाराने तक्रारी केल्या होत्या की मोठ्या प्रमाणात आदिवासींना फसवून त्यांच्या जमिनीचे बेकायदेशीर व्यवहार करण्यात आले, त्यांच्या जमिनी खरेदी केल्या गेल्या किंवा आदिवासींचीच फसवून संमती घेतली जाते असे व्यवहार थांबवावेत. त्यावर तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी आदिवासी हक्क परिषदेच्या माध्यमातून हे झालेले व्यवहार तूर्त थांबविण्यात आल्याचे सांगितले होते. परंतु त्या निर्णयाच्या विरोधात एक आदिवासी उच्च न्यायालयात गेला आणि त्याने मागणी केली की, आमचीच जमीन असून ती आम्हाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे .........

विकण्याचा अधिकार आहे, अशा प्रकारे आमच्या अधिकारावर शासनाला गदा आणता येणार नाही अशी उच्च न्यायालयात त्याने भूमिका मांडली. त्यावर उच्च न्यायालयाने आदिवासींची जमीन विकण्याची परवानगी आहे असा निर्णय दिलेला आहे. परंतु राज्य शासनाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, अशा प्रकारे सरसकट आदिवासींच्या जमिनी विकता येणार नाहीत अन्यथा आदिवासी नागवला जाईल म्हणून पूर्वीची जी पध्दत होती तीच चालू ठेवण्यात यावी. पूर्वीच्या पध्दतीनुसार राज्य शासनाच्या परवानगीशिवाय आदिवासीची जमीन आदिवासीला सुध्दा घेता येणार नाही असा जो नियम आहे तो कायम ठेवावा अशी मागणी कोर्टाकडे शासनाने केली व कोर्टानेही ती मागणी मान्य केली. तसेच एखाद्या आदिवासीला बिगर आदिवासीला आपली जमीन विकत द्यावयाची असेल तर त्यासाठी शासनाची परवानगी आवश्यक आहे त्याशिवाय केलेला व्यवहार हा बेकायदेशीर ठरेल. यासंदर्भात सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत की, आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण बिगर आदिवासीकडे करीत असताना जमीन विकणाऱ्या आदिवासीकडे त्याच्या उदरनिर्वाहासाठी जमीन शिल्लक राहते की नाही, त्याची उपासमार होणार नाही अथवा तो भूमिहीन होणार नाही अशा सूचना दिलेल्या आहेत त्याच्या अधीन राहून अशा प्रकारची परवानगी राज्य शासन आजही देत आहे आणि यापुढे सुध्दा न्यायालयाच्या आदेशानुसार ही सर्व कार्यवाही करण्यात येईल.

-------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ AKA/ AKA/ MMP/ पूर्वी श्री. भोगले...... 11:30

**पृ.शी.**: गेवराई (जि. बीड) तालुक्यातील अनेक गावांमध्ये हरणांचा व रानडुकरांचा शेतकऱ्यांना होत असलेला त्रास

**मु.शी.**: गेवराई (जि. बीड) तालुक्यातील अनेक गावांमध्ये हरणांचा व रानडुकरांचा शेतकऱ्यांना होत असलेला त्रास या विषयावर श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी दिलेली अर्धा-तास चर्चा

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"गेवराई (जिल्हा बीड) तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या गावात रानडुक्कर व हरिणांच्या उपद्रवामुळे लाखो रुपयांच्या पिकाचे नुकसान होणे, रानडुक्करांनी शेतकरी व महिलांवर हल्ला केल्यामुळे अनेक शेतकरी या हल्ल्यात जखमी होणे, रानडुक्करांच्या भीतीपोटी मजुरांनी रोजंदारीवर जाणे बंद केल्यामुळे त्यांचेवर उपासमारीची वेळ येणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी त्वरित नुकसान भरपाईची मागणी करणे, प्रशासकीय दिरंगाई, जाचक अटींमुळे शासकीय मदत मिळण्यास होत असलेला विलंब, यामुळे शेतकऱ्यांत पसरलेली शासन विरोधी लाट, याबाबत शासनाने करावयाची सत्वर कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, मराठवाड्यातील गोदावरी नदीकाठच्या अनेक गावांमध्ये हरिण आणि रान डुकरांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात सुरु झालेला आहे. या जंगली श्वापदांच्या उपद्रवांमुळे या भागात खरे तर भुईमुगाचे पीक घेणे आता अशक्य झालेले आहे. साधा जनावरांसाठी चारा जरी उत्पादित करावयाचा असेल तरी तो सुध्दा घेणे शक्य नाही. या भागात हरणांची संख्या एवढी झालेली आहे की, एक-एक गावात 40-40 हरणांची कळपे पहायला मिळतात. तसेच रानडुकरे सुध्दा एक ते दीड क्विंटल एवढ्या मोठमोठ्या आकाराची असल्याने माजी वन मंत्र्यांनी सांगितल्यानुसार त्यांना आपण मारणे अथवा त्यांची शिकार करणे तर दूरच पण 50 फुटावरुन त्या डुकरांना आपण पाहूही शकत नाही. एका व्यक्तीवर अशाच एका रानडुकराने चावा घेण्यासाठी हल्ला केल्यानंतर जिवाच्या आकांताने तो ओरडत होता. शासनाने याबाबत सांगितले आहे की, जंगली जनावराने केलेल्या हल्ल्यानंतर मोफत औषधोपचार केला जाईल पण त्यात अनेकांचे जीव सुध्दा जातात. त्याचबरोबर शेतातील पिकांची नासाडी तर अत्यंत मोठ्या प्रमाणात ही जनावरे करीत असतात आणि शासनाने त्यासाठी देऊ केलेली नुकसान भरपाई अत्यंत तुटपुंजी आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे एकदा अशा जनावराने हल्ला केल्यानंतर त्यासाठी जी चौकशी समिती नेमण्यात आली

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित .......

त्यात कृषी अधिकारी, संबंधित तलाठी आणि त्या गावचा सरपंच इ. चा समावेश असतो. कृषी अधिकारी आणि तलाठ्याने पंचनामा केल्यानंतर त्या गावच्या सरपंचाने त्या पंचनाम्यावर सही करावयाची असते. पण सरपंचाचे अनेक वेळा असे म्हणणे असते की, त्या गल्लीतील अथवा त्या वॉर्डातील लोकांनी मला मतदान केलेले नसल्याने छोट्या छोट्या त्रुटी समोर आणून या पंचनाम्यावर सही करण्याचे टाळले जाते. त्यातून जी तुटपुंजी मदत मिळणारी असते ती मिळण्यात देखील अडचणी निर्माण होतात म्हणून ही समिती विसर्जित करुन त्यात केवळ कृषी अधिकारी आणि तलाठी यांचाच समावेश असावा. त्यांनी प्रत्येक महिन्यातील पंचनामे व त्यासंबंधीचे अहवाल संबंधित तहसीलदार व गट विकास अधिकारी यांच्याकडे सादर करावेत. त्या तहसीलदाराने या अहवालांच्या अनुषंगाने प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला याबाबतचे निर्णय दिले पाहिजे असे बंधन त्यांच्यावर घालण्यात यावे. एवढे सर्व करुन जी मदत मिळते ती 500 ते 600 रुपये इतकीच असल्याने ती घेण्यासाठी सुध्दा त्या व्यक्तीला तालुक्याच्या गावी जाणे परवडत नाही. ऊसाच्या बाबतीत सांगायचे तर अत्यंत कठीण परिस्थिती आहे. ऊसाचे नुकसान झाल्यास प्रति गुंठा केवळ 100 रुपये प्रमाणे मदत दिली जाते त्यात बदल होऊन कदाचित ही रक्कम आता 200 रुपये झाली असावी ती देखील अत्यंत कमी आहे, याचाही निर्णय होणे आवश्यक आहे. तसेच ऊसासाठी जंगली डुकरांचा प्रादुर्भाव इतक्या मोठ्या प्रमाणात आहे की, ही डुकरे ऊस मुळापासून उखडून टाकतात त्यामुळे शेतकऱ्याला नाईलाजाने तो सर्व ऊस आपल्या बैलगाडीवर घरी घेऊन जाण्याशिवाय पर्याय नसतो. एखादी व्यक्ती असाही विचार करु शकेल की दररोज शेतकरी बैलगाडीतून ऊस घरी कशासाठी नेत असेल पण त्याचे मुख्य कारण जंगली डुकरांनी मुळापासून ऊस खाऊन टाकल्याने किंवा हैदोस घातल्याने त्याला तो घरीच न्यावा लागतो. अशा प्रकारे त्या शेतकऱ्याचे 10 टनापर्यंतचे नुकसान होते. ऊसाच्या एफआरपी नुसार प्रति टन 1500 रुपये जरी धरले तरी 10 ते 15 हजाराचे नुकसान त्या शेतकऱ्याचे होत असते आणि या नुकसानीपोटी त्याला मिळणारी नुकसान भरपाई म्हणजे फक्त 1500 ते 1600 रुपये इतकीच असते. या नुकसानीचे पंचनामे करण्याची जी क्लिष्ट पध्दत आहे ती प्रक्रिया शासनाने सुलभ करावी तसेच या समितीत जे अधिकारी समाविष्ट केलेले आहेत त्यात केवळ कृषी अधिकारी आणि तलाठी यांचाच समावेश असावा.

यानंतर श्री. भारवि .........

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

केवळ वन विभागाचा एक प्रतिनिधी आणि महसूल विभागाचा एक प्रतिनिधी या दोघांच्या सहीने पंचनामा करून निकाल व निर्णय करण्याचा अधिकार तहसीलदारांना देणे गरजेचे आहे. आपण डुकरांना मारा असे सांगत आहात. पण ते एक क्विंटलचे डुक्कर मारायचे कोणी ? वेपनची परवानगी घ्यायची म्हटले तरी त्यास दीड ते दोन वर्षांचा कालावधी लागतो. ज्याला वेपन पाहिजे असते ते कशासाठी पाहिजे याची देखील चौकशी करण्यात येते. या कामासाठी शेतकऱ्याला 12 बोअर वेपनची परवानगी घ्यायची असेल तर त्यासंबंधातील जी काही प्रक्रिया आहे ती सुलभ केली पाहिजे. शेतकऱ्याची शेती जात असल्यामुळे तो वेपन घेऊ इच्छितो. तेव्हा वेपनची परवानगी देखील अधिक सुलभ होणे गरजेचे आहे. त्याही पेक्षा आपण शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी जी मदत करणार आहात त्याचे निकष बदलणे अत्यंत गरजचे आहे. आज शेतकऱ्यांना रक्कम वाढवून दिली पाहिजे. मी आपल्याला बीड जिल्ह्यातील उदाहरण सांगतो. आमच्या येथील नाईक नावाच्या आपल्याच विभागाच्या एका कर्मचाऱ्याने पंचनाम्यावर सही करण्यासाठी पावणेदोन महिने घेतले आहेत. त्या शेतकऱ्याला सात एकराचे नुकसान झाल्यामुळे 2900 रूपये मिळणार होते. त्या कर्मचाऱ्याला वाटले की, एका एकरासाठी 2900 रूपये मिळणार असतील तर ती फार मोठी रक्कम आहे. त्याने केवळ 400 रूपयांसाठी त्या पंचनाम्यावर सही केली नाही. तेव्हा निर्णय आणि निकाल देण्यासाठी निश्चित असा कालावधी आपण ठरवून द्यावा. एक महिन्याच्या आत निर्णय आणि निकाल लागेल असे आपण घोषित करावे. तसेच शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसंबंधी देखील आपणाकडून सकारात्मक उत्तराची मला अपेक्षा आहे. एवढेच बोलून मी येथेच थांबतो.

......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार (वने मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून काही प्रश्न उपस्थित केले आहेत. पहिल्यांदा त्या प्रश्नांना मी स्पेसिफिक उत्तरे देणार आहे आणि त्यानंतर त्यांच्या छोट्या प्रश्नांना उत्तरे देणार आहे.

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात या क्षणापासून कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता कोणतेही डुक्कर मारण्याची अनुमती या क्षणापासून वन विभागाकडून दिली जाईल. यासाठी वन विभागाकडे अर्ज करण्याची आवश्यकता नाही. गेवराई तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याला विदाऊट परवानगी रान डुक्कर मारण्याची अनुमती दिली जाईल.

येथे सन्माननीय सदस्यांनी नुकसान भरपाईचा देखील प्रश्न उपस्थित केला आहे. अनेक वर्षापासून ही मागणी करण्यात येत आहे. हाडाची काडे आणि रक्ताचे पाणी करून शहरी लोकांच्या तोंडात अन्नाचा घास देणाऱ्या शेतकऱ्याच्या पिकांचे वन्य प्राण्यांमुळे नुकसान होत असल्यामुळे त्यासंबंधातील नुकसान भरपाई ही वाढविलीच पाहिजे. ही नुकसान भरपाई दिनांक 5 सप्टेंबर 2013 रोजी माझ्याच अर्धा तास चर्चेच्या सूचनेनंतर वाढविण्यात आली. आज आपण 2014 मध्ये आहोत. मी जेव्हा या खात्याचा कारभार स्वीकारला तेव्हा आम्ही निर्णय घेतला की, यासंबंधातील नुकसान भरपाई वाढविली पाहिजे. त्याही बैठकीमध्ये सन्माननीय सदस्यांना बोलविण्यात येईल. आपण काही क्षेत्रामध्ये ही नुकसान भरपाई दीडपट, दुप्पट, अडीचपट करणार आहोत. हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहील याची ग्वाही या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून मी देत आहे.

सभापती महोदय, गेवराई तालुक्याचा अभ्यास करण्यात आला आहे. गेवराई तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र 1 लक्ष 58 हजार हेक्टर इतके आहे. यापैकी वन क्षेत्र फक्त 463 हेक्टर एवढे आहे. औरंगाबाद क्षेत्रामध्ये एकूण वन 4.73 हेक्टर एवढे आहे. संपूर्ण राज्यामध्ये वन्यप्राण्यांमुळे पिकांचे नुकसान होते म्हणून 22.78 टक्के रक्कम नुकसान भरपाईसाठी वाटण्यात येते. यामध्ये सुद्धा औरंगाबाद सर्कलमध्ये नांदेडमध्ये 0.3 टक्के, उस्मानाबाद मध्ये 1.42 टक्के मदत देण्यात

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार......

येते. हिंगोलीमध्ये 0.33 टक्के मदत देण्यात येते. औरंगाबादमध्ये 14.69 टक्के मदत देण्यात येते. पण बीडमध्ये मात्र आपण औरंगाबाद क्षेत्रामध्ये जेवढी मदत वाटतो त्यापेक्षा किती तरी अधिक मदत देण्यात येते. 45.88 टक्के मदत ही एकट्या बीड जिल्ह्यामध्ये जाते. त्यामुळे याचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. हरिण व काळवीटांपासून होणारे पिकांचे नुकसान असा सुद्धा एक महत्त्वाचा मुद्दा येथे मांडण्यात आला आहे. ती खरोखरच चिंतेची बाब आहे. ही जात वन्यप्राण्यांच्या शेड्युल्डमध्ये असल्यामुळे त्यांना कायद्याच्या अधीन राहून मारण्याची अनुमती देता येत नाही. यासाठी आपण विविध विचार करीत आहोत. हरिण व काळवीटांपासून होणाऱ्या नुकसानीच्या रकमेत आपण निश्चितच वाढ करू. यात नुकसान भरपाईची रक्कम वाढविणे हा काही एकमात्र उपाय नाही. नुकसान होऊच नये यादृष्टीने काय करता येईल यासाठी तज्ज्ञांची समिती नेमून मार्गदर्शन देखील घेत आहोत. काही जणांचे सोलर कुंपण लावावे असे मत आहे. सोलर कुंपण करणे सहज सोपे आहे. सोलरचे एक कि.मी.चे कुंपण असेल तर त्याला सव्वादोन लक्ष एवढा खर्च येतो. जेव्हा प्रयोग म्हणून सोलर कुंपण लावण्यात आले तेव्हा लोकांनी त्या कुंपणाच्या तारा किंवा बॅटऱ्या काढल्याचे सरकारच्या निदर्शनास आले किंवा त्याची बॅटरी गायब झाल्याचे दिसून आले. यातून जो फायदा व्हायला पाहिजे होता तो झाला नाही. तेव्हा अशा ठिकाणी चर घेऊ शकतो काय, इतर काही माध्यमे आहेत काय, यामध्ये इतर राज्यांमध्ये कोणती उपाययोजना करण्यात आली आहे याचा आपण अभ्यास करीत आहोत. मला विश्वास आहे की, मार्च अधिवेशनापर्यंत यासंबंधातील एक धोरण आखले जाईल. आमच्या मा.राज्यमंत्र्यांचा आग्रह राहिला आहे की, यासाठी स्वतंत्र लेखा शीर्ष करून त्या अंतर्गत मदत करण्यात यावी. असे केले तरच वन्यप्राणांच्या हल्ल्यापासून होणाऱ्या पिकांचे नुकसान वाचविता येतील. पूर्वी 33 टक्के जंगल होते ते आता 19.94 टक्क्यापर्यंत आले आहे. त्यामुळे वन्य प्राणी बाहेर येत आहेत. काही ठिकाणी मांसाहारी प्राण्यांची संख्या झपाट्याने कमी झाली आणि तृणभक्षक प्राण्यांची संख्या वाढली. हे तृणभक्षक प्राणी शेतकऱ्यांना त्रास देत आहेत. त्यामुळे याचा गंभीरपणे विचार केला जाईल.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार...

गेवराई येथे हरणांमुळे पिकांचे नुकसान होत आहे. त्यामुळे पंचनामे करण्यामध्ये सुलभता आणली पाहिजे अशी मागणी सन्माननीय सदस्यांनी केली आहे. सहजपणे पंचनामे झाले पाहिजेत. त्यादृष्टीने आपण निर्णय करीत आहोत. वन रक्षक, वनपाल किंवा वन परिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे 3 दिवसाच्या आत तक्रार केल्यानंतर दहा दिवसांच्या आत त्यांनी पंचनामा केलाच पाहिजे. कमीतकमी 700 रूपयांच्या रकमेवरील चेक असावा अशी आमची सूचना आहे. कारण आज अकाऊंट उघडण्यासाठी 500 रूपये लागतात. आपण त्यांना 100 रूपयांचा चेक दिला तर त्यातून काहीच निष्पन्न होणर नाही. या नुकसानीचा समावेश पीक विमा योजनेमध्ये घेता येईल काय असा विचार कृषी विभागाच्या माध्यमातून करीत आहोत. तसेच जी नुकसान भरपाई होईल ती 30 दिवसांच्या आत दिली पाहिजे. ती देण्यासाठी आपण बीडीएसमध्ये फाईल मूव्ह केली आहे. वर्षभरात किती नुकसान होईल याचा अंदाज करता येत नसल्यामुळे अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणे शक्य होणार नाही. हा अंदाज कोणीच करू शकत नाही. ते मुके प्राणी असल्यामुळे कोणाच्याही कंट्रोलमध्ये नसतात. त्यांनी विशिष्ट दिवसांमध्ये एवढेच नुकसान करावे असा जी.आर.किंवा परित्रक काढले तरी ते ऐकणार देखील नाहीत म्हणून उणे पद्धतीने नुकसान भरपाई देण्याची फाईल आता मुव्ह झालेली आहे. जेव्हा केव्हा अशा प्रकारचे नुकसान होईल ते 30 दिवसात देण्याची पद्धती विकसित करण्यात येईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, समितीने 3 दिवसात निर्णय घ्यावा अशी मी विनंती केली आहे. येथे 30 दिवसात नुकसान भरपाई देण्यात येईल असे सांगितले आहे ते बरोबर आहे. एखादे प्रकरण आल्यानंतर ती समिती तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली गठित करावी व त्या समितीने 30 दिवसाच्या आत तो प्रस्ताव निकाली काढण्यासंबंधीच्या सूचना आपण द्याव्यात.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या समवेत जेव्हा विभागाची बैठक घेण्यात येईल तेव्हा या सूचनेचाही विचार केला जाईल. सहजपणे काम करता यावे, शेतकऱ्यांना वारंवार चकरा मारण्याचे काम पडू नये, शेतकऱ्याने एक अर्ज दिल्यानंतर ही जबाबदारी वन विभागाची राहिली पाहिजे, 30 दिवसाच्या आत नुकसान भरपाई दिलीच गेली पाहिजे अशी एक चांगली पध्दत विकसित करण्याचा शासनाचा मानस आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या हिताच्या बाबतीत मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. परंतु रानडुक्कर गेवराई तालुक्यात तसेच शेजारच्या माजलगाव तालुक्यात आहेत. मदतीच्या अहवालात सुध्दा औरंगाबाद जिल्हयामध्ये रानडुक्करांचे प्रमाण अधिकचे आहे. गेवराई पासून औरंगाबाद काही लांब अंतरावर नाही. त्यामुळे या परिसरात जी काही रानडुक्करे आहेत त्यांनाही मारण्याची परवानगी दिली जाणार आहे काय ? या विषयाच्या संदर्भातील समितीने आपल्याला जो काही अहवाल दिलेला आहे त्या अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आलेल्या आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, गेवराई तालुक्यात मी डुक्कर मारण्याची परवानगी दिली आहे. गेवराई तालुक्यात रानडुक्कर नसल्याचा अहवाल आलेला असल्यामुळे या ठिकाणी डुक्कर मारण्याची परवानगी दिलेली आहे. विशेष बाब म्हणून मी सांगितले आहे की, गेवराईमध्ये 1.58 लक्ष हेक्टर जागेपैकी 463 हेक्टर जागेत वन आहे. महाराष्ट्रातील सर्व तालुक्यात जेवढी नुकसान भरपाई दिली जाते त्यापेक्षा एकटया गेवराई तालुक्यात जास्त नुकसान भरपाई का दिली जाते यासंदर्भात डीएनए करण्यात आला होता. डीएनए करताना असे लक्षात आले की, या ठिकाणी मोकाट गावठी डुक्कर आहेत. वन विभागाच्या समितीच्या अहवालानुसार गेवराई तालुक्यामध्ये डुक्कर मारण्यासाठी परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. कारण या तालुक्यात रानडुक्कर नाहीत असे वन विभागाच्या अहवालात म्हटले आहे. सन्माननीय सदस्यांनी आपल्या तालुक्याच्या संदर्भात जी मागणी केली ती अतिश्य योग्य आहे. रानडुक्कर मारण्याला आताही परवानगी आहे परंतु यासंदर्भात जी प्रक्रिया आहे ती आपल्याला परवडणारी नाही. यामध्ये 24 तासाची परवानगी घ्यावी लागते, रानडुक्कराला बंदुकीनेच मारा, त्यासाठी बंदुकीचे लायसन्स

श्री. सुधीर मुनगंटीवार......

पाहिजे, पण गरीब माणूस बंदुक कोठून घेईल ? ही जी पध्दत आहे ती रानडुक्कर मारण्यासाठीची आहे. रानडुक्कर मारण्याची परवानगी आपल्यालाही सुलभ करता येईल. रानडुक्कर मारताना ते बंदुकीनेच का मारावे, रानडुक्कराचा आपण एवढा सन्मान का करता, रानडुक्कर बंदुकीनेच नाही तर दगडाने सुध्दा मारता यावे, दुसऱ्या शस्त्राने सुध्दा मारता यावे यासंदर्भात मी सुध्दा चर्चा उपस्थित केली होती. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या बरोबर जी बैठक घेणार आहोत त्या बैठकीमध्ये या मुद्याचाही विचार केला जाईल. नियमाच्या व कायद्याच्या अधीन राहून आपल्याला काम करावे लागणार आहे. यासंदर्भात कोर्टाच्या निर्णयानुसार आणि तरतुदीच्या अधीन राहून रानडुक्कर मारण्याची प्रक्रिया आपण सुलभ करणार आहोत.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, गेवराईत एकही रानडुक्कर नसल्यामुळे तेथे रानडुक्कर मारण्याची परवागी दिली जाईल अशा प्रकारे मंत्री महोदयांनी जे स्टेटमेंट केले आहे ते उद्या वर्तमानपत्रात छापून येऊ शकते.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, गेवराई तालुक्यात एकही रानडुक्कर नसल्याचा अहवाल आलेला आहे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, एका वर्तमानपत्रात बैलगाडीमध्येही मावणार नाही एवढे भयानक रानडुक्कर आढळल्याची माहिती छापून आली होती.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, गेवराई तालुक्यात एकही रानडुक्कर नसल्यामुळे त्या ठिकाणी डुक्कर मारण्याची अनुमती देण्यात आल्यामुळे तुम्ही डुक्कर मारण्याचा धडक कार्यक्रम राबवावा. रानडुक्कर मारण्याची परवानगी आजही देण्यात आलेली आहे फक्त त्याची प्रक्रिया क्लिष्ट आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**.: मध्य गोदावरी खोऱ्यातील 18 टीएमसी पाण्यावर मराठवाडयाचा हक्क असल्याचा निर्वाळा पाणी वाटप लवादाने दिलेला असतानाही या भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण होणे

**मु.शी**.: मध्य गोदावरी खोऱ्यातील 18 टीएमसी पाण्यावर मराठवाडयाचा हक्क असल्याचा निर्वाळा पाणी वाटप लवादाने दिलेला असतानाही या भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण होणे यासंबंधी श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.अमरसिंह पंडित(विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"मध्य गोदावरी खोऱ्यातील १८ टी.एम.सी. पाण्यावर मराठवाड्याचा हक्क असल्याचा निर्वाळा पाणी वाटप लवादाने देणे, मध्य गोदावरी खोऱ्यातील पाणी न अडविल्यामुळे आंध्र प्रदेशात वाहून जाणे, या भागात सतत दुष्काळ व टंचाई परिस्थिती निर्माण होणे, १८ टी.एम.सी. पाण्याच्या नियोजनाच्या बृहत आराखड्यास शासनाने परवानगी देऊनही यातील प्रस्तावित प्रकल्पांचे काम सुरु न होणे, मराठवाड्यातील विशेषत: बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी बृहत आराखड्यातील प्रकल्पांचे काम तातडीने सुरु करण्याची केलेली मागणी, दुष्काळ व टंचाईग्रस्त भागातील सिंचन सुविधा वाढविण्यासाठी तातडीने प्रस्तावित १८ टी.एम.सी. पाण्याच्या बृहत आराखड्यातील प्रकल्प सुरु करण्यासाठी करावयाची कार्यवाही."

सभापती महोदय, मी या पूर्वीही मध्य गोदावरी खोऱ्यातील 18 टीएमसी पाण्यावर मराठवाडयाचा हक्क असल्याची अर्धा-तास चर्चा उपस्थित केली होती. वास्तविक पाहता याच सभागृहात चार दिवसापूर्वी या विषयाच्या संदर्भात एक लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. परंतु त्यावेळी मला सविस्तरपणे बोलण्याची संधी मिळाली नव्हती. हा विषय अतिशय गंभीर आहे. गोदावरी खोऱ्यातील 18 टीएमसी पाण्याच्या संदर्भात आम्ही जाणीवपूर्वक 3 वर्षापासून पाठपुरावा करीत आहोत. मराठवाडयाचे हे हक्काचे पाणी आहे. आम्हाला जायकवाडी प्रकल्पातून पाणी मिळत नाही. जायकवाडी हे साधारणपणे 21 टीएमसी तुटीचे खोरे आहे. या ठिकाणी काही प्रकल्प अर्धवट अवस्थ्ेत असून काही प्रकल्प पूर्ण होऊच शकत नाही या सर्व प्रकल्पांची आकडेवारी केल्यानंतर मेरी या संस्थेने मराठवाडयासाठी 21 टीएमसी पाणी उपलब्ध करुन दिलेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित.......

तत्कालीन मंत्री महोदयांनी मराठवाडयासाठी जे 18 टीएमसी पाणी उपलब्ध करुन दिले होते त्या पाण्याच्या संदर्भात मध्यंतरी चर्चा झाली आणि कोणतेही नवीन प्रकल्प घ्यावयाचे नाही असा निर्णय माननीय राज्यपालांनी घेऊन तो निर्णय मंत्रिमंडळाला कळवला व त्या प्रमाणे राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन टाकला. या विषयाचा पाठपुरावा आम्ही गेल्या अनेक वर्षापासून करीत असताना या विषयाच्या संदर्भात राज्य मंत्रिमंडळाने माननीय राज्यपालाना कळवले की, या दुष्काळी भागात प्रकल्प घेण्याची आवश्यकता आहे. किंबहुना दुष्काळी परिस्थितीला सामोरे जात असतांना दीर्घकालीन उपाययोजना न करता टँकरने पाणी पुरवठा करणे, विहिरी देणे अशा उपाययोजना शासन करणार असेल तर त्याचा काही एक उपयोग होणार नाही. आमचे भविष्य अंधकारमय झालेले आहे. दुष्काळाच्या चर्चेदरम्यान मी सांगितले होते की, आम्हाला आता राज्य सरकारच्या अनुदानावर अवलंबून रहावे लागत आहे. दुष्काळी परिस्थितीला सामोरे जात असताना राज्य सरकारच्या अनुदानावर आम्हाला आमच्या मुली-बाळींचे शिक्षण आणि लग्न करावे लागणार आहे, सरकारच्या अनुदानावरच आम्हाला आमचे दुखणे दूर करावे लागणार आहे. दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता असतांना मंत्री महोदय पुन्हा एकदा कॅश फ्लो,सरकारवरील कर्ज हा विषय काढतील. आजच्या टाईम्स ऑफ इंडियामध्ये केळकर समितीच्या अहवालाच्या संदर्भात माहिती छापून आली आहे. केळकर समितीच्या अहवालाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय अर्थमंत्री सभागृहात आणि मीडिया समोर बोलत असतांना त्यांनी केवळ नागपूर, विदर्भ यासंदर्भातीलच भाषणे केलेली आहेत. परंतु मराठवाडयाचा कोणी विषयच काढत नसल्यामुळे आज मराठवाडयावर अन्याय होत आहे. मराठवाडयाच्या उपाययोजनेच्या संदर्भात कोणतीही चर्चा केली जात नाही. विदर्भातील उद्योगांना चालना देण्यासाठी राज्य शासन विजेचे दर कमी करणार आहे. परंतु मराठवाडयाच्या संदर्भात कोणतीही घोषणा सरकारकडून केली जात नाही. मराठवाडयाच्या दुष्काळाच्या संदर्भात मार्ग काढावयाचा असेल तर मराठवाडयातील 18 टीएमसी पाण्याच्या संदर्भात शासनाने अतिशय गांभीर्याने निर्णय आणि निकाल घेणे गरजेचे आहे. 18 टीमसीमध्ये केवळ 26 प्रकल्पांचा समावेश केलेला आहे वास्तविक पाहता आपण बृहत आराखडा

श्री. अमरसिंह पंडित.......

पाहिला तर 18 टीएमसी पाण्यामध्ये 200 च्या वर प्रकल्पांचा समावेश आहे. या ठिकाणच्या कोणत्याही प्रकल्पांना भूसंपादनाचे काहीही कारण नाही. हे प्रकल्प दीड दोन कोटी रूपयांमध्ये पूर्ण होऊ शकतात. हे प्रकल्प जर निकाली निघाले तर गेवराई आणि बीड विधानसभा मतदारसंघात त्या ठिकाणी दुष्काळाची दाहकता कमी होणार आहे. त्यामुळे मराठवाडा पॅकेजसाठी वेगळा निर्णय करण्याची आवश्यकता आहे. 18 टीएमच्या संदर्भात, आपण 26 प्रकल्पांच्या संदर्भात जो निर्णय घेतलेला आहे तो एक राजकीय आहे. मराठवाडयातील तालुक्यांना डावलण्यासाठी हा निर्णय जाणीवपूर्वक घेण्यात आलेला आहे. गेवराई तसेच बीड तालुक्यातील 100 टक्के गावे दुष्काळी छायेत असतांना .......

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ दुपारी 12.00 वाजेपर्यंत आहे. आता सुरु असलेल्या अर्धातास चर्चेसाठी आणखी 10-15 मिनिटे वाढवून दिली, तरी ती चर्चा पूर्ण होणार नाही. मी, ही चर्चा ऑन लेग ठेवत आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12 वाजून 15 मिनिटांनी पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.00 ते 12.15 पर्यंत स्थगित झाली. )

----------

यानंतर श्री.बोर्डे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबतच्या विधेयकाचा समावेश कामकाजपत्रिकेत नसल्याबाबत**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये एकूण तीन विधेयके नमूद केलेली आहेत. त्यामध्ये मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भातील विधेयक आहे. या समाजाला आरक्षण देण्याच्या विधेयकाला आमच्या सर्वांचे समर्थन आहे. वास्तविक पाहता मराठा समाजाला आरक्षण देण्यासोबतच मुस्लीम समाजालाही आरक्षण देण्यात आले होते. परंतु मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबतचे विधेयक आजच्या कामकाजपत्रिकेवर नमूद करण्यात आलेले नाही. म्हणून आमचा आग्रह आहे की, मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबतचे विधेयक सभागृहात सादर करणे आवश्यक आहे. आज रोजी हे अधिवेशन संपत आहे. मुस्लीम समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात काढलेल्या अध्यादेशाची मुदत आज संपत आहे. त्यामुळे उद्यापासून मुस्लीम समाजाला आरक्षणाचा कोणताही फायदा मिळणार नाही. या सर्व बाबी लक्षात घेता सरकारची मुस्लीम समाजाच्या आरक्षणाबाबत नेमकी काय भूमिका आहे, हे सरकारने आज स्पष्ट करावयास पाहिजे. या निमित्ताने मी मागणी करतो की, मराठा समाजाला आरक्षण देण्याबरोबरच मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबतचे विधेयक सभागृहात मांडले पाहिजे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवरुन असे दिसते की, मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतचे विधेयक सभागृहात मांडण्यात येणार आहे. या विधेयकाला आमचा पूर्णपणे पाठिंबा आहे. वास्तविक पाहता मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतच्या विधेयकाबरोबरच मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबतचे विधेयक आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये नमूद करावयास पाहिजे होते. परंतु ते विधेयक आजच्या कामकाजपत्रिकेवर नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत राज्य सरकारने जो अध्यादेश काढलेला आहे तो व्यपगत होण्याची पूर्णत: शक्यता आहे. आरक्षणाच्या आधारावर ज्यांना शाळांमध्ये प्रवेश मिळालेले आहेत, ज्यांना आरक्षण मिळालेले आहे त्यांचे आरक्षण रद्द होण्याची शक्यता आहे. ही अत्यंत गंभीर अशी बाब आहे. मी तर म्हणेन की, मुस्लीम समाजाच्या संदर्भात शासनाने उदासीनता दाखविली आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

पूर्वीच्या राज्य शासनाने मुस्लिमांना शिक्षणाच्या संदर्भात आरक्षण दिले असताना आणि ते उच्च न्यायालयाने जवळजवळ मान्य केलेले असताना राज्य शासनाने असे करणे योग्य नाही. पूर्वीच्या राज्य शासनाकडून मिळालेल्या शैक्षणिक आरक्षणानुसार मुस्लीम मुलांनी प्रवेश घेतला असल्यामुळे आज सभागृहात त्या संदर्भात विधेयक आणले नाही तर हे मिळालेले आरक्षण रद्द होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुस्लीम समाजावर फार मोठा अन्याय होणार आहे. माझी मागणी आहे की, आज कोणत्याही परिस्थितीत सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी सभागृहात हे विधेयक आणले पाहिजे. माननीय श्री. एकनाथराव खडसे हे विधानसभेत विरोधी पक्षनेते असताना सतत म्हणत होते की, ॲटर्नी जनरल रिपोर्ट देणार नसतील तर त्यांना सदनात बोलवावे. आपण माहिती मागवा. आजच आमच्या समोर वास्तव आले पाहिजे.

सभापती महोदय, अशी मागणी करणारे तत्कालीन विरोधी पक्षनेते सदनात सभागृहाचे नेते आहेत. मुस्लीम समाजावर अशाप्रकारे अन्याय केला जात आहे, त्यांचे शैक्षणिक आरक्षण रद्द होणार आहे. मुस्लीम मुलांना मागच्या शासनाने दिलेली शैक्षणिक सवलत रद्द होणार आहे. शासन हे विधेयक न आणण्याचे कुटिल कारस्थान करण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते काही योग्य नाही. आम्ही ते कदापि खपवून घेणार नाही. मुस्लीम समाजाचे आरक्षणाचे विधेयक सभागृहासमोर आणले पाहिजे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण खाली बसावे. आता प्रश्नोत्तराचा तास सुरुहोईल.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे

**ठाणे व पालघर जिल्हयात कुष्ठरोग रुग्णांच्या संख्येत होत असलेली वाढ**

**(१) * ९३७ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्हयात सुमारे १ हजार ५४७ कुष्ठरोगाचे रुग्ण माहे ऑक्टोबर, २०१४ च्या अखेरीस आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुष्ठरोग नियंत्रणात आणण्यासाठी दरवर्षी शासनामार्फत विविध उपाययोजनांसाठी लाखो रुपये खर्च करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इतक्या मोठया प्रमाणात खर्च होऊनही कुष्ठरोग नियंत्रणात न येण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यास जबाबदार कोण व या प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.
ठाणे व पालघर जिल्हयात माहे ऑक्टोबर, २०१४ अखेर एकूण १४४८ नवीन कुष्ठरोगाचे रुग्ण आढळून आले आहेत.
(२) होय.
(३) ठाणे व पालघर जिल्हयातील कुष्ठरोगाच्या रुग्णांचे प्रमाण कमी होत असून, याबाबतचा मागील ३ वर्षाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| **अ.क्र.** | **वर्ष** | **कुष्ठरोग रुग्णांची संख्या** |
|---|---|---|
| १ | २०११-१२ | ३४७८ |
| २ | २०१२-१३ | २९६३ |
| ३ | २०१३-१४ | २७१६ |
| ४ | २०१४-१५ (ऑक्टो.२०१४) | १४४८ |

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

विविध मोहिमा व निरंतर आरोग्य शिक्षण उपक्रम तसेच रुग्णांवर वेळीच बहुविध औषधोपचार यामुळे रुग्णसंख्या कमी झाली असून, कुष्ठरोग नियंत्रणात न येण्याची सर्वसाधारण कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

१)दीर्घ कालावधीचा जंतूचा अधिशयन काळ सरासरी २ ते ५ वर्षे परंतु हा कालावधी यापेक्षा जास्त असू शकतो.

२) जंतू संसर्ग सावकाश पसरतो.

३) रोगकारक प्रतिकारशक्ती कमी असणाऱ्या ५ टक्के लोकांनाच हा आजार होतो.

४) लक्षणे उशीरा दिसत असल्याने रुग्णांच्या सानिध्यात येणाऱ्या लोकांमध्ये हा आजार कालांतरानेही दिसून येऊ शकतो.

५) फक्त बहुविध औषधोपचार ही एकच प्रतिबंधात्मक पध्दत उपलब्ध असून इतर आजारांच्या उपलब्ध असणाऱ्या लसींप्रमाणे एखादी लस या आजारास उपलब्ध नाही.

६) हा आजार फक्त मुनष्यप्राण्यासच होतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, ठाणे व पालघर विभागांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. ठाणे जिल्ह्यात सध्या कुष्ठरोग्यांचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणावर वाढले आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

**सभापती** : सभागृहात गोंधळाची परिस्थिती आहे. त्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 25 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 23 मिनिटांनी 25 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर जाऊन बसावे. मी आपले म्हणणे ऐकून घेण्यास तयार आहे. कृपया कोणत्याही एका सन्माननीय सदस्यांनी बोलावे. सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माझे म्हणणे कृपया सन्माननीय सदस्यांनी ऐकून घ्यावे. ऐकून घेण्याऐवजी ते केवळ गोंधळ घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतच्या विधेयकासंदर्भात सन्माननीय सदस्य काही म्हणणे मांडत आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, त्यांनी सरकारचे म्हणणे ऐकून घेण्याकरिता जागेवर जाऊन बसावे. परंतु, यांना चर्चा नको आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

**तालिका सभापती** : मी आपले म्हणणे ऐकून घेण्यास तयार आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर जाऊन बसावे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सरकारचे म्हणणे ऐकून घ्यावयाचे दिसत नाही. त्यांना कृपया आपण जागेवर बसण्यास सांगावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया जागेवर जाऊन बसावे, अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 1 वाजून 45 मिनिटांपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 51 मिनिटांनी 1 वाजून 45 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

(दोन्ही पक्षाचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात तर काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर शांत बसावे. सन्माननीय सदस्यांना काय म्हणायचे आहे ते मला समजलेले आहे. त्याबाबतीत माननीय मुख्यमंत्री त्यांची भूमिका समजावून सांगतील.

**मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत**

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मुस्लिम आरक्षणाच्या संदर्भात पुढे काय कार्यवाही करायची, त्यासंबंधीच्या कायदेशीर बाबी काय आहेत, संविधानिक बाबी काय आहे, या सर्व बाबी तपासण्याची आवश्यकता होती. म्हणून या संदर्भात राज्याचे माननीय महाधिवक्ता यांचे ओपिनियन मागितले आहे. ते ओपिनियन अद्याप अप्राप्त आहे. परंतु सभागृहाचा सेन्स पहाता ते ओपिनियन तातडीने मिळावे या दृष्टीने हालचाली सुरु केलेल्या आहेत. माझी सभागृहाला विनंती आहे की, अजून तास-दीड तासाचा वेळ द्यावा. ते ओपिनियन प्राप्त करुन योग्य ते निवेदन करण्यात येईल.

श्री. धनंजय मुंडे : महाधिवक्त्यांकडून ते किती वेळात प्राप्त होणार आहे ? आजचा अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे.

**उप सभापती** : माननीय मुख्यमंत्र्यानी सभागृहामध्ये सांगितलेले आहे त्याप्रमाणे आपण दीड तास थांबू.

यानंतर मुख्यमंत्री महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देतील.

----

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका यांची डबघाईस आलेली आर्थिक स्थिती.

**मु.शी.**: राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका यांची डबघाईस आलेली आर्थिक स्थिती या विषयावर सर्वश्री सुनील तटकरे, जयवंतराव जाधव, राजेंद्र जैन, हेमंत टकले, संदिप बाजोरिया, अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे, ख्वाजा बेग, दीपकराव साळुंखे, माणिकराव ठाकरे, राजेंद्र मुळक, सय्यद मुझफ्फर हुसेन, भाई जगताप, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री हरिसिंग राठोड, रामहरी रुपनवर, प्रा. जोगेंद्र कवाडे, श्री. शरद रणपिसे, श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु...

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 293 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव या सभागृहामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी मांडला आणि त्या प्रस्तावावरील चर्चेमध्ये माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, किरण पावसकर, प्रा.जनार्दन चांदूरकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.चंद्रकांत रघुवंशी अशा अनेक माननीय सदस्यांनी आपले मत देखील व्यक्त केले.

सभापती महोदय, मुळात मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. या शहराचा आणि शहरालगतच्या एमएमआरचा भाग मिळून ही बृहन्मुंबई बनलेली आहे. या संपूर्ण भागाचा विकास झाला पाहिजे. वर्षानुवर्षे ज्या समस्या आहेत त्या आपल्याला दूर करता आल्या पाहिजेत. मुंबईचा वर्ल्ड क्लास सिटी म्हणून यापूर्वी सातत्याने उल्लेख केला गेला. पूर्वीच्या सरकारकडून असे सांगण्यात आले की, मुंबईचे शांघाय करु, मुंबईचे सिंगापूर करु, मुंबईचे टोकियो करु. माझे तर स्पष्ट मत आहे की, मुंबईची स्वत:ची अस्मिता आहे. मुंबईचे शांघाय, सिंगापूर किंवा टोकियो करण्याची आवश्यकता नाही. मुंबईला आम्ही मुंबईच करणार आहोत. अतिशय चांगल्या प्रकारचे मुंबई शहर झाले पाहिजे. स्वत:ची अस्मिता राखली पाहिजे. जगातील शहरांना मुंबईचा हेवा वाटावा या दृष्टीने मुंबईने वाटचाल करण्याची आवश्यकता आहे.

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.....

सभापती महोदय, मला आठवते, 10-20 वर्षापूर्वी मी दिल्लीला जायचो. त्यावेळेला दिल्लीतील इन्फ्रास्ट्रक्चर पाहिल्यानंतर आपली मुंबई पुढे आहे असे वाटायचे. देशामध्ये इंफ्रास्ट्रक्चरच्या बाबतीत मुंबईचे नाव होते. दुर्दैवाने आज ती स्थिती राहिलेली नाही. वेगवेगळी शहरे आहेत, त्यांना वेगवेगळ्या प्रकारच्या प्लॅनच्या माध्यमातून इन्फ्रास्ट्रक्चर, इकॉनॉमिक ॲक्टिव्हीटी या सर्व गोष्टी उपलब्ध होतात. त्या मानाने आपण मागे पडतो का अशी अवस्था तयार झाली आहे. Is in doing business हा एक मानक आहे. ज्या मानकातून जगभरातील देशांमध्ये इन्व्हेस्टमेंट करण्याचे ते क्लायमेट आहे. या संदर्भातील इंडेक्स तयार होतो. वर्ल्ड बँक त्या संदर्भातील वेगवेगळया मानकावर परीक्षण करते आणि तो इंडेक्स तयार होतो. या इंडेक्समध्ये दुर्दैवाने 189 देशांमध्ये भारताचा क्रमांक 180 वा आहे. म्हणजे शेवटच्या 9 मध्ये आम्ही आहोत. Is in doing business याकरिता वर्ल्ड बँक परीक्षण करते किंवा त्यांची एजन्सी परीक्षण करते. आतापर्यंत एका शहराचे ते परीक्षण करायचे. अगोदर मुंबईचे परीक्षण करायचे. आता मुंबईसह दिल्लीचे परीक्षण केले जात आहे. या दोन शहरांच्या आधारावर जागतिक क्रमवारीत आपला क्रम ठरतो.

सभापती महोदय, दिल्लीचे काय करायचे ते दिल्लीचे सरकार पाहणार आहे. आपण किमान मुंबई शहर सुधारु शकलो, तेथील इन्फ्रास्ट्रक्चर, क्वालिटी ऑफ लाईफ चांगले करु शकलो, वेगवेगळ्या परवानग्या असतील, विकास असेल, हाऊसिंगची समस्या असेल या गोष्टींवर योग्य उपाययोजना तयार करु शकलो आणि त्या माध्यमातून आपण जर चांगल्या प्रकारची व्यवस्था उभी करु शकलो तर त्याचा फायदा हा होईल की, केवळ मुंबईचा फायदा होईल असे नाही तर Is in doing business मध्ये देशाचा क्रमांक सुधारेल आणि जगभरातील इन्व्हेस्टमेंट देशामध्ये आणि मुंबईमध्ये येऊ शकेल. आपल्याला आपल्या शहराबद्दल, राज्याबद्दल आपुलकी आहे. आमच्या महाराष्ट्राची मुंबई आहे. मुंबई हे जगातील आणि देशातील चांगले शहर आहे या दृष्टीने या मुंबईमध्ये काम करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधानांच्या समितीच्या संदर्भात मी अतिशय स्पष्ट स्पष्टीकरण या सभागृहात दिले आणि हे सांगितले होते की, माननीय पंतप्रधानांची समिती जी अपेक्षित केली

...3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे ती समिती महानगरपालिका, एमएमआरडीए, राज्य सरकार यांच्या अधिकारावर अधिक्षेप करणार नाही. मुंबई ही कोस्टल सिटी असल्यामुळे जवळपास प्रत्येक प्रकल्पाकरिता केंद्र सरकारकडून परवानगी घ्यावी लागते. सीआरझेडचा विषय असेल, रेल्वे किंवा इको सेन्सिटिव्ह झोनचा प्रश्न असेल, याकरिता केंद्र सरकारकडून परवानगी घ्यावी लागते. आपले त्याबाबतचे प्रस्ताव वर्षानुवर्षे पडून राहतात.

सभापती महोदय, मुंबई ट्रान्स हार्बर लिंकचे उदाहरण देतो. 30 वर्षापूर्वी हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला होता. तो मंजूर होऊ शकला नाही. नुकतेच केंद्र सरकारने त्यामध्ये रिलॅक्सेशन दिलेले आहे. त्याकरिता पर्यावरण विषयक परवानगी मिळते आहे. 30-30 वर्षे अशा महत्वाकांक्षी प्रकल्पाला लागले तर मुंबईला कसे पुढे नेणार? म्हणून केंद्र सरकारच्या अखत्यारीत ज्या परवानग्या त्यांनी द्यायच्या आहेत त्यांच्या डोमेनमधील परवानगीसाठी त्यांनी समिती तयार करावी. अशा प्रकारची मागणी केली तर मला वाटते ती चुकीची ठरणार नाही. गैरसमज असेल तर काढून टाकावा. मुंबई महाराष्ट्राची कालही होती, आजही आहे आणि उद्याही राहील. मुंबई महाराष्ट्रापासून कोणीही तोडू शकत नाही. स्वत: माननीय पंतप्रधानांनी हे स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, केंद्र सरकारच्या डोमेनमधील प्रकल्पांसाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यासाठी समिती करावी असे म्हटल्याने कोणताही फेडरलिझमवर त्याचा आघात होत नाही, कोणत्याही अधिकाराचा अधिक्षेप नाही. या राज्याच्या विविध प्रकल्पांना तातडीने मान्यता मिळावी हा हेतू आहे. हिस्टॉरिकली आपण पाहतो की, अनेक प्रकल्पांना केंद्राकडून मान्यता मिळालेली नाही. तुम्हाला ओळीने अनेक प्रकल्पांची उदाहरणे देऊ शकतो. तेथे आंतर मंत्रालयीन प्रक्रिया असते. एक परवानगी मागितली तर वेगवेगळ्या मंत्रालयाकडे ती रुट होते. जर अशाप्रकारे एखादी बैठक माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली झाली तर आंतर मंत्रालये एका ठिकाणी येतात आणि परवानगी तातडीने मिळण्याची शक्यता तयार होते, हे मी स्पष्ट केलेले आहे.

सभापती महोदय, आज मुंबई शहर सुधारण्याच्या दृष्टीने एमएमआरडीएने बिझिनेस प्लॅन तयार केला. कॉम्प्रिहेन्सिव्ह ट्रान्स्पोर्ट स्टडी केला. त्या बिझिनेस प्लॅनच्या दृष्टीने मुंबईला जागतिक दर्जाचे शहर, जागतिक फायनान्स सेंटर कशा प्रकारे तयार करता येईल या संदर्भात हा

...4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कॉम्प्रिहेन्सिव्ह ट्रान्स्पोर्ट स्टडी केला आहे. त्या अंतर्गत जे वेगवेगळे प्रकल्प हाती घेतो ते प्रकल्प बिझिनेस प्लॅन आणि कॉम्प्रिहेन्सिव्ह ट्रान्स्पोर्ट स्टडीचा भाग आहेत. वेळोवेळी त्याचे अपडेशन केले जाते. मिसिंग लिंक पूर्ण केल्या जातात, या लिंक जोडू शकलो तर निश्चितपणे मुंबई अत्यंत महत्वाचे शहर म्हणून पहावयास मिळेल. मुंबई महानगरपालिकेने देखील कॉम्प्रिहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. लवकरच तो सुध्दा तयार होईल.

सभापती महोदय, हाऊसिंगचा विषय महत्वाचा आहे तसेच ट्रान्सपोर्ट कम्युटेशन महत्वाचे आहे. त्या दृष्टीने काम हातामध्ये घेतले आहे. आज या ठिकाणी चर्चा होत असताना या प्रस्तावांतर्गत असे सांगण्यात आले की, एमएमआरडीएची कामे संथ गतीने सुरु आहेत. गत काळात कामांची गती वाढू शकली नाही हे खरे आहे. त्याची कारणे देखील होती. पायाभूत सुविधा प्रकल्प अत्यंत गर्दीच्या ठिकाणी होत असतात. तेथील रस्ते अरुंद असतात. वाहतूक मर्यादित काळासाठी थांबविता येते. कामे करण्यावर बंधने येतात. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन हा महत्वाचा विषय ठरतो. धार्मिक स्थळांचे स्थलांतर हा सोशल इश्यू बनतो. भूमिगत वीज व पाण्याच्या वाहिन्यांमुळे येणारे अडथळे, मिठागर, वन जमीन, केंद्र सरकारच्या विविध विभागाकडील जमिनीचा ताबा मिळण्यामध्ये बराच वेळ लागतो. रेल्वेच्या जागेवर देखील बांधकामासाठी रेल्वेकडून वेगळी परवानगी घ्यावी लागते याचा मी उल्लेख केला आहे.

नंतर टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ........

केंद्रशासनाच्या वेगवेगळ्या विभागांकडून परवानग्या घ्याव्या लागतात म्हणून विलंब लागतो म्हणून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, हा विलंब दूर करण्याच्या दृष्टीने हे सर्व रेग्युलर मॉनीटरिंग करणारी यंत्रणा उभी करावी. जेणेकरुन वेगवेगळ्या शासकीय विभागांचा समन्वय झाला पाहिजे, यादृष्टीने काम सुरु केले आहे.

मुंबई मेट्रो लाईन-1 जी वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर अशी आहे, ती 8 जून, 2014 पासून प्रवासासाठी खुली झालेली आहे. संत गाडगे महाराज चौक ते वडाळा ही मेट्रो लाईन सप्टेंबर 2015 पर्यंत कार्यान्वित करण्याचे शासनाने ठरविले असून त्यादृष्टीने प्रयत्नही सुरु केले आहेत. जवळपास 18 रस्त्यांपैकी 15 रस्त्यांचे सुमारे 136 किलोमीटर पर्यंत लांबीची कामे केली आहेत. तसेच एमएसआरडीसीच्या माध्यमातून 5 उड्डाण पुलाची कामे पूर्ण झाली असून आणखी 6 उड्डाण पुलाची कामे हाती घेतली असून ती अलीकडच्या काळात पूर्ण होतील. यासोबत मिठागरे व कस्टमच्या जागेत मुंबईतील सात रस्ता ते वडाळा जोड रस्ता या रस्त्याचे काम मार्च 2015 पर्यंत पूर्ण करण्याचे निदेश दिले असून त्यानुसार टाईमलाईन ठरवून दिलेली आहे. यापूर्वी काय झाले हे सर्वांना माहीत आहे, त्यात बरीच कामे पूर्वीच्या शासनाने केली आहेत ती मी पुन्हा सांगणार नाही. सांताक्रूझ जोड रस्ता एप्रिल 2015 पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. पश्चिम द्रुतगती मार्गिकेवरील खेरवाडी या एका मार्गिकेचे बांधकाम पूर्ण झाले असून त्यावरुन एकेरी वाहतूक सुरु झालेली आहे. छत्रपती शिवाजी टर्मिनस या आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गिकेचे काम फेब्रुवारी, 2014 मध्ये सुरु झाले आहे, असे काही प्रकल्प आपण निश्चितपणे पूर्ण केले व काही पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत.

महोदय, मेट्रो व मोनो रेलचे तसेच उड्डाण पुलांची कामे सुरु असताना त्यावरील अपघातांचा विषय देखील सभागृहात उपस्थित झाला. त्यासंदर्भात मी स्पष्ट करु इच्छितो की, मेट्रो रेल्वेच्या कामाच्या अपघातामध्ये जखमी व मृत झालेल्यांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई दिलेली असून कंत्राटदार कंपनीविरुध्द दंडात्मक कारवाई सुध्दा केलेली आहे. मोनो रेलच्या संदर्भात देखील कंत्राटदार कंपनीकडून दंडात्मक कारवाईच्या माध्यमातून नुकसान भरपाईसाठी 34 लाखाची भरपाई घेतली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील लालबाग येथील उड्डाण पुलाच्या

........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ........

बांधकामामध्ये झालेल्या अपघाताची नुकसान भरपाई दंडनीय कारवाई करुन कंत्राटदाराकडून वसूल केलेली आहे. तसेच पूर्व मुक्त मार्गिकेवरील अपघात प्रकरणी कंत्राटदार कंपनीला दंड केला असून सल्लागाराला देखील 15 लाखाचा दंड करण्यात आला आहे. मृतांच्या नातेवाईकांनाही मदत देण्यात आली आहे. त्याचबरोबर अपघात का होतात याची कारणे शोधणे आणि अशा अपघातांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी एक तज्ज्ञ समिती नेमण्यात आली आहे. या समितीमार्फत अशा सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात येईल व यापुढे असे अपघात होऊ नयेत म्हणून उपाययोजना सुध्दा सुचविल आणि या समितीने सुचविलेल्या नवीन सुरक्षिततेच्या उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी कंत्राटदारांसाठी कोड निर्माण करण्याचेही शासनाने ठरविले आहे. ज्यात प्रामुख्याने बॅरिकेट्स लावणे, सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे इ. सर्व गोष्टींचा समावेश करण्याचे ठरले आहे.

महोदय, मुंबई आणि नवी मुंबई अधिक जवळ यावी म्हणून सुरळीत वाहतुकीसाठी हार्बर लिंक बांधण्यासाठी रूपये 9630 कोटीचा खर्च अपेक्षित आहे. हा खर्च एमएमआरडीए स्वत:च्या निधीतून करणार असून त्यासाठी "जायका"कडे कर्ज मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यात इन्फ्रास्ट्रक्चरल क्लिअरन्स प्राप्त झाले असून लँडिंग इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये मान्यता मिळण्यासाठी पाठपुरावा सुरु केला आहे. या प्रकल्पाला मान्यता मिळाल्याबरोबरच हे काम सुरु करण्यात येईल.

महोदय, मेट्रो लाईन क्र. 3 - कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मार्गाला केंद्र आणि राज्यशासनाची परवानगी मिळाली असून त्यासाठी सर्व प्रक्रिया व निविदा पूर्व प्रकिया पूर्ण करुन 2015 मध्ये हे बांधकाम सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी संपूर्ण कार्यवाही सुरु केली असताना वर्षाच्या पहिल्या दोन-तीन महिन्यातच हे काम सुरु झाले पाहिजे असाही शासनाचा प्रयत्न आहे. यासोबत मेट्रो लाईन क्र. 2 जी चारकोप-वांद्रे-मानखुर्द अशी प्रस्तावित होती त्याऐवजी दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द अशा संपूर्ण भुयारी मेट्रो रेल्वेच्या मार्गिकेच्या सुधारित विस्तारित 25 हजार 605 कोटीच्या प्रस्तावाला एमएमआरडीएने मान्यता दिलेली असून हा प्रस्ताव राज्य शासनाच्या मान्यतेसाठी प्राप्त झालेला आहे व त्याला तातडीने मान्यता दिली जाईल. त्याचबरोबर वडाळा-

...3...



PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 14:00

श्री. देवेंद्र फडणवीस ........

घाटकोपर पासून ठाणे येथील तीन हात नाका ते कासार वडवली या मेट्रो रेल्वे मार्गिकेच्या 19 हजार 97 कोटीच्या प्रस्तावाचा डीपीआर आला असून त्यालाही एमएमआरडीएने मान्यता दिली आहे व राज्य शासनाच्या मान्यतेसाठी हा प्रस्ताव आला असून त्यालाही तातडीने मान्यता देण्यात येईल, जेणेकरुन या सर्व कामांना चालना मिळाली पाहिजे असा यामागे प्रयत्न आहे. तसेच गेल्या एक महिन्याच्या काळात मेट्रोच्या संदर्भात जेवढे प्रस्ताव शासनाकडे आले होते त्या सर्वांना मान्यता दिलेली आहे.

महोदय, सभागृहात झोपडपट्टी पुनर्विकासाचा मुद्दा उपस्थित झाला त्यासंदर्भात असे सांगण्यात आले की, पात्र लाभार्थ्यांना अपात्र ठरविण्यात येत आहे, त्याची चौकशी करण्यात येईल. तसेच अपर जिल्हाधिकारी दर्जाच्या अपिलीय प्राधिकाऱ्याकडे तक्रारी केल्यानंतर उच्चस्तरीय समितीकडे दाद मागण्याचीही तरतूद यामध्ये आहे. यासंदर्भात दि. 22 जुलै, 2014 रोजी शासन निर्णय निगमित करुन शासनाने दि. 1 जानेवारी 2000 पर्यंतच्या झोपड्या पात्र ठरविल्या आहेत त्यानुसार कार्यवाही केली जाईल. तसेच यात 1995 मध्ये अपात्र ठरलेले कदाचित 2000 पर्यंत घेतलेल्या निर्णयानुसार पात्र ठरतील. तरी देखील पात्र असतांना अपात्र ठरविण्याचे काम कोणी केले असेल तर त्यांच्याविरुध्द चौकशी करुन कारवाई केली जाईल.

महोदय, मुंबईत होणाऱ्या अतिक्रमणाबाबत मी सांगू इच्छितो की, सन 2022 पर्यंत सर्वांना घरे अशा प्रकारचा कार्यक्रम केंद्र शासनाने जाहीर केला असून त्या माध्यमातून ॲफोर्डेबल हाऊसिंग स्टॉक हा प्रकल्प हाती घेण्यात येत असून जास्तीत जास्त घरांचा स्टॉक कसा करता येईल यासाठी धोरण तयार करण्याचा शासनाचा विचार आहे. आवश्यक त्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारच्या दुरुस्त्या करुन हे धोरण जाहीर करण्याचा शासन प्रयत्न करणार आहे. त्यासोबत सातत्याने वाढणारी अतिक्रमणे हा देखील अत्यंत महत्वाचा मुद्दा असून त्यासंदर्भात वेगवेगळ्या कारवाया देखील करण्यात आल्या. या प्रकरणात पोलीस अधिकाऱ्यांना दोषी धरु तसेच संबंधित वॉर्ड ऑफिसरला दोषी धरण्यात येईल, असे यापूर्वी ठरविले पण तरीही अतिक्रमणांवर योग्य त्या उपाययोजना होताना दिसत नाहीत. म्हणून यासंदर्भात टेक्नॉलॉजिकल इंटरव्हिन्शन करता येईल काय अशा प्रकारचे प्रयत्न देखील शासनाने सुरु केले असून त्यासाठीचे प्रेझेंटेशन माझ्यासोबत

.....4



श्री. देवेंद्र फडणवीस ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आले आहे.  तसेच आपल्याला मी असेही सांगू इच्छितो की, सॅटेलाईट इमेजेसच्या माध्यमातून अशा प्रकारचे चेंजेस आयडेंटिफाय झाल्याबरोबर त्याचे मॉडेल तयार करुन मागील महिन्यात अशा प्रकारचे चित्र या वॉर्डात होते पण आता येथे मध्येच बांधकाम कसे झाले, अमुक ठिकाणी रिकामी जागा होती पण त्यावर अतिक्रमण झालेले दिसून येते .........

यानंतर श्री. भारवि ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.....

अशा प्रकारे नोटिफाय करता आले तर त्याची जबाबदारी फिक्स करता येईल. वेगवेगळ्या सॅटेलाईट इमेजच्या माध्यमातून अनेक देशात सर्व्हेअलन्स केले जात आहेत. त्या माध्यमातूनच आपल्या राज्यात मुंबई सारख्या ठिकाणी एखादा पायलट प्रोजेक्ट करता येईल काय हे देखील पाहण्यात येईल. अतिक्रमण होऊ नये म्हणून तंत्रज्ञानाची मदत घेता येऊ शकेल काय याचा विचार करून आम्ही प्रकल्प तयार करीत आहोत. सुरूवातीला आम्ही छोट्या भागामध्ये याचे प्रात्यक्षिक करून पाहणार आहोत. त्याचे योग्य रिझल्टस मिळाले तर तो प्रकल्प राज्यामध्ये लागू करण्यात येईल. आज जगामध्ये अशा तंत्रज्ञानाचा वापर अनेक देश करीत आहेत. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आपण अतिक्रमणे थांबवू शकतो आणि त्याच बरोबर जबाबदारी देखील निश्चित करू शकतो. आपण संबंधितांना त्यांच्या येथे झालेले बदल नोटिफाय केले तरी देखील कारवाई केली नाही म्हणून आपण जबाबदार आहात असे सांगू शकतो. त्यामुळे आपण अशा प्रकारे देखील व्यवस्था करीत आहोत.

ब्रीमस्टोवॅड योजने अंतर्गत आपल्याला 8 पंपिंग स्टेशन्स सुरू करावयाची आहेत. त्यापैकी इर्ला आणि हाजिअली येथील दोन पंपिंग स्टेशन्स आधीच सुरू झाले होते. क्लिव्ह लँड आणि लव्ह ग्रोह येथील दोन पंपिंग स्टेशन्स आपण मान्सून पर्यंत निश्चितपणे सुरू करणार आहोत. ब्रिटानिया आणि गजधर लेन येथील पंपिंग स्टेशन्सचे काम टेडरिंगच्या प्रोसेसमध्ये आहे. त्याला देखील एक्स्पीडाईट करण्याचे काम केले जाईल. या शिवाय अजून दोन पंपिंग स्टेशन्स मोगरा आणि माहुल क्रिक येथे उभारावयाचे आहेत. यासंबंधातील कार्यवाही अजून अपूर्ण आहे. तेथे जमिनीच्या, पर्यावरणाच्या, मॅनग्रोव्ह संबंधातील अडचणी आहेत. त्याला पर्याय शोधून त्यासंबंधातील कार्यवाही देखील पूर्ण करण्याचा प्रयत्न येत्या काळात निश्चितपणे करणार आहोत.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.....

सभापती महोदय, दूषित पाण्यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेने स्टेटस ॲनालिसिस ऑफ पाईप लाईन प्रकल्प हाती घेतला आहे. आता पर्यंतच्या सर्व पाईप लाईनचा स्टेटस आपल्याकडे नोटिफाय झालेला नाही. या प्रोजेक्टच्या माध्यमातून महानगरपालिका संपूर्ण पाईप लाईनचे स्टेटस ॲनलिसेस करणार आहे. त्याद्वारे त्या पाईपचे वय किती झाले आहे, त्या पाईपची अवस्था कशी आहे, त्यात किती इंटरव्हेन्शची आवश्यकता आहे, अशा सगळ्या गोष्टी पाहण्यात येणार आहेत. आपल्याला खराब पाईप लाईन बदलावयाची आहे. 31 ऑक्टोबर 2014 पर्यंत एकूण 361 कि.मी.लांबीच्या जुन्या जलवाहिन्या बदलण्यात आलेल्या आहेत आणि आता 141 कि.मी.लांबीच्या जलवाहिन्यांवर अंतर्गत भागावर रेतीमिश्रित सिमेंटचा भर देऊन बदलण्यात आलेल्या आहेत. हा मोठा प्रकल्प आहे. उर्वरित काम हे सुरू आहे. अशा रितीने दूषित पाण्याचा प्रश्न दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

सभापती महोदय, येथे डेंग्यु संबंधात मुद्दा मांडण्यात आला आहे. आज राज्यात डेंग्युचा प्रादुर्भाव वाढत आहे. दरवर्षी आपल्याकडे डेंग्युच्या रूपाने मोठा प्रश्न निर्माण होत आहे. डेंग्युच्या डासाचा देखील हळूहळू रेझिसटन्स वाढत आहे. आपल्याकडे असलेली उपाययोजना फवारणीचे औषध त्यावर काम करीत नाही असे देखील आढळून येत आहे. डेंग्युचा डास हा स्वच्छ पाण्यामध्ये अंडी घालतो याची आपणा सर्वांना कल्पना आहे. त्यामुळे खूप उच्चभ्रू वस्त्यांमध्ये देखील डेंग्युचा प्रादुर्भाव दिसत आहे. यासंबंधात मुंबई महानगरपालिकेने फार मोठे कार्य केले आहे. लोकांपर्यंत जाऊन जागृती केली आहे. मुंबई महापालिकेने कायद्यातील तरतुदीनुसार लोकांना नोटीसा देखील देऊन वॉटर ड्राय डे असणे आवश्यक अशा देखील सूचना केलेल्या आहेत. तसेच मुंबई महानगरपालिकांच्या रूग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा देखील नव्हता. मी स्वतः मुंबई महानगरपालिकेच्या रूग्णालयांना भेट दिलेली आहे. तेथे प्लेटलेटस्‌चा देखील साठा होता. तेथे मोठ्या प्रमाणावर रूग्ण येत होते ही गोष्ट खरी आहे. तेथे येणाऱ्या रूग्णांना सेवा देण्याचा प्रयत्न झाला आहे. इन्स्टिटयूट ऑफ व्हायरोलॉजी यांना देखील कन्सल्ट करण्यास सांगण्यात आले आहे. डेंग्युचा डास आपले रेझिसटन्स वाढवत आहे. त्यावर वेगवेगळ्या फवारणीचा काहीच उपयोग होत नाही. त्यामुळे नवीन कुठली उपाययोजना केली पाहिजे हेही आपण विचारीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस...

सभापती महोदय, येथे फेरीवाल्यांचा मुद्दा देखील सातत्याने पुढे आलेला आहे. हा विषय सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी देखील मांडला आहे. फेरीवाल्यांचे सर्वेक्षण आणि रजिस्ट्रेशन सुरू केलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार फेरीवाल्यांसाठी राज्याची पॉलिसी असावी असे पुढे आले होते. त्या संदर्भात मागील सरकारने एका समितीची स्थापना केली होती. या समितीने नोव्हेंबर 2014 अखेर शिफारशी सादर केल्या आहेत. याबाबत संबधितांशी चर्चा करून तातडीने निर्णय घेणार आहोत. फेरीवाल्याच्यासंबंधातील आपली पॉलिसी पुढच्या अधिवेशनापर्यंत कशी अमलात आणता येईल यासंबंधी राज्य सरकार निश्चितपणे कार्यवाही करणार आहे.

ई-टेंडरमध्ये झालेला घोटाळा देखील मोठा आहे. या प्रकरणी 9 जणांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. 14 लोकांची इतरत्र बदली करण्यात आली आहे. यासंबंधात चौकशी सुरू आहे. प्राथमिक चौकशीमध्ये कोणाचा किती दोष आहे हे लक्षात आल्यानंतर निश्चितपणे संबंधितांवर फौजदारी कारवाई केली जाईल. काही लोकांनी सांगितले की, आम्ही आमचा पासवर्ड आमच्या ज्युनिअरला दिला होता. खरे म्हणजे तो देता येत नाही. तो देणे अतिशय चुकीचे आहे. पासवर्ड देणे हा देखील गुन्हा आहे. या घोटाळ्यात जे जे लोक आढळून येतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल व ज्यांच्यावर आवश्यक आहे त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याचा आमचा मानस आहे.

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजयराव मुंडे, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मांडलेला आहे. हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. यासंबंधी शासनाने काही उपाययोजना केल्या आहेत. तरी देखील अजून अधिकच्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. मुंबईतील विकास नियंत्रण नियमावलीतील नियम 58 अन्वये म्हाडाला प्राप्त होणाऱ्या जमिनींपैकी 50 टक्के जमीन गिरणी कामगारांच्या घरांसाठी वापरावयाची असून त्याकरिता अनुज्ञेय एफएसआय 2 आहे. म्हाडामार्फत 11 ठिकाणी 10165 गाळ्यांचे बांधकाम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस.....

प्रगतिपथावर आहे. त्यापैकी 6948 सदनिका गिरणी कामगारांना उपलब्ध होणार आहेत.

एमएमआरडीएच्या हद्दीत रेंटल हाऊसिंगकरिता प्रकल्प मंजूर केले आहेत. त्यामध्ये 320 चौ.फुटाच्या सदनिका द्यावयाच्या असून 10768 सदनिका गिरणी कामगारांना प्राप्त होणार आहेत. त्या शिवाय मुंबईतील जुन्या कापड गिरणीमध्ये जे कामगार काम करीत होते त्यांचे जास्त वास्तव्य असलेल्या जिल्ह्यात त्यांनी गृहनिर्माण संस्थेसाठी जागा मागितली तर ती देखील देण्यासंबंधी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच गिरण्यांच्या जमिनींवरील चाळींच्या पुनर्विकासाकरिता शासनाने 4 एफएसआय मंजूर केला आहे. सदर एफएसआयपैकी पुनर्वसनासाठी आवश्यक असलेला एफएसआय वगळून उर्वरित एफएसआय वापरून 1:0.4 या प्रमाणामध्ये निर्माण होणारा स्टॉक विभागून त्यातून ज्या सदनिका प्राप्त होतील त्याही गिरणी कामगारांना देण्यात येणार आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ......

ही गोष्ट खरी आहे की, सर्व इंटरव्हेन्शन करुन ही संख्या खूप मोठी होते व प्राप्त परिस्थितीत घरांची संख्या अतिशय कमी आहे. त्यामुळे यासंदर्भात राज्यसरकार कोणत्या योजनेमध्ये आपल्याला बदल करता येईल, कशाचा अंतर्भाव करता येईल व गिरणी कामगारांना जास्तीत जास्त घरे कशी देता येतील यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करेल. सन्माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा निश्चितपणे अंतर्भाव करण्यात येईल.(अडथळा)

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सीआरझेडचे नियम कोळीवाडयासाठी शिथिल केले जातील काय असा मुद्दा उपस्थित केला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, मुंबईतील कोळीवाडयांच्या पुनर्विकासासाठी आपण हा नियम लागू केला आहे. परंतु हा नियम मुंबईच्या बाहेरही लागू करावा अशी त्यांनी मागणी केलेली आहे. यासंदर्भात शासन लवकरात लवकर धोरणात्मक निर्णय करेल. यासंदर्भात आपल्याला केंद्र सरकारशी सुध्दा सल्लामसलत करावी लागणार आहे. ही प्रोसस लवकरात लवकर सुरु करुन यासंदर्भातील धोरणात्मक निर्णय पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी मुंबई महानगरपालिकेत हेल्पलाईनचा विषय उपस्थित केला आहे. खरे म्हणजे मुंबई महानगरपालिकेत हेल्पलाईन असून त्या ठिकणी पाळणाघर, आरोग्य सुविधा अशा प्रकारच्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत. यामध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता असेल तर त्या निश्चितपणे केल्या जातील.

सभापती महोदय, मुंबईतील महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये बाहेरुन येणाऱ्या लोकांसाठी काही व्यवस्था केली जात नाही असा विषय या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. खरे म्हणजे मुंबईमध्ये महापालिकेचे किंवा शासनाचे जे हॉस्पिटल्स आहेत त्या हॉस्पिटलमध्ये बाहेरुन येणारे पेशंटच जास्त प्रमाणात असतात. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या किंवा शासनाचे जे हॉस्पिटल्स आहेत त्या ठिकाणी अशा प्रकारचा कोणताही भेदभाव केला जात नाही. या ठिकाणी आलेल्या सर्व पेशंटना सारखेच ट्रीट केले जाते. बाहेरुन येणाऱ्या लोकांमुळे हॉस्पिटलवर निश्चितपणे ताण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ......

वाढतो परंतु तो ताण सुध्दा आपण सहन करुन त्यांना आवश्यक असलेल्या सुविधा देत असतो.

सभापती महोदय, या ठिकाणी सीसीटीव्हीच्या संदर्भातील विषय उपस्थित करण्यात आलेला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, सीसीटीव्हीचा प्रश्न हा खूप वर्षापासून भिजत पडला आहे. यासंदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार केली होती. या समितीने त्यांच्याकडे आलेल्या निविदांची छाननी केलेली आहे. यासंदर्भात जो फायनान्शिअल बीड आहे त्यामध्ये वाटाघाटी करण्यास थोडा स्कोप आहे. त्यामुळे वाटाघाटीच्या स्कोपचा वापर करुन फायनान्शिअल बीड अधिक चांगले कसे करता येईल यासाठी प्रयत्न केला जाईल. माझे मत असे आहे की, या समिती कडून लवकरच शासनाकडे प्रस्ताव येईल आणि शासन त्याला मान्यता देईल. मी तारीख वगैरे घोषित करीत नाही परंतु पुढील अधिवेशनामध्ये हा प्रश्न या स्वरुपात तरी आपल्याला विचारावा लागणार नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, पोलिसांच्या घरांच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यानी या ठिकाणी विचार व्यक्त केले आहेत. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात मी परवाच निर्णय घोषित केलेला आहे. पोलिसांच्या घरांसाठी 3 आणि 4 चा एफएसआय अनुज्ञेय करण्यात आलेला असून यातून एक मोठा हाऊसिंग स्टॉक तयार होणार आहे. यामध्ये आपण बास्केट ॲप्रोच घेतलेला आहे. ज्या ठिकाणी एफएसआयच्या भरवशावर करता येईल त्या ठिकाणी एफएसआयच्या भरवशावर केले जाईल व ज्या ठिकाणी बीओटीच्या भरवशावर करता येईल त्या ठिकाणी बीओटीच्या भरवशावर करण्यात येईल परंतु हे करीत असतांना त्यामध्ये ट्रान्सपरन्सी आणली जाईल. रिव्हर्स ऑक्शन पध्दत वापरली जाईल तसेच जेथे दोन्ही पध्दती स्वीकारणे शक्य नाही अशा ठिकाणी आपण जवळपास 500 कोटी रुपयांचे कर्ज उभारणार आहोत. काही छोटी सेंटर्स अशी असतील की, त्या ठिकाणी घरे बांधणे आवश्यक आहे. राज्यामध्ये जवळ जवळ 2 लाख घरांची कमतरता आहे. म्हणून बास्केट ॲप्रोच करुन पोलिसांना घरे उपलब्ध करुन देण्यात येतील.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. चांदूरकर साहेबांनी मुंबई महानगरपालिकेमध्ये स्वच्छता मोहीम राबविताना कर्मचाऱ्यांवर सक्ती केली जात असल्याचा मुद्दा

श्री. देवेंद्र फडणवीस ......

उपस्थित केला अहे. कर्मचाऱ्यांवर अशा प्रकारची सक्ती वगैरे करण्यात आलेली नाही. शेवटी साफसफाई हे एक मूल्य आहे. या मूल्यांची जोपासना केली पाहिजे. परंतु स्वच्छतेच्या कार्यक्रमात मुंबई महानरगपालिकेचे कर्मचारी स्वच्छेने सामील होत आहेत. त्यामुळे आता ही महानगरपालिका कोणाकडे आहे, राज्य शासन कोणाचे आहे याचा विचार न करता आपण सर्वांनी सफाई अभियानामध्ये जास्तीत जास्त लोकांना प्रवृत्त केले पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी मेट्रोसारख्याच मुंबई लोकल ट्रेन झाल्या पाहिजेत असा विषय मांडलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, यासंदर्भात आता नुकतीच एक बैठक झाली असून त्या बैठकीमध्ये लोकल ट्रेनमध्ये कशा सुधारणा करावयाच्या, लोकलमध्ये अपघात मोठया प्रमाणात होतात त्यामुळे लोकलमध्ये डोअर सिस्टीम करावी लागणार आहे. मेट्रोला सुध्दा डोअर आहे. मुंबईतील प्रवासी मेट्रोची सिस्टीम चांगल्या प्रकारे हाताळत आहेत. मुंबईचे लोक इतके ॲडॉप्टेबल आहेत की, तुम्ही सिस्टीम तयार कराल ती सिस्टीम ते तातडीने ॲडॉप्ट करीत असतात. त्यामुळे लोकल ट्रेनला सुध्दा दरवाजे रेट्रोफिट करून करता येईल काय हे बघितले आहे. प्रायोगिक तत्वावर हार्बर लाईनच्या काही डब्यांना बंद होणारे दरवाजे लावण्याचा निर्णय घेतलेला आहे. जुन्या डब्यांवर आपण रेट्रोफिट दरवाजे बसवित आहोत. यासंदर्भातील चाचणी यशस्वी झाली तर तिन्ही लाईन्सवर ज्या लोकल ट्रेन्स धावत आहेत त्यांना क्लोज होणारे रेट्रोफिट दरवाजे बसविण्यात येतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी नगरपालिकेच्या संदर्भात काही मुद्दे मांडले होते त्यांसदर्भात योग्यवेळी त्याचे उत्तर मी देईन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी एमएमआरडीएमध्ये निधीचा अभाव असणे, कक्षा वाढविण्याची गरज असणे अशा प्रकारचे काही विषय मांडले होते. यासंदर्भात सांगू इच्छितो की, एमएमआरडीएकडे निधीची कमतरता नाही. एमएमआरडीए ही संस्था आपले रिसोर्सेस स्वत: उभे करून त्याच्या आधारावर विकास करीत असते. एमएमआरडीएला ज्या ठिकाणी आवश्यकता पडते त्या ठिकाणी सरकार आपल्यावतीने निधी उभारण्याकरिता जी मदत केली पाहिजे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ......

ती सातत्याने करीत असते. या चर्चेमध्ये जे वेगवेगळे विषय मांडण्याचा प्रयत्न केला त्यातील टिकेचा भाग सोडला तर मी असे समजतो की, आपल्या सर्वांची भावना अशी आहे की, मुंबईला चांगले शहर म्हणून विकसित करावयाचे आहे. महाराष्ट्राचा मानबिंदू असलेले मुंबई शहर हे जगाचा मानबिंदू झाला पाहिजे अशा प्रकारचा प्रयत्न आपल्या सर्वांना करावयाचा आहे. यासंदर्भात मागच्या काळात तुम्ही काही प्रयत्न केले आहेत, या काळात आम्ही काही प्रयत्न करणार आहोत. मी आपल्याला सांगतो की, आता प्रकल्पांची व निर्णयांची गती वाढली पाहिजे असे आम्ही ठरविले असून अतिशय गतिशील पध्दतीने केंद्रसरकारकडून निर्णय करुन घेणे असेल किंवा राज्य सरकारकडून निर्णय घेणे असेल तर अतिशय गतिशीलतेने आम्ही निर्णय राबविणार आाहोत. आम्ही पुढील काळात अनेक धोरणे आखणार असून ते आम्ही या सभागृहापुढे निश्चितपणे मांडणार आहोत. त्यामुळे माझी आपल्या सर्वांना विनंती आहे की, मुंबईच्या विकासामध्ये आपण सर्वांनी राजकारणाच्या पलीकडे जाऊन एकत्रितपणे प्रयत्न करु या एवढीच विनंती मी या निमित्ताने करतो.

----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महेदय, अंतिम आठवडा प्रस्तावाच्या संदर्भात काल अनेक सन्माननीय सदस्यांनी या सभागृहात चर्चा केली असून या प्रस्तावाची एकूण व्याप्ती पाहता सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अंतिम आठवडा प्रस्तावाच्या संदर्भात जे निवेदन केले आहे आहे ते मला तोकडे वाटते. मुंबईसह 26 महानगरपालिका व नगरपालिकांचा विषय अंतिम आठवडा प्रस्तावात समावेश होता.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 14:30

श्री.धनंजय मुंडे.....

पण यामध्ये मुंबई, एमएमआरडीए आणि केंद्राकडील प्रस्ताव सोडले तर माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरात दुसरे काही ऐकायला मिळाले नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या आजच्या उत्तरामध्ये मुंबईची व्हीजन दिसायला पाहिजे होती, ती आम्हाला दिसली नाही, हे मी येथे प्रामाणिकपणे सांगतो.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी काही महत्वाचे विषय येथे उपस्थित केले त्यामध्ये मुंबईतील वाहतुकीची कोंडी कशी सोडविणार आहात हा एक प्रश्न होता. ही वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी जलवाहतुकीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात काहीच सांगितले नाही.

सभापती महोदय, मुंबईच्या विकासासाठी माननीय पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली आहे त्या संदर्भातील निवेदन करताना मुंबईला कोणी वेगळे करु शकणार नाही असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले, त्यावेळी भारतीय जनता पक्षातील सदस्यांनी बाके वाजविली, परंतु शिवसेना पक्षाच्या सदस्यांकडून बाके वाजविण्यात आली नाहीत. या समितीची व्याप्ती काय आहे ? या समितीला कायदेशीर घटनात्मक दर्जा मिळालेला आहे का ? हा विषय महत्वाचा आहे कारण ज्या महत्वाकांक्षी समितीची घोषणा झाली, ती उद्या फेल जाऊ नये अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, सरकारचे मोनोरेल बाबत काय धोरण आहे यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात काही सांगितले नाही. मुंबईच्या एसआरएमधील भ्रष्टाचाराबाबतची प्रकरणे सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केली. पण त्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात काहीच उल्लेख केला नाही.

सभापती महोदय, मी माझ्या भाषणात डेंग्यू आजाराचा उल्लेख केला होता. डेंग्युच्या निर्मूलनासाठी करण्यात आलेल्या फवारणीमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. फवारणीसाठी निकृष्ट दर्जाची औषधे देण्यात आली नव्हती. माननीय आरोग्य मंत्री महोदयांनी एका लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते मान्य केले होते. परंतु त्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरात काही उल्लेख आलेला नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून सांगू इच्छितो की, मी तसे काही मान्य केलेले नाही. मी त्यावेळी उत्तर देताना सांगितले होते की, मुंबई महानगरपालिकेमध्ये काही वर्षापूर्वी असा ठराव झालेला आहे की, एखादे औषध परिणामकारक नसेल तर त्या औषधाची पुन्हा मागणी करता येते. त्या ठरावाच्या अनुषंगाने आपण पुन्हा औषधाची मागणी केली होती.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आपण त्या कंपनीला दंड का केला ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सदर कंपनीने औषध पुरवठा करण्यासाठी उशीर केला होता म्हणून दंड करण्यात आलेला आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ई-टेंडरींग बाबत खालच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल अशी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली. तसेच त्यांनी काही जणांवर कारवाई केल्याचे सांगितले. पण ज्या अधिकाऱ्यांना महानगरपालिकेचे उपायुक्त पाठीशी घालत आहेत त्यांच्यावर काय कारवाई करणार याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणात काही सांगितले नाही.

सभापती महोदय, या अंतिम आठवड्याच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केल्या, जे प्रश्न उपस्थित केले त्याचा उल्लेख माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात केलेला नाही. या प्रश्नांच्या संदर्भात आम्हाला त्यांच्याकडून उत्तराची अपेक्षा आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काही महत्वाचे प्रश्न येथे उपस्थित केले. जलवाहतुकीच्या संदर्भात सांगू इच्छितो की, आपण ईस्टर्न फ्रन्ट जलवाहतूक सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या संदर्भातील कार्यवाही करीत आहोत. वेस्टर्न फ्रन्टवरुन जलवाहतूक फक्त सात महिने होऊ शकेल असा रिपोर्ट आलेला आहे. त्यामध्ये दुमत आहे म्हणून आम्ही अधिक माहिती घेत आहोत. जलवाहतुकीच्या संदर्भात आम्ही ओपन आहोत. इस्टर्न फ्रन्ट जलवाहतूक सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. पण वेस्टर्न फ्रन्ट जलवाहतूक सुरु करण्याबाबत काही अडचणी आहेत, त्या अडचणी दूर झाल्या तर त्या ठिकाणी जलवाहतूक सुरु करता येईल.

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस....

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मोनोरेल बाबत प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, मोनोरेल ही स्टॅन्ड अलोन सिस्टीम होऊ शकत नाही. मोनोरेल ही फीडर ट्रान्सपोर्ट सिस्टीम होऊ शकते. आपण आता जी मोनोरेल केली आहे ती स्टॅन्ड अलोन केली आहे. ती फीडर म्हणून केलेली नाही. आपणास मोनोरेलचा फीडर म्हणून वापर करायचा आहे. त्यासाठी या योजनेचा दुसरा टप्पा पुढील वर्षी पूर्ण झाल्यानंतर त्याची रायडरशीप वाढणार आहे. मला मोनोरेलमध्ये बसून पहायचे आहे असे लोक मोनोरेलमधून प्रवास करीत आहेत. आपण त्यास अजून इंटिग्रेट केलेले नाही. मोनोरेलचा दुसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर रायडरशीप निश्चितपणे वाढणार आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी ई-टेंडर घोटाळ्याचा उल्लेख करण्यात आला. त्यामध्ये उपायुक्तांचा संबंध असेल तर त्यांची देखील चौकशी करण्यात येऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, एसआरए भ्रष्टाचाराच्या संदर्भात ज्या केसेस मांडण्यात आल्या त्या प्रत्येक केसची चौकशी करण्यात येईल. या चौकशीत जे काही निष्पन्न येईल ते सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येईल.

सभापती महोदय, मुंबईच्या समिती संदर्भात मी पुन्हा एकदा माननीय विरोधी पक्ष नेते आणि सभागृहाला सांगू इच्छितो की, अशी कोणतीही समिती गठीत झालेली नाही. राज्य सरकारला तशी समिती गठीत करण्याचा अधिकार नाही आणि कार्यकक्षा ठरविण्याचा देखील अधिकार नाही. केंद्र सरकारच्या अखत्यारितील विषयांकरिता केंद्र सरकारने समिती गठीत करावी अशी आपण त्यांना विनंती केलेली आहे. या संदर्भातील योग्य माहिती माननीय श्री.शरद पवार साहेब यांच्यापर्यंत पोहोचविली नाही. श्री.शरद पवार साहेब कधी चुकत नाहीत. त्यांच्या पत्रातून अशा इनकरेक्ट फॅक्चुअल गोष्टी कधीच येत नाही. पण त्यांना अशी माहिती देण्यात आली की, या संदर्भात समिति गठीत करण्यात आली आणि ती मुख्यमंत्र्यांनी सभागृहात घोषित केली. तेव्हा त्यांच्या पत्रामध्ये अशी समिती गठीत करण्यात आली आहे,ती मुख्यमंत्र्यांनी घोषित केली आहे अशा

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस....

गोष्टी आल्या. आपण माननीय श्री.पवार साहेबांना फॅक्चुअली करेक्ट गोष्टी सांगितल्या पाहिजेत. माननीय श्री.शरद पवार साहेब आणि आमचे काही वैचारिक मतभेद असतील, परंतु अशाप्रकारच्या मुद्यावर ते कधीच कोणाला चुकीचे गाईड करणार नाहीत असा मला विश्वास आहे. तेव्हा आपण समजून घेतले पाहिजे की, ही समिती राज्य सरकारने गठीत केलेली नाही. केंद्र सरकारला त्यांच्या अखत्यारितील प्रकल्पांना त्यांना असलेल्या अधिकाराच्या अंतर्गत त्यांनी ती गठीत करावी अशी त्यांना विनंती करण्यात आली आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अंतिम आठवडा प्रस्तावाच्या अनुषंगाने मुंबई शहरातील प्रश्नांबाबत येथे उल्लेख केला. केंद्र सरकारच्या स्तरावर सर्व परवानगी मिळण्यासाठी माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असावी असा दृष्टीकोन त्यांनी समोर ठेवला. माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास विसरु नये. मुंबई महाराष्ट्रात रहावी की, गुजरात राज्यात रहावी यासाठी त्यावेळी काय वातावरण होते आणि त्यावेळी काय झाले हे मी येथे सांगण्याची आवश्यकता नाही. एक समिती नेमून त्यातून कोणी महाराष्ट्रात चंचू प्रवेश करीत असेल तर आणि भविष्यात दिशा देण्याचा कोणी प्रयत्न करीत असेल तर ते आम्ही खपवून घेणार नाही आणि आपणही तसेच सांगितलेले आहे. मुंबई महाराष्ट्रापासून कोणीही तोडू शकणार नाही. कोणी तोडू शकणार नाही हा विषयच नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्या पद्धतीने सुरुवात केली होती त्याबाबत माननीय श्री.शरद पवार साहेबांना देखील शंका आली. श्री.शरद पवार साहेबांना माहिती नाही असे होऊ शकत नाही. त्यांचा अत्यंत बारकाईने अभ्यास आहे आणि महाराष्ट्रावर बारकाईने लक्ष ठेवणारे श्री. पवार साहेब यांच्या बाबत जे शब्दप्रयोग केलेले आहेत की, त्यांना कदाचित माहीत नसावे, त्यांना कोणी माहिती सांगितली नसावी हे दुर्भाग्य आहे. तेव्हा या संदर्भात स्पष्टपणे भूमिका घेऊन महाराष्ट्राचा, मुंबई शहराचा विकास, माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनीच केला पाहिजे आणि महाराष्ट्रातील जनतेने केला पाहिजे. त्यामध्ये गुजरात किंवा दिल्लीला येथे हस्तक्षेप करता येणार नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 14:40

श्री.माणिकराव ठाकरे....

त्यांनी त्यांचे अधिकार जरूर वापरावेत. त्यांचे अधिकार वापरण्यासाठी त्यांनी आपली शक्ती पूर्णपणे वापरावी. परंतु मुंबई किंवा महाराष्ट्राचा विकास करण्यासाठी दिल्लीच्या समित्या स्थापन केल्या तर महाराष्ट्राचा कारभार हा महाराष्ट्राच्या हातामध्ये राहणार नाही. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी या बाबतीत त्यांचा जो विचार आहे तो परत घेतला पाहिजे. राज्यातील जनतेने राज्याचा कारभार माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या हातात सोपविला आहे. त्यामुळे मुंबईचा विकास हा माननीय मुख्यमंत्र्यांच्याच नेतृत्वाखाली झाला पाहिजे. मुंबईच्या विकासाची जबाबदारी निश्चित केंद्राची आणि माननीय पंतप्रधानांची आहे. दोन्ही ठिकाणी एकाच पक्षाचे सरकार आहे. ज्यावेळी माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस, माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे विरोधी पक्षात होते त्यावेळी ते वारंवार सांगायचे की, केंद्रात आमच्या पक्षाचे सरकार आल्यास कोणत्याही कामाला जी काही परवानगी लागेल ती आम्ही दुसऱ्या दिवशी घेऊन येऊ. मी माननीय मुख्यमंत्र्यांना आठवण करून देतो की, सध्या दिल्लीत आपल्या पक्षाचे सरकार आहे. त्यामुळे आपण पूर्वी सांगितल्यानुसार परवानग्या आणल्या पाहिजेत. महोदय, अशा प्रकारची समिती स्थापन करण्यामागे काहीतरी काळेंबेरं आहे, असे आम्हाला वाटते. कदाचित ही बाब आपल्या लक्षात येत नसेल. पण आपण डोळ्यामध्ये तेल घालून यावर लक्ष ठेवावे की, मुंबई कोणाच्या घशात जाण्यासाठी पहिले पाऊल या सरकारकडून पडू नये. या गोष्टीची खबरदारी सरकारने घेतली पाहिजे, असे मला वाटते.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी असे ऐकले होते की, झोपलेल्या व्यक्तीला जागे करता येऊ शकते, पण झोपेचे सोंग घेणाऱ्याला जागे करता येऊ शकत नाही. या निमित्ताने मी सांगतो की, मुंबई आणि महाराष्ट्राचा विकास हेच सरकार करणार आहे आणि ते सुध्दा माझ्या नेतृत्वाखालील सरकारच करणार आहे. त्यामुळे आपण या बाबतीत काळजी करु नये. यासाठी कोणाचीही आवश्यकता नाही. पण या देशाच्या माननीय पंतप्रधानांनी मुंबईला येऊच नये असे जर आपल्याला वाटत असेल तर या देशाच्या फेडरीलझमवर एक प्रकारचा आघात तुम्ही करीत आहात, असे मला वाटते. देशाच्या माननीय पंतप्रधानांचे महत्त्व आपण ओळखले पाहिजे. देशाच्या माननीय पंतप्रधानांनी मुंबईमध्ये येऊच नये, मुंबईकडे पाहूच नये, अशा प्रकारची आपली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस....

मानसिकता असेल तर ती मानसिकता खपवून घेतली जाणार नाही. महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र राज्याचेच सरकार काम करेल. महोदय, राज्याचे जे प्रश्न दिल्लीमध्ये अडकले आहेत ते प्रश्न निश्चितपणे माननीय पंतप्रधान सोडवतील, एवढेच या निमित्ताने सांगतो.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रित बोलतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या सांगण्याचा सार असा निघतो की, सन्माननीय प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत समिती व्हावी, त्या समितीचे अध्यक्षपद त्यांनी भूषवावे आणि मुंबईचे प्रश्न मार्गी लावावेत. या अनुषंगानेच ते बोलले. पण माननीय मुख्यमंत्र्यांनी याचा अर्थ वेगळा काढला. मुंबईत कोणी यावे की येऊ नये, या बाबतीत सन्माननीय सदस्य काहीच बोलले नाही. त्यांनी एवढेच सांगितले की, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस यांना राज्याच्या जनतेने मुख्यमंत्री पदी बसविले असल्यामुळे, स्वाभाविकपणे राज्याचा विकास सुध्दा त्यांच्या नेतृत्वाखाली व्हावा. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली विकास होत असताना, मुंबईसाठी वेगळी समिती कशासाठी गठीत करीत आहात ? माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण वारंवार सांगता की, मी कर्तृत्ववान मुख्यमंत्री आहे. त्यामुळे इतरांकडून नव्हे तर आपल्याच नेतृत्वाखाली मुंबईचा आणि महाराष्ट्राचा विकास व्हावयास पाहिजे. आज राज्यात आणि केंद्रात आपल्याच पक्षाचे सरकार आहे. राज्याला जर केंद्र सरकारकडून चार परवानग्या हव्या असतील तर, आपण एवढे कार्यक्षम आहात की, त्या चार परवानग्या आपल्याला मिळू शकतील. या निमित्ताने एवढेच सांगतो की, या बाबतीत वेगळा समज करुन घेणे चुकीचे आहे.

**उप सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 14:40

**पृ. शी.** : शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी), प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) विधेयक.

L.A. BILL NO. XXXIV OF 2014

( A BILL TO PROVIDE FOR RESERVATION OF SEATS FOR ADMISSION IN EDUCATIONAL INSTITUTIONS IN THE STATE AND OF APPOINTMENTS OR POSTS IN PUBLIC SERVICES UNDER THE STATE TO EDUCATIONALLY AND SOCIALLY BACKWARD CATEGORY (ESBC) IN THE STATE OF MAHARASHTRA FOR THEIR ADVANCEMENT AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-34, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता (ईएसबीसी), त्याच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाकरिता आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या किंवा पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (3) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.देवेंद्र फडणवीस : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-34, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता (ईएसबीसी), त्याच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाकरिता आणि राज्याच्या

..4..



श्री.देवेंद्र फडणवीस....

नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या किंवा पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 20 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-34 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून एकमताने संमत झाला.

**उप सभापती** : सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-34 संमत झाले आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : फ्लेम विद्यापीठ विधेयक.

L.A. BILL NO. XXXIX OF 2014

( A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT, INCORPORATION AND REGULATION OF THE FLAME UNIVERSITY, FOR THE DEVELOPMENT AND ADVANCEMENT OF HIGHER EDUCATION IN THE STATE AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.रवींद्र वायकर ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-39, राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता फ्लेम विद्यापीठाची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.रवींद्र वायकर : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-39, राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता फ्लेम विद्यापीठाची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात, यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.स.वि. क्रमांक 39 - राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता फ्लेम विद्यापीठाची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता आणलेल्या विधेयकाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

मागच्या सरकारने राज्यामध्ये शिक्षणाचे खाजगीकरण वेगाने रेटण्याचा प्रयत्न केला, त्याच पध्दतीने नवीन आलेले सरकार प्रयत्न करीत असेल तर त्याला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. मला असे वाटत होते की, नवीन आलेले सरकार याबद्दलची भूमिका बदलेल आणि शिक्षणाचे वाढते खाजगीकरण, व्यापारीकरण रोखण्याचा प्रयत्न करील. शासनाने विद्यापीठाची 2 विधेयके शेवटच्या दिवशी आणून घाईने संमत करण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्यामुळे हे स्पष्ट होते की, नवे सरकार सुध्दा खाजगीकरणाच्या बाजूने आहे, व्यापारीकरणाच्या बाजूने आहे. राज्यातील गोरगरिबांना शिक्षण मिळावे, सर्वांना समान शिक्षण मिळावे या दृष्टीने ते प्रयत्न करताना दिसत नाहीत. त्यामुळे या विधेयकाला मी विरोध करण्यासाठी उभा आहे. मी ऑन लेग आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, दीड तासांच्या आत माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करण्याबाबत सांगितले होते. त्यामुळे मी या संदर्भात आपल्याला विनंती करीत आहे.

**उप सभापती** : मी दीड तासांचा वेळ दिला आहे. तुम्ही रेकॉर्ड तपासावे. अजून अर्धा तास शिल्लक आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मागच्या वेळी मागणी केली होती की, या विद्यापीठांमध्ये सामाजिक न्यायासाठी दलित, आदिवासी, ओबीसी यांच्यासाठी आरक्षण असले पाहिजे. सदर बाबतीतील तरतूद जरूर करण्यात आली आहे. पण त्या विद्यार्थ्यांनी या विद्यापीठांत प्रवेश घेतल्यानंतर त्यांच्या फी चा, खर्चाचा प्रश्न येतो, त्याची जबाबदारी कोण घेणार आहे ? ती जबाबदारी ना सरकार घेत ना विद्यापीठांवर टाकत.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देतच असतात.)

**उप सभापती** : दीड तास अजून व्हायचा आहे. मी मान्य केले होते की, ते या संदर्भात दीड तासात आपले विचार मांडतील.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मागच्या वेळी देखील मी हे आग्रहाने मांडले होते की, जे दलित, आदिवासी, ओबीसी, भटके विमुक्त विद्यार्थी आहेत, ज्यांना या विद्यापीठांमध्ये प्रवेश घ्यायचा असेल त्यांच्या फी चा, खर्चाचा विचार झाला पाहिजे. (गोंधळ) अजून अर्धा तास बाकी आहे. माननीय सभापतींचे रूलिंग आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी अर्धा तास थांबले पाहिजे. सरकार विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे पाहण्यास, त्यांचे म्हणणे ऐकण्यास तयार नाही.

**उप सभापती** : आपण काय बोलत आहात, ते माझ्यापर्यंत ऐकू येत नाही. आपण रेकॉर्डवर आणण्यासाठी बोलत आहात का ? आपण आपले म्हणणे पटलावर ठेवा. मी आपले म्हणणे पटलावर घेतो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी माझे म्हणणे पटलावर ठेवत नाही. मी बोलत राहतो. माझे बोलणे मी चालू ठेवले आहे. मी ऑन लेग आहे. मी बोलत आहे. माझे भाषण सुरूआहे. विधेयकावर बोलताना अडविता येत नाही. जोपर्यंत चर्चारोध लावत नाही तोपर्यंत बोलता येते. तो माझा अधिकार अबाधित ठेवावा, अशी माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण मला माझ्या अधिकाराची जाणीव करून देण्याची काही गरज नाही. मी माझ्या अधिकारात तुम्हाला बोलण्यास संधीही देऊ शकतो आणि संधी नाकारूही शकतो. त्यामुळे माझ्या अधिकारांना तुम्ही चॅलेंज करायचे नाही. मी तुम्हाला खालीही बसवू शकतो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आपला अधिकार आहे, हे मला मान्य आहे. मघाशी माननीय मुख्यमंत्र्यांनी विनंती केली की, निवेदनाच्या संदर्भात दीड तास थांबले पाहिजे. माननीय सभापती यांनी रूलिंग दिले आहे. शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी यासाठी हे विधेयक आणले आहे. देशातील व राज्यातील एकही खाजगी विद्यापीठ असे नाही की ज्याने स्वत: संशोधन केले आहे, ज्याने जागतिक पातळीवर क्रमवारीमध्ये स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. जी चांगली विद्यापीठे आहेत ती संपुष्टात आणायची आणि अशा प्रकारे विद्यापीठे आणायची हे बरोबर नाही. मुंबई, पुणे विद्यापीठ आहे. आपल्या राज्यात अनेक विद्यापीठे आहेत, त्यांना ताकद द्यायची नाही आणि



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

दुसरीकडे खाजगी विद्यापीठे जी व्यक्तिगत नावाची आहेत, त्यांची दुकानाच्या मागे दुकाने मांडायची असे सुरू आहे. ही दुकाने पुढाऱ्यांची, शिक्षण सम्राटांची आहेत. ही दुकाने शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्यांची आहेत. त्यामुळे माझा त्याला विरोध आहे. नवीन सरकारकडून अपेक्षा होती की, त्यांनी हे खाजगीकरण, व्यापारीकरण थांबवावे. परंतु, नवीन सरकारने फ्लेम विद्यापीठाचे विधेयक अशा रितीने मांडले. विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये म्हटले आहे की, "भारत सरकारने हाती घेतलेल्या आर्थिक सुधारणांमुळे उच्च शिक्षणाच्या संबंधातील धोरणनिश्चितीत बदल करणे आणि पायाभूत विकासात खाजगी क्षेत्राला सहभागी करून घेणे अपरिहार्य झाले आहे. त्यानुसार, महाराष्ट्र शासनाने, राज्यात उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करून त्याद्वारे उच्च शिक्षण क्षेत्रातील संधी, गुणवत्ता, सर्वसमावेशकता व संशोधन यांमध्ये वाढ करण्यासाठी खाजगी क्षेत्राचा सहभाग सुकर करण्याकरिता भरीव प्रयत्न करण्याचे ठरविले आहे." (गोंधळ) उद्देशच सांगतो की, खाजगी क्षेत्राच्या आर्थिक सुधारणा तत्कालीन माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारमध्ये अगोदर होत्या. आपण त्याच का ठेवत आहात ? आपण करीत असलेल्या आर्थिक सुधारणा कोणाच्या बाजूने आहेत, त्या गरिबांच्या बाजूने आहेत की श्रीमंताच्या बाजूने आहेत ? देशात आर्थिक सुधारणाचे चक्र जेव्हा सुरू झाले, तेव्हापासून बहुजन समाज, गरीब समाज, मध्यमवर्गीय समाज मार्जिनलच झाला आणि तो या शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकला गेला, तो बाजारातून बाहेर फेकला गेला. आज आपणाला बाजारामध्ये जायचे असेल तर खिशात पैसे असावे लागतात आणि पैसे असतील तरच आपण मॉलमध्ये जाऊ शकतो. तुम्ही शिक्षणाचे मॉल उभे करू नका. आपण शिक्षणाचा बाजार उभा करू पाहत आहात. मग त्यामध्ये कोण प्रवेश घेईल ?

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण आता विधेयकावरील भाषण थांबवावे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचे या विधेयकावरील भाषण अपूर्ण राहिलेले आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देतच असतात.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठ विधेयक

L.A. BILL NO. XL OF 2014

( A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT, INCORPORATION AND REGULATION OF THE AJEENKYA D.Y.PATIL UNIVERSITY FOR THE DEVELOPMENT AND ADVANCEMENT OF HIGHER EDUCATION IN THE STATE AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. रवींद्र वायकर (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि. क्रमांक 40 - राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. रवींद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि. क्रमांक 40 - राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे यांसाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्यांकडून घोषणा देण्यात येत असतात.)

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 50 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रवींद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि. क्रमांक 40 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकाच वेळी मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2014 चे वि.स.वि. क्रमांक 40 संमत झाले आहे.

----

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील शासकीय रक्तपेढ्यांतील रक्ताच्या पिशवीचा दर.

**मु.शी.** : राज्यातील शासकीय रक्तपेढ्यांतील रक्ताच्या पिशवीचा दर संबंधी माननीय आरोग्य मंत्र्यांचे निवेदन

डॉ. दीपक सावंत (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो. :-

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>मुस्लीम आरक्षणाबाबत</u>**

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, इतका वेळ होऊन सुध्दा अजून निवेदन करण्यात आलेले नाही. सदनातील सर्व सन्माननीय सदस्य मुस्लीम आरक्षणाच्या बाबतीत सरकारकडून होणाऱ्या निवेदनाची वाट पाहत आहेत. इतका वेळ होऊनही सरकारकडून निवेदन करण्यात येत नाही. त्यामुळे यामधून या सरकारला मुस्लीम अल्पसंख्याकांना आरक्षण द्यायचे नाही, असाच अर्थ निघत आहे. त्यामुळे आम्ही सर्व विरोधी पक्षातील सदस्य सरकारचा निषेध करून सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात.)

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : फ्लेम विद्यापीठ विधेयक.

L.A. BILL NO. XXXIX OF 2014

( A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT, INCORPORATION AND REGULATION OF THE FLAME UNIVERSITY, FOR THE DEVELOPMENT AND ADVANCEMENT OF HIGHER EDUCATION IN THE STATE AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

(चर्चा पुढे सुरु.........

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, एकच अडचण आहे की, अजिंक्य डी.वाय.पाटील विद्यापीठ विधेयक ज्या वेळी आपण मतास टाकले त्यावेळी मी पोल मागितला होता. पण मला दिला गेला नाही. हे बरोबर नाही. (अडथळा) मी आपल्याबद्दल बोलत नाही. आपल्या बद्दल कसा बोलू शकेन. तुम्ही माझ्या बाजूचे आहात, याची मला खात्री आहे. पण सरकारी पक्षाच्या अडचणी मला कळत आहेत.

**उप सभापती** : तुम्ही दोघेही जर एकाच बाजूचे असाल तर दोघेही बाहेर जा, एकत्र विचार करुन आतमध्ये या. मी हे निर्देश दिले आहेत. माननीय श्री.रावते साहेब बरोबर आहे ना ? तुम्ही सभागृहात बोलला की नाही ? तुम्ही आणि मी एक आहे. तुम्ही माझे निर्देश मानत नाही. आता हा वाद का घालत आहात. आमच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा प्रयत्न करु नका.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सांगतो की, पहिल्या बिलाच्या वेळी मी पोल मागितला होता. अडचण नाही. परंतु, आता ज्या फ्लेम विद्यापीठ विधेयकावर आपण चर्चा करीत आहोत त्या विधेयकावर मी पोल मागणार आहे, हे मी अगोदरच आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

**उप सभापती** : आपण पोल मागितल्याचे मी ऐकले नाही. परंतु, दोन्ही विधेयकांचे सायटेशन मी व्यवस्थितरित्या वाचले आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, गोंधळामुळे तसे झाले. मी आपल्याला दोष देत नाही. आपल्याला दोष देण्याचा अधिकार मला नाही. आपण सर्वोच्च स्थानावर बसलेला आहात.

...2......

श्री.कपिल पाटील...........

परंतु, मी आपल्याला विनंती करतो की, ज्यावेळी हे बिल मतास टाकले जाईल त्यावेळी मला पोल मागावयाचा आहे. गोंधळामध्ये आवाज ऐकू जाणार नाही. म्हणून मी आधीच सांगतो. मी लेखी नोटीस दिली होती. मला याची पूर्ण कल्पना आहे की, एखाद्या संवेदनशील प्रश्नावर सभागृहामध्ये गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली तर माझा आवाज आपल्यापर्यंत येणार नाही.

सभापती महोदय, मुस्लीम समाजातील मागास प्रवर्गाला आरक्षण मिळाले पाहिजे. खाजगी विद्यापीठांमध्ये सुध्दा ज्या पध्दतीने दलित, आदिवासी यांना आरक्षण नाही, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांना आरक्षण नाही, इतर मागासवर्गीयांना आरक्षण नाही, शैक्षणिक आणि

सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या मराठा समाजाला आरक्षण नाही. जो सगळ्यात दुबळा समाज आहे, ज्याला सच्चर समितीने आणि रंगनाथन समितीने दलितांपेक्षा वाईट स्थिती निर्माण झाली आहे, असे सांगितले आहे, त्या मुस्लीम समाजाला आरक्षण दिलेले नाही आणि म्हणून मी या बिलावर बोलावयास उभा राहिलो आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "भारत सरकारने हाती घेतलेल्या आर्थिक सुधारणांमुळे उच्च शिक्षणाच्या संबंधातील धोरण निश्चितीत बदल करणे आणि पायाभूत विकासात खाजगी क्षेत्राला सहभागी करुन घेणे अपरिहार्य झाले आहे."

सभापती महोदय, या देशात 20 वर्षापूर्वी खाजगीकरण आले आणि ते कोणत्या टोकाला जाऊन उभे राहिले आहे, याचे प्रतिबिंब म्हणजे ही दोन विधेयके आहेत. मागील सरकारने अशा प्रकारे अमेठी आणि स्पायसर ही दोन विधेयके मागील काळात पारित करुन घेतली होती व मी त्याला विरोध केला होता. हे सर्वोच्च सभागृह आहे. या सभागृहात एका सदस्याचा विरोध असला तरी त्या सदस्याला विधेयकावर बोलण्याचा पूर्ण अधिकार असतो. आपले आसन, आपले अधिकार सर्वोच्च आहेत. आपण एका सदस्याला सुध्दा संरक्षण देत आहात. तीच परंपरा यापुढेही कायम राहील, याबद्दल मी आपल्यावर पूर्ण विश्वास व्यक्त करतो आणि श्रध्दा देखील व्यक्त करतो.

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील............

सभापती महोदय, खाजगीकरणाचे जे धोरण 20 वर्षापूर्वी तत्कालीन अर्थमंत्री श्री.पी.व्ही.नरसिंह राव यांनी सुरु केले आणि त्यानंतरचे माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी त्यास अधिक गती दिली, त्या खाजगीकरणातून या देशातील दुर्बल समाज, अधिकाधिक मार्जीनलाईज होत गेला, अधिकाधिक लोटला गेला. शिक्षणाची सगळी धोरणे ही त्या दिशेने झाली. बाजारी व्यवस्थेच्या बाजूने या देशातील शिक्षण धोरण, बाजारी व्यवस्थेच्या बाजूने या देशातील अर्थकारण जर धावू लागले तर या देशातील कोट्यवधी जनतेने कोठे जायचे ? या देशाची लोकसंख्या 125 कोटी पर्यंत गेली आहे, आपल्या राज्याची लोकसंख्या 10 कोटी पार करुन गेली आहे, या 10 कोटी मधील 8 कोटी लोक असे आहेत की, त्यांच्या खिशामध्ये क्रयशक्ती नाही, पैसा

टाकून ते शिक्षण घेऊ शकत नाहीत. त्यांच्या खिशामध्ये अशी खरेदी शक्ती नाही की, कोणत्याही बड्या मॉलमध्ये जाऊन ते खरेदी करु शकतील. 20 आणि 25 टक्के लोकांसाठीच आपण सगळी धोरणे आखणार आहोत.

सभापती महोदय, आज आपण महानगरांची, त्यांच्या पायाभूत सुविधा वाढविण्याची चर्चा करतो. उद्योगधंदे वाढले पाहिजेत, रस्ते वाढले पाहिजेत. पण या पायाभूत सुविधा, वाढणाऱ्या सुविधा कुणासाठी आहेत ? या सुविधांपासून येथील गरीब वर्ग, येथील कनिष्ठ मध्यमवर्ग, येथील कामगार वर्ग, शेतमजूर, कारखान्यात काम करणारा कामगार, शिपाई किंवा लिपिक यांना आपण वंचित ठेवणार आहोत का ? त्यांच्यासाठी आपण शिक्षणाचे दरवाजे बंद करणार आहोत का ? एका बाजूला सरकारी विद्यापीठे, सरकारी महाविद्यालये बंद करायची, त्यांचे अनुदान थांबवायचे, त्यांचा दर्जा घसरवत न्यायचा, अनुदान मागणाऱ्यांना वर्षानुवर्षे वाट पहायला लावायची आणि दुसऱ्या बाजूला खाजगी विद्यापीठांना, स्वयंअर्थसहाय्यित शाळांना परवानग्या द्यायच्या, हे मागील सरकारमध्ये झाले. मला असे वाटत होते की, नवे सरकार आल्यानंतर अच्छे दिन येतील. पण अच्छे दिन अजून आलेले नाहीत. मला असे वाटत होते की, तुम्ही त्यांच्या विरोधात मतांचा कौल मागत या देशामध्ये आणि या राज्यामध्ये सत्तेवर आलेला आहात. त्यांच्या विरोधात जाऊन तुम्ही

...4.....

अस्वधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

श्री.कपिल पाटील.........

सत्तेवर आलेला आहात. ज्यांच्या विरोधात लोकांनी तुम्हाला मतदान केले आहे, त्या लोकांच्या बाजूने तुम्ही उभे राहण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे ही मागची दोन बिले तुम्ही का रेटत आहात ? या बद्दलच्या ज्या सुधारणा आवश्यक आहेत त्याही आपण करीत नाही.

सभापती महोदय, आपले शिक्षण मंत्री, ज्यांनी परवाच्या भाषणमध्ये शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या संदर्भात अत्यंत अप्रतिम असे भाषण केले. मी त्यांना दाद देतो. काही मतभेद असतील परंतु त्यांनी जी भूमिका मांडली त्याबद्दल मी दाद देतो. पण मग ती भूमिका या विद्यापीठाच्या बाबत का असू नये ? विद्यापीठाची गुणवत्ता वाढली पाहिजे. एका बाजूला मुंबई विद्यापीठामध्ये हायकोर्टाने ज्यांना अपात्र ठरविलेले आहे, ज्यांच्याबद्दल ताशेरे ओढलेले आहेत, त्या वेळुकरांचा राजीनामा आपण घेऊ शकत नाही. अशा लोकांच्या हातामध्ये आपली गाजलेली 100 वर्षांचा इतिहास असलेली विद्यापीठे देतो आणि दुसऱ्या बाजूला खाजगी विद्यापीठे, जी कोणाच्या ना कोणाची खाजगी मालकीची आहेत, अशा विद्यापीठांना उत्तेजन देत आहोत.

सभापती महोदय, मघाशी गोंधळामध्ये अजिंक्य डी.वाय.पाटील विधेयक मंजूर झाले. या देशातील जनता अजिंक्य आहे. या देशातील गोरगरीब जनता अजिंक्य आहे. पण तुम्ही कोणाच्या तरी साखर सम्राटांच्या, शिक्षण सम्राटांच्या मुलांना अजिंक्य करून त्यांच्या नावाच्या विद्यापीठांचे बाजार या राज्यात मांडणार असाल तर त्याला माझा विरोध आहे आणि या सभागृहाने देखील त्याला विरोध केला पाहिजे. मला खात्री आहे की, या सरकार मधील अनेक लोक त्या बाजूने आहेत. ते या गरिबांच्या बाजूने आहेत. फक्त अडचण अशी आहे की, बोलायचे कसे ? आवाज उठवायचा कसा, हा त्यांच्यापुढे प्रश्न आहे.

सभापती महोदय, एका बाजूला आपण असे म्हणतो की, विद्यापीठांचा दर्जा वाढला पाहिजे. अभिवृध्दी केली पाहिजे आणि दुसऱ्या बाजूला खाजगी विद्यापीठांचा उपाय शोधत आहोत. खाजगीकरण, व्यापारीकरण करीत आहोत. का नाही आपण नागपूर विद्यापीठाला, अमरावतीच्या संत तुकडोजी महाराज विद्यापीठाला, गाडगे महाराज विद्यापीठाला, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला, पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाला मोठ करायचे ? एकेकाळी मुंबई विद्यापीठाचा नावलौकिक

...5....



श्री.कपिल पाटील.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जगभर होता. आज जगभरामध्ये आपल्या विद्यापीठांचा दर्जा पहिल्या 10 मध्ये देखील नाही. एकही विद्यापीठ पहिल्या 10 मध्ये नाही. जगाच्या 200 विद्यापीठांमध्ये आपल्या राज्याचे एकही विद्यापीठ नाही. जगभरातील 100 विद्यापीठांमध्ये आपले राज्य नाही. खरगपूर विद्यापीठ आणि दिल्ली विद्यापीठ यांचा 143 वगैरे क्रमांक लागतो. आपला तर 200 च्या जवळपासही नाही. 250 नंतर आपले नंबर लागतात. इतकी लाजिरवाणी अवस्था असताना खरे तर या सरकारपुढे हे आव्हान होते की, आम्ही सत्तेवर आलो आहोत, एका चळवळीतून आलेलो आहोत........

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना आणखी किती वेळ लागणार आहे ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, विधेयकावर बोलण्यासाठी मर्यादा नसते.

**तालिका सभापती** : मी आपल्याला थांबविले नाही. मी फक्त असे विचारले की, आणखी किती वेळ आपल्याला लागणार आहे ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझे संपले की, मी थांबेल.

**तालिका सभापती** : आपण बिलावर बोलावे, मी तुम्हाला थांबविलेले नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या बिलाला दुरूस्ती सुचविली पाहिजे. परंतु, ते काही पर्याय सुचवीत नाहीत, कोणताही पर्याय देणार नाहीत. शेवटी समाजामध्ये वास्तवाच्या आधारावर काही गोष्टी पुढे येणार असतील तर त्याचे आपण स्वागत केले पाहिजे. प्रत्येकाची काही मते असू शकतात. त्यातील काही पर्याय आपण सुचविले पाहिजेत. परंतु, पर्याय सुचविले जात नाहीत. अशा प्रकारे बिलावर वेळ काढण्यासाठी बोलणे किंवा राजकीय भाषणे आपण शिवाजी पार्कवर देखील करु शकतो, आपण ते नक्की करा. कुणालाही करता येतील. माझ ी अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांचा अभ्यास आहे तर त्यांनी सरकारला ठोस पर्याय सुचविला पाहिजे. त्यांनी सांगावे की, हे करु नका, सरकारचे एवढ्या कोटी रुपयांचे बजेट आहे, त्यामधून शेतकऱ्याला काही देऊ नका, पाटबंधारे प्रकल्पांसाठी काही देऊ नका, विदर्भाला काही देऊ नका आणि त्याऐवजी विद्यापीठे स्थापन करा. परंतु, ते असा पर्याय सांगत नाहीत. मला तर या विधेयकावर डिबेट हवे आहे. एकदा या प्रश्नावर सविस्तर चर्चा झालीच पाहिजे. खऱ्या अर्थाने

...6....



श्री.कपिल पाटील.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

या समाजामध्ये एका बाजूला कमकुवत दर्जाचा माणूस आहे, दलित आहे, मागास आहे, त्यांना पैसा आणि धोरण देऊन सरकारने मजबूत केले पाहिजे. दुसरीकडे असा वर्ग आहे की, ज्याच्या आई,वडिलांकडे पैसा आहे. ते असे सांगतात की, सरकारचा पैसा नको, काही धोरण द्या, मला लंडनला शिकावयास जाण्याची गरज नाही, मी माझ्या पैशाने, याच ठिकाणी शिकतो आणि त्याचबरोबर जे 25 टक्के मागास आहेत, त्यांनाही शिकवून घेण्याचा प्रयत्न करतो. त्यांना शिकण्यास मिळणार आहे. परंतु, आपण जर याला विरोध केला तर तो मागासवर्ग देखील शिकणार नाही.

यानंतर श्री.वि.खर्चे.........

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

75 टक्के लोक येथे शिक्षण घेऊ इच्छितात. त्यासाठी स्व.वसंतदादा पाटील यांनी विना अनुदान तत्वावर शाळा काढण्याचे धोरण आणले होते. या राज्यात ज्यांच्याकडे पैसा आहे, तेच विद्यार्थी परदेशात जाऊन शिक्षण घेऊ शकतात. विना अनुदान तत्वावरील धोरणामागील भूमिका अशी होती की, सर्व विद्यार्थ्यांना राज्यातच शिक्षण मिळाले पाहिजे. परंतु विना अनुदान तत्वावरील शाळांचा सुळसुळाट झाला होता. तसा प्रकार आता हे शासन होऊ देणार नाही. यासंदर्भात मी बृहत आराखडा तयार करणार आहे. इंजिनिअर, मेडिकल याबाबत काही अडचणी नाहीत. परंतु जे कोर्सेस आता विद्यापीठात नाहीत ते आणण्याचा प्रयत्न मी करणार आहे. ज्या कोर्सेसचे शिक्षण विद्यार्थी लंडनमध्ये किंवा इतर ठिकाणी जाऊन घेतात ते कोर्सेस येथे आणण्याचा सरकार प्रयत्न करणार आहे. यासाठी सरकारचा एकही पैसा खर्च करण्यात येणार नाही. या विद्यापीठांना शासकीय दराने भूखंड मिळणार नाही. त्यांना बाजारभावाप्रमाणे भूखंड खरेदी करावा लागेल. यासाठी स्वत:चा पैसा खर्च करावा. असे असले तरी तेथे शिक्षण घेतांना या विद्यापीठांवर शुल्क नियंत्रण समितीचे बंधन कोर्टाच्या नियमाप्रमाणे राहणार आहे. या बाबी सन्माननीय सदस्यांना मान्य नसतील तर त्यांनी पर्यायी सिस्टीम कोणती करता येईल ती सुचवावी, त्यावर चर्चा करण्यास माझी तयारी आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांना मी धन्यवाद देतो. कारण त्यांनी मला थोडी विश्रांती दिली आहे मला देखील थोडी विश्रांतीची गरज होती. ओरडून ओरडून माझा घसा कोरडा झाला होता. मंत्री महोदयांनी अमूल्य सल्ला दिला त्याबाबत मी त्यांचे आभार मानतो. त्यांनी ज्या सूचना व जे प्रश्न उपस्थित केले त्यामुळे आणखी थोडा जास्त वेळ मला लागणार आहे. या विधेयकाच्या व्यतिरिक्त त्या प्रश्नांना देखील उत्तरे दिली पाहिजेत. त्यामुळे त्याबाबतीत मला बोलावे लागणार आहे. सभागृहात विधेयकावर कायद्याने जेवढा वेळ बोलावे लागते तेवढा वेळ मी बोलणार आहे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर बोलले पाहिजे. त्यातून पळवाटा काढून काही फायदा होणार आहे. विधेयकावर बोलतांना पर्यायी सिस्टीम सांगितली पाहिजे. मी भरपूर वेळ थांबावयास तयार आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी थोडे थांबावे, या देशातील गरीब जनता गेली 60 वर्षे थांबलेली आहे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आपण गरीब आहात हे आम्हाला माहिती आहे. स्वत:ची खाजगी कॉलेजेस रत्नागिरी येथे कोणी काढली ती आम्हाला माहिती आहे. तेथील शिक्षकांच्या पगारांचे काय परिस्थिती आहे ती देखील मला माहिती आहे. याबाबत मी माहिती देणार आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी जरूर सांगावे, मी कोणाच्या मागे उभा आहे हे देखील जरूर सांगावे. अपनी खुली किताब है, जोर से बोलो, तुम्ही स्वत:च्याच भरवशावर आमदार झाला व मी माझ्या भरवशावर आमदार झालो आहे. या राज्यात भारतीय जनता पक्षाची सीट 30 वर्षे म्हणजे पाच टर्म त्यांच्याकडे होती, ती सीट मी खेचून आणली आहे. सभापती महोदय, दुसऱ्या वेळी माझ्या विरोधात असाच प्रचार झाला होता.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी वैयक्तिक चर्चा करु नये, विधेयकावर बोलावे. कोणताही वाद निर्माण करु नका. आपणाला विधेयकावर बोलण्यासाठी मी परवानगी दिली आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, जे विधेयक अगोदर पास झाले त्यावर सन्माननीय सदस्य बोलत आहेत, त्यांनी विधेयक क्रमांक 39 वर बोलायला पाहिजे. यांना नुसते राजकारण करायचे आहे, अजिंक्य कोण आहे, हे कोण आहे ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मला राजकारण करायचे आहे, कारण यासाठीच मी सभागृहात आलो आहे. धर्मकारण करण्यासाठी सभागृहात आलो नाही.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, मी राजकारण करण्यासाठी सभागृहात आलो आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, होय, मी राजकारण करण्यासाठी सभागृहात आलो आहे, कारण देशातील राजकारणा एवढी पवित्र गोष्ट कोणतीही नाही, अशी माझी धारणा आहे. या देशाचे संविधान राजकारण करून गरिबांच्या बाजूने उभे राहण्यासाठी सभागृहात येण्याची परवानगी देते. हेच पवित्र राजकारण करण्यासाठी मी सभागृहात आलो आहे. या राजकारणाला कोणी अपवित्र म्हणत असेल तर मला ते मान्य नाही.

...3..



VVK/ प्रथम श्री.रोझेकर.. 15:10

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आपण विधेयकावर बोलणार आहात काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आपले लक्ष विधानपरिषद नियम क्रमांक 51 कडे वेधू इच्छितो. "जर एखादा सदस्य अप्रस्तुत बोलण्याचे किंवा आपल्या स्वत:च्या मुद्दांची किंवा चर्चेच्या वेळी इतर सदस्यांनी उपयोगात आणलेल्या मुद्यांची पुनरुक्ती करण्याचे, त्या सदस्यांचे त्याकडे सभापतींनी लक्ष वेधल्यानंतरही चालू ठेवील किंवा नियम 34 च्या तरतुदींचे किंवा दुसऱ्या कोणत्याही नियमांचे, हेतुपुरस्सर उल्लंघन करीन तर त्यास आपले भाषण थांबविण्याविषयी सभापती निदेश देऊ शकतील."

सभापती महोदय, माझी आपणाला विनंती आहे की, नियम 51 प्रमाणे त्यांनी मागील बिलातील अजिंक्य वगैरेचा उल्लेख केला आहे हे विधेयक पास झाले आहे, त्यावर चर्चा करीत आहेत. या विधेयकावर चर्चा न करता फक्त वेळ काढण्याचे काम सन्माननीय सदस्य करीत असतील तर नियम 51 प्रमाणे आपण त्यांना थांबवावे, तो आपला अधिकार आहे असे मला वाटते.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी कृपया विधेयक क्रमांक 39 वर बोलावे. मी आपणाला बोलण्यास संधी दिलेली आहे. त्या विषयावर बोलावे इतर विषयांचा उल्लेख कृपया करु नका. कोणतीही टीका टिपणी करु नका.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, विधेयक क्रमांक 39 मधील पान क्रमांक 21 "उद्देश व कारणे" यासंदर्भात मी बोलत होतो. यावर बोलत असताना शिक्षण मंत्री महोदयांनी काही प्रश्न उपस्थित केले होते, ते योग्य होते] त्या प्रश्नांचा संदर्भ घेणे हे अप्रस्तुत असेल तर ते मी टाळतो. त्याबाबत मी उत्तर देखील देत नाही. शिक्षण मंत्री बोलल्यावर त्यांना उत्तर देणे चुकीचे ठरते, असे माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांनी सांगितले आहे, ते ज्येष्ठ आहेत] त्यांचा सल्ला मला मान्य आहे. मंत्री महोदयांनी बरोबर मुद्दा काढला आहे. मी मागच्या विधेयकावर बोलत नव्हतो व बोलणार नाही. त्यासाठी मी विधेयक क्रमांक पुन्हा वाचून दाखविले आहे.

सभापती महोदय, सन 2014 चे विधानसभा विधेयक क्रमांक 39 राज्यातील उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्याकरिता फ्लेम विद्यापीठाची स्थापना करणे, त्याचे विधिसंस्थापन करणे व विनियमन करणे यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद

..4..



श्री.कपिल पाटील..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

करण्याकरिता विधेयक, हे अतिशय स्पष्ट आहे, त्यामुळे या संदर्भातच मी बोलणार आहे. विधेयकाचे वर्णन सुरुवातीला प्रिॲम्बल्स मध्ये दिलेले आहे. त्याच्या पलिकडे मी जाणार नाही. मंत्री महोदय श्री.रामदास कदम यांचा मी आभारी आहे, नियम 34 त्यांनी सांगितला तो अगदी बरोबर आहे. अन्य कोणी सदस्यांनी आधीच भाषण केले असेल तर त्याची पुनरुक्ती करता येत नाही. अन्य कोणी सदस्यांनी भाषण केले नसल्यामुळे...गोंधळ.. भाई तुम्ही तरी गरिबाच्या बाजूने बोलला पाहिजे. भाई तुम्ही आमच्या बाजूचे आहात... गोंधळ..

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आपणाला या विधेयकावर भाषण करावयाचे नाही काय ? आपण माझ्याकडे बघून बोलावे, मंत्री महोदयांशी आपण बोलू नका.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या विधेयकावर मला बोलावयाचे आहे, आपण मला संरक्षण द्यावे. मंत्री महोदयांना आपण सांगावे. सभापती महोदय, भारत सरकारच्या आर्थिक सुधारणांच्या संदर्भात मी मघाशी बोलत होतो. त्या सूचना खाजगी क्षेत्राला सहभागी करुन घेण्यासंदर्भातील आहेत. तेथे मतभेदाचा मुद्दा निर्माण होत आहे. या देशाचे नियोजन खाजगी क्षेत्राच्या हाती द्यावयाचे की, सरकारच्या हाती ठेवायचे हा मुद्दा आहे. ज्या मूलभूत हक्कांच्या गोष्टी आहेत त्या किमान खाजगी क्षेत्राकडे देता कामा नये. येथे विकासाचा मुद्दा आहे, इतर देशांशी स्पर्धा करावयाची आहे. जेथे सरकारला मर्यादा आहेत, तेथे खाजगी क्षेत्राला जरूर द्या. माणसांना मूलभूत शिक्षणाचा व मूलभूत गरजांचा अधिकार आहे. त्याचे खाजगीकरण करणे चुकीचे आहे. शिक्षण मंत्री महोदयांनी मघाशी चीन देशाचा उल्लेख केला होता. चीन मध्ये विद्यापीठाचे खाजगीकरण सुरु झ ाालेले नाही. चीन किंवा अन्य देशांमध्ये देखील विद्यापीठांना अधिक सशक्त करण्यात आले आहे. त्यांच्या विद्यापीठांमध्ये आपल्याकडील मुले जाऊन शिकतात. आपणाला आश्चर्य वाटेल की, जागतिक दर्जाच्या विद्यापीठात आपली मुले जावीत त्यांनी ज्ञानार्जन करावे, नवे तंत्रज्ञान अवगत करावे, ते तंत्रज्ञान घेऊन परत आपल्या देशात यावे, यासाठी चीन देशात त्या मुलांना सर्व खर्च दिला जातो व त्यांना सांगितले जाते की, तुम्हाला मोठ्या विद्यापीठात प्रवेश मिळत असेल तुम्ही जरूर जा. अशी सोय चीन देशात करण्यात आलेली आहे. ही पध्दत आपल्या विद्यापीठांकडे उपलब्ध नाही. चीन देशाने हे नव्याने केले असे नसून ही बाब पहिल्यांदा शाहू

..5..



श्री.कपिल पाटील..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराज व सयाजी महाराज यांनी केली आहे. सयाजी व शाहू महाराज नसते तर या देशाचे संविधान करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विदेशात जाऊन शिक्षण घेता आले नसते. विदेशातील सर्वोच्च विद्यापीठात ते शिक्षण घेऊ शकले नसते. त्या काळात सयाजी व शाहू महाराज होते म्हणून ते विदेशात जाऊ शकले. आपण मराठा आरक्षणाची चर्चा करीत होतो, त्या उद्देशिकेमध्ये आरक्षणाबाबत शाहू महाराजांचा आदरपूर्वक उल्लेख केलेला आहे. ही परंपरा महाराष्ट्र राज्याची आहे, चीन देशाची ही परंपरा नाही. महाराष्ट्रात असे विधेयक पारित करताना शाहू महाराजांच्या चौकटीच्या बाहेर जावून चालणार नाही.

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ...

सयाजी महाराजांनी जो रस्ता आपल्याला दाखवला त्या पलीकडे आपल्याला जाता येणार नाही. या विधेयकाच्या उद्देश व कारणे यांच्या निवेदनातील परिच्छेद क्रमांक 2 मध्ये असे म्हटलेले आहे की, "महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षणाच्या संधीमध्ये वाढ करण्यास इच्छुक असल्याने आणि उच्च शिक्षणामधील खाजगी क्षेत्राच्या सक्रिय सहभागास आणि गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्याच्या हेतूने, महाराष्ट्र राज्यातील स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांच्या निर्मितीस उत्तेजन देणे शासनाला इष्ट वाटते. यामुळे राजकोषावर कोणताही वित्तीय भार पडू न देता, उच्च, तंत्र, व्यवसाय व व्यवस्थापनविषयक शिक्षणाचा उत्तम दर्जा साध्य करण्यास राज्याला मदत होईल. तसेच शासनाने अशा स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठाकरिता समुचित व सुयोग्य वातावरणाची तजवीज सुनिश्चित करुन त्याद्वारे राज्यातील उच्च शिक्षणाच्या विकासात एका प्रवर्तकाची भूमिका बजावावी, असा राज्याचा अत्यंत हिताचा देखील विचार केला आहे." सभापती महोदय, इथेच गोम आहे. एका बाजूला उद्देश आणि कारणे यामध्ये असे म्हटलेले आहे की, त्यांना सुयोग्य वातावरण निर्माण करायचे आहे, त्यासाठी सुनिश्चित तजवीज करायची आहे. आपल्या विद्यापीठांनी अशी कोणेतीही व्यवस्था केलेली नाही. नवनवीन तंत्रज्ञान आणि ज्ञानशाखा प्रगत होत असताना त्या प्रगत ज्ञानशाखांसाठी कोणताही निधी उपलब्ध न करता त्या शाखा विनाअनुदानित करायच्या ही आपली भूमिका आहे. पूर्वीचा विनाअनुदानाचा निर्णय चुकीचा होता. खाजगी कॉलेजच्या नावाने तो निर्णय इतका बोकांडी येऊन बसला की, तो खाजगी शाळांपर्यंत येऊन पोहोचला. आज सन्माननीय मंत्री महोदय डॉ. दीपक सावंत यांना त्याबाबतीत आंदोलन करुन इथपर्यंत यावे लागले. त्या विरोधात त्यांनी आंदोलन केले नसते तर ते इथे येऊ शकले नसते. गोरगरीब जनतेच्या बाजूने ते येथे आले. गोरगरीब जनतेला असे वाटले की, आमची बाजू सांगणारे कोणी तरी सभागृहात जायला पाहिजे, आमचेही राजकारण करायला कुणी तरी सभागृहात जायला पाहिजे. त्यामुळे डॉ. दीपक सावंत साहेब या ठिकाणी आलेले आहेत. विनाअनुदानाचा निर्णय या राज्यामध्ये होऊ नये म्हणून आम्ही विरोध केला होता. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शंकररावजी चव्हाण यांनी असा शब्दप्रयोग केला होता की, विनाअनुदान हा राज्याच्या शैक्षणिक धोरणाला कलंक आहे. त्यांनी कठोर भूमिका घेतली होती. त्यांच्यावर त्यावेळी टीका देखील झाली होती. परंतु ते ठाम राहिले. त्यावेळचा रेटा असा होता की, त्यामध्ये



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

फार काही बदल होऊ शकला नाही. पण त्यांचे एक ऋण मान्य केले पाहिजे, ते म्हणजे त्यांनी कॅपिटेशन फी विरोधी कायदा केला. देणगी देऊन प्रवेश घेण्याच्या प्रवृत्तीला लगाम घालण्याचा प्रयत्न शंकरारावजी चव्हाण यांनी केला. त्याबद्दल हे राज्य आणि हे सभागृह त्यांचे ऋण कायम मानत राहील. या विद्यापीठामध्ये प्रवेश घेण्यासाठी पैशाची आवश्यकता आहे.

मी एक उदाहरण सांगतो. या राज्याचा एक मोठा सचिव ज्याचे नाव चांगले आहे, ज्याची प्रतिमा चांगली आहे, ज्याची प्रतिष्ठा मोठी आहे, ते एका ख्यातनाम खाजगी विद्यापीठामध्ये त्यांच्या मुलीसाठी प्रवेश घेण्यासाठी गेले. त्यांना दोन तास बाहेर थांबवून ठेवण्यात आले. त्याबद्दल मला काही म्हणायचे नाही. सभागृहाशी संबंधित नसलेल्या व्यक्तींची नावे घेता येत नाहीत म्हणून त्यांची नावे मी घेत नाही. आतमध्ये बसलेले खाजगी व्हाईस चॅन्सलरने त्यांना बोलावले आणि विचारले की, तुम्ही किती पैसे देणार ? या राज्यातील सचिव असे आहेत की, जे नि:स्पृहपणे काम करतात, ज्यांचे हात बरबटलेल्या कामामध्ये नसतात. ते म्हणाले एवढे पैसे देण्याची माझी ऐपत नाही. त्यांच्या मुलीला प्रवेश नाकारण्यात आला. त्यांची मुलगी पुणे ते मुंबई गाडीमधून रडत रडत आली. या राज्याच्या सर्वोच पदी असलेल्या सचिवांना आपल्या मुलीला पुण्याच्या खाजगी विद्यापीठामध्ये प्रवेश देता आला नाही. ही सचिवांची अवस्था असेल तर या सभागृहामध्ये तुमची आमची टिपणे घेणारी जी मंडळी आहेत, माहिती देणारे सर्व अधिकारी कर्मचारी आहेत, आम्हाला कागदपत्रे आणून देणारे जो शिपाई वर्ग आहे त्यांना तर स्वप्न देखील पहाता येणार नाही. त्यांना विचार सुध्दा करता येणार नाही. त्यांनी त्यांच्या मुलाला सांगून टाकायचे की बाबा रे, तुला 90 टक्क्यापर्यंत मार्क्स मिळवता आले तर मिळव पण त्या विद्यापीठातील कोर्सला प्रवेश मिळाला नाही तर तुला मिळेल त्या कोर्सला प्रवेश घे. तू आयआयटीचे स्वप्न बघू नकोस. तू आटीआयला जा. जी काही नोकरी करायची ती कर. क्लार्कचे असे स्वप्न असते की, मी ज्या मंत्रालयामध्ये क्लार्क म्हणून काम केले त्याच्या पुढच्या पदावर माझा मुलगा किंवा मुलगी गेलेली मला पहाता यावी. या देशातील सामान्य माणूस दुसरे कोणते स्वप्न पहातो ? तो एवढेच स्वप्न पहात असतो की, त्याच्या मुलाने त्याच्या पेक्षा दोन पावले पुढे जावे. जेव्हा त्या सचिवांची कथा मी ऐकली त्यावेळी माझ्या डोळयात पाणी आले. सचिवांची ही स्थिती असेल तर या राज्यातील सामान्य माणूस अशा

..3..

श्री. कपिल पाटील....

विद्यापीठांची दारे सुध्दा ठोठावू शकणार नाही. या विद्यापीठाच्या चौकटीच्या बाहेर बोलायचे नाही असे तुम्ही म्हणता. पण या चौकटीमध्ये तुम्ही आम्हाला येऊच देत नाही. तुम्ही आम्हाला आत येऊ देत नसाल तर आम्ही तुमच्या चौकटी बाबत बोलायचे सुध्दा नाही काय ? बहुमताच्या जोरावर विधेयके पास होत रहातात. पण निष्पाप जीवांचे आवाज या ठिकाणी व्यक्त करण्यासाठी परवानगी देणार नसाल तर हे विधेयक कोणासाठी आणीत आहात ? या खाजगी विद्यापीठांनी काय दिवे लावले ? या देशामध्ये खूप खाजगी विद्यापीठे आहेत. दिल्ली, पंजाब या राज्यामध्ये खाजगी विद्यापीठे आहेत. छत्तीसगडमध्ये खूप खाजगी विद्यापीठे आहेत. छत्तीसगडमधील खाजगी विद्यापीठांची दुकाने टप-या लागाव्यात तशी लागली होती. शेवटी ती विद्यापीठे रद्द करावी लागली. प्रत्येक अधिवेशनामध्ये दोन-पाच विद्यापीठे येतात. ही विद्यापीठे कोणासाठी येतात ? मोठयातल्या मोठ्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश पाहिजे असेल तर 50-60 लाख रुपये मोजावे लागतात. खिशात पैसे असतील तर दार ठोठवायचे आणि प्रवेशाची इच्छा करायची. रेडियोलॉजीला प्रवेश घेण्याचा दर 2 कोटी रुपये आहे. ज्या मतदारसंघातून मी येतो, ज्या मतदारसंघातील लोक आम्हाला मतदान करतात, ते सामान्य मतदार 60-70 लाख रुपये घेऊन मेडिकल कॉलेजचा दरवाजा ठोठावू शकत नाहीत. माझ्या मुलाने डॉक्टर व्हावे, इंजिनियर व्हावे असे शिपायाला का वाटू नये ? हे अश्राप आवाज तुम्हाला ऐकायचे नसतील तर ऐकू नका. तुम्हाला पर्याय पाहिजे असेल तर तुम्ही तुमची विद्यापीठे मजबूत करा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना मघाशीच सांगितले की, या विषयावर आम्हाला प्रामाणिकपणे डिबेट करावयाचे आहे.या राज्यातील जे गरीब आहेत, जे "नाही रे" वर्गातील आहेत त्यांच्यासाठी अधिकाधिक निधी आणि धोरणे देऊन त्यांना ताकदवान करावयाचे आहे. त्याच वेळी या राज्यामध्ये असा एक वर्ग आहे, मग तो छोटा वर्ग असेल, तो माझ्याकडे पैसे मागत नाही, तो माझ्याकडे केवळ धोरण मागत आहे. त्याच्यावर आम्ही अन्याय करायचा काय ? सन्माननीय सदस्यांनी सांगावे की, गरीब शिकणारा नसेल तर ज्याच्याकडे पैसे आहेत त्यानेही शिकले नाही तरी चालेल. माझे म्हणणे हे आहे की, मार्क्सवादावर यापेक्षाही जास्त भावनिक भाषण मी देखील करु शकतो. शेवटी या व्यवस्थेमध्ये आपल्याला व्यावहारिक पर्याय

..4..



MSS/ पूर्वी श्री.व्ही.खर्चे 15:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

काढायचा आहे की नाही ? अशा प्रकारे भावनिक भाषणे आम्ही देखील करु शकतो. पण रडून पर्याय पुढे येत नाही. या समाजातील सामान्य माणसाची क्षमता ओळखून त्याला पूर्ण ताकद देऊन आपल्याला पर्याय निर्माण करावयाचा आहे. या विद्यापीठांची स्थापना झाल्यानंतर गरिबांना या विद्यापीठामध्ये आपण प्रवेश देऊ शकू. पण पर्याय काही द्यायचा नसेल तर जैसे थे स्थिती राहील. म्हणून पर्यायी व्यवस्थेबाबतच्या सूचना सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील करु इच्छित असतील तर त्या त्यांनी कराव्यात. त्या सूचनांचे आम्ही निश्चितच स्वागत करु. आम्ही त्याचीच वाट पहात आहोत. मागील विधेयकाच्या वेळी देखील त्यांचे हेच भाषण आम्ही ऐकले होते. नवीन काही सूचना त्यांच्याकडून येत नाहीत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, जोवर दरवाजा उघडला जात नाही तोवर तो आम्ही ठोठावत राहाणार. जोवर गरिबांचा आवाज ऐकला जात नाही तोवर गरिबांबद्दल बोलत राहाणार. आता मंत्री महोदयांनी सांगितले की, ठराविक वर्गासाठी आम्हाला कॉलेजेस काढायची आहेत. या राज्यातील 87 वसतिगृहातील आदिवासी विद्यार्थी गेले चार दिवस उपोषणाला बसले होते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...........

परवा रात्री आयुक्त तेथे गेल्यानंतर त्यांचे उपोषण संपले. काय मागणी होती? कोणती नवीन मागणी केली नव्हती.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य टिपिकल भाषण करीत आहेत.

श्री.कपिल पाटील : शासनाला आदिवासींचा आवाज ऐकावा लागेल. विद्यापीठातील विद्यार्थ्यांबद्दल मी बोलत आहे. मला तुम्ही रोखू शकत नाही......(अडथळा)....का ऐकत नाही. ऐका ना.

श्री.विनोद तावडे : आम्ही चर्चेला तयार आहोत.

श्री.कपिल पाटील : आदिवासी उपोषणाला बसले होते, त्यांना शिष्यवृत्ती मिळाली नाही.

(सत्ताधारी पक्षातील अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना बिलावर बोलावयाचे नाही का? मी चार वेळा सांगितले आहे. बिलावर बोलण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे. परंतु to the point बोलावे. ट्रॅक सोडून बोलले जात असल्यामुळे वाद निर्माण होतो. आपण बिलाच्या अनुषंगाने मुद्दा मांडावा. अनावश्यक बोलल्यामुळे वाद निर्माण होतो.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, बिलातील तरतूद सांगतो. या बिलामध्ये जी तरतूद करण्यात आली आहे ती काय आहे ते वाचून दाखवितो. "अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत राज्य सरकार हस्तक्षेप करु शकेल, भूमिका घेऊ शकेल." सन्माननीय शिक्षणमंत्र्यांनी जो प्रश्न उपस्थित केला, किमान त्याबाबत स्पष्टीकरण देण्याचा माझा अधिकार आहे. स्पेसिफिक उदाहरण देतो. शासनाने या बिलामध्ये ॲडमिशनची व्यवस्था केली आहे.

श्री.विनोद तावडे : बिलामध्ये वसतिगृहाचा उल्लेख आहे का?

श्री.कपिल पाटील : वसतिगृहातील विद्यार्थ्यांना या विद्यापीठामध्ये शिकायचे नाही का?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे नेहमीचे आहे. टिपिकल भाषण केले जाते. नवीन मुद्दा येत नाही, पर्याय सुचविला जात नाही. हा वेळ काढण्याचा प्रकार आहे.

श्री.कपिल पाटील : हिंमत असेल तर तुम्ही बिल पास करा. जोपर्यंत हिंमत आहे तोपर्यंत बोलत राहणार.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सभागृहामध्ये बिलावर आपले विचार मांडण्याची जी पध्दत आहे तिचे स्वागतच केले जाते. कोणताही कायदा संमत होत असताना तो अधिक सुदृढ

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

24-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC.2

SGB/ 15:30

श्री.गिरीष बापट........

व्हावा, त्यात पळवाटा असू नयेत ही शासनाची इच्छा असते. माननीय सदस्य शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत, अभ्यासू आहेत. मंत्री महोदय वारंवार हेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत की, मुद्दे जे असतील ते मांडावेत. खाजगी स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठाची पर्यायी व्यवस्था करीत आहोत, ती केली नाही तर काय होईल हेही मंत्री महोदयांनी सांगितले आहे. माननीय सदस्यांनी निश्चितपणे सूचना करावी. अन्यथा तास न् तास चर्चा सुरु राहील. नियम तयार करीत असताना आपल्याकडून लेखी सूचना केली तर त्याचा समावेश केला जाईल. हा वाद मंत्री महोदय आणि माननीय सदस्य यांच्यातील नसून सामान्य विद्यार्थी केंद्रबिंदू मानून त्याच्या उच्च शिक्षणासाठी केलेला हा कायदा आहे. याचा अर्थ आपण जे बोलाल त्याचा स्वीकार केला जाणार नाही असा होत नाही. चर्चेची दारे कधीही खुली असतात. आपला एखादा दुसरा मुद्दा असेल तर तो प्रेस करावा. इतर सूचना लेखी स्वरुपात आल्या तर त्यांचा समावेश केला जाईल एवढे आश्वासन देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्या क्षमतेबद्दल, अभ्यासाबद्दल काही म्हणणे नाही. शेवटी प्रत्येक गोष्टीला कालमर्यादा असते. त्यांचे अभ्यासपूर्ण भाषण आम्ही ऐकले आहे. मुद्दा शिल्लक असेल तर तो मांडावा किंवा लेखी स्वरुपात द्यावा. मी मंत्री महोदयांशी चर्चा घडवून आणतो. आपण एकत्र बसून चर्चा करु आपल्या ज्ञानाच्या प्रत्येक कणाचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी करु एवढे आश्वासन देतो.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्यमंत्री यांनी ज्या पध्दतीने सभागृहात मांडणी केली, असे वातावरण सरकारच्या बाजूने असेल तर सभागृह स्मूथपणे चालेल. मी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांकडून त्यांचे कौतुक ऐकले आहे. मी वसतिगृह शब्द वापरला. या बिलामध्ये तो शब्द आहे. अनुसूचित जाती जमातीच्या संदर्भात सुध्दा उल्लेख आहे. वेळ जाऊ नये म्हणून मी वाचन करु इच्छित नाही. मला संपूर्ण बिल वाचावे लागेल. मी शिक्षणमंत्र्यांना सांगू इच्छितो की, या बिलामध्ये वसतिगृहाच्या संदर्भात उल्लेख आहे. विद्यापीठामध्ये प्रवेश घेतलेल्या, कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची, निर्वाह भत्त्याची रक्कम वर्ष संपत आले तरी मिळालेली नाही. म्हणून लोक उपोषणाला बसले. हा प्रश्न त्यांना काही देता येईल का यासाठी मांडला आहे. त्याला दिले पाहिजे. ज्याच्याकडे काही नाही, त्या नाही रे वर्गाला द्यायचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही का? द्यायचे म्हणून सांगायचे आणि द्यायला विलंब लावायचा. ती तुमची चूक नाही. मागच्या सरकारची चूक होती. तुम्ही त्यांच्या पध्दतीने काम करु नका एवढी कळकळीची विनंती आहे.

...3..



श्री.कपिल पाटील........

माननीय संसदीय कार्यमंत्री ज्या पध्दतीने बोलले ती पध्दत सभागृहात सुरु झाली तर सभागृह स्मूथपणे चालेल. माझ्याबद्दल आक्षेप घेतला जातो आणि मी उत्तर द्यायचे नाही असे चालणार नाही.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी बिलावर बोलावे. बोलत असताना सभापतींच्या आसनाकडे पाहून मुद्देसूद बोलावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. मी आपला सल्ला कायम लक्षात ठेवीन. या बिलामध्ये म्हटले आहे की, "सतत बदलणा-या वित्तीय विषयक व आर्थिक परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या गरजा भागविता याव्यात, जनतेच्या मनात विश्वास निर्माण करता यावा म्हणून महाराष्ट्र शासनाने हा अभ्यासक्रम सुरु केला" असे म्हणून स्वत:ची पाठ थोपटून घेतली आहे. स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांच्या संदर्भात काय स्थिती आहे?

2डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ........

महोदय, या विधेयकात विद्यार्थ्यांच्या गरजा भागविता याव्यात असा उल्लेख केला आहे मी त्या अनुषंगाने असा प्रश्न विचारु इच्छितो की, कोणत्या विद्यार्थ्यांच्या गरजा या विधेयकाच्या माध्यमातून शासन भागविणार आहे ? आमचे शिक्षण अबाधित रहावे म्हणून आम्हाला भारत सरकारकडून जी शिष्यवृत्तीची रक्कम मिळते ती वेळेवर मिळावी या मागणीसाठी परवा जी मुले उपोषणाला बसली होती त्यांचे म्हणणे होते की, जर आम्ही वेळेवर पैसे भरले नाहीत तर आम्हाला परीक्षेला बसू दिले जाणार नाही व तशा नोटिसेस आम्हाला दिल्या आहेत. या अनुसूचित जाती, जमाती व ओबीसीच्या मुलांनी शेवटी कोणाकडे जावे हा प्रश्न आहे. तसेच शासनाने सांगावे की आणखी अशा किती विद्यापीठांना परवानगी देणार आहे याचाही खुलासा झाला पाहिजे.

महोदय, ज्याप्रमाणे अमुक इतक्या शाळांना परवानगी द्यावयाची असा बृहत आराखडा शासनाकडून जाहीर केला जातो मग त्यानुसार अर्ज मागविले जातात. पण अशा विद्यापीठांना अथवा शाळांना मान्यता दिल्यानंतर त्यांना अनुदानाचे सूत्र लावणे, त्यांना मूल्यांकनापर्यंत आणण्याचे यामध्ये 20 वर्षे निघून जातात तोपर्यंत त्या शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या डोक्यावरचे केस उडून जातात, अशा प्रकारे या राज्यातील प्राथमिक शिक्षणाचा गाडा रुतलेला आहे. या रुतलेल्या व अर्धमेल्या प्राथमिक शिक्षणाच्या गाड्यात या विधेयकाच्या माध्यमातून उच्च शिक्षण घालण्याचा प्रयत्न केला आहे. मग ही विद्यापीठे कोणाची व किती चालविणार हा देखील महत्वाचा प्रश्न आहे. मुंबईच्या आजू-बाजूला तसेच पुण्याच्या परिसरात अशी विद्यापीठे निघत आहेत. देशातील सर्व विद्यार्थी या भागात यावेत असा त्यामागचा हेतू असेल. पण मी या निमित्ताने शासनाला प्रश्न विचारतो की, जी खाजगी महाविद्यालये मुंबई आणि पुणे, नागपूर औरंगाबाद सारख्या ठिकाणी आहेत त्यातून किती गरीब मुलांना प्रवेश देण्यात आलेला आहे, किती मुलांना वरच्या कोर्ससाठी सामावून घेण्यात आले ? मी मघाशी सांगितले की, रेडिऑलॉजीसारख्या पोस्ट ग्रॅज्युएट डॉक्टरच्या कोर्ससाठी दीड ते दोन कोटीची लॉटरी निघाली आणि एवढी रक्कम गरीब भरुच शकणार नाहीत. अशा प्रकारे गरिबांना या विद्यापीठांतून प्रवेश देण्यात येत नसेल, त्यांच्या गरजांचा विचार शासन करीत नसेल तर अशा कायद्याचा उपयोग काय, हे मला म्हणावयाचे आहे. याचा अर्थ यापुढील शिक्षणासंबंधीची शासनाची धोरणे हे वरच्या वर्गासाठीच असतील आणि ज्यांना आपण मध्यमवर्गीय म्हणतो अथवा तो मोठी स्वप्न पाहत असेल म्हणून स्वत:ला मध्यमवर्गीय म्हणवून घेत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ........

असेल, त्यांची देखील अशा विद्यापीठातून प्रवेश घेण्याची ऐपत नसते. त्याचे कारण म्हणजे तो जे कमावतो त्यात घराचा हप्ता, दवापाण्याचा खर्च आणि मुलांचे शिक्षण एवढा खर्च वजा झाला तर तो उच्च शिक्षणाबाबत विचारही करु शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यानंतर कनिष्ठ आणि गरीब यांची दुरवस्था तर न सांगण्यासारखी आहे.

महोदय, पुण्यात नुकताच हमालांचा सर्व्हे झाला. या हमालांनी त्यासाठी आंदोलने आणि चळवळी केल्या होत्या तेव्हा त्यांना बरे पैसे मिळायला लागले. तरी देखील झालेल्या सर्व्हेनुसार हमालांमध्ये कुपोषण सुरु असल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. या हमाल व माथाडी कामगारांना पुरेसे व सकस जेवण मिळत नसल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. याचे कारण विचारले असता अशी माहिती मिळाली की ते ज्या पध्दतीचे काम करतात त्यासाठी लागणाऱ्या कॅलरीज मिळण्यासाठी पुरेसा आहार मिळत असल्याने, त्यांची उपासमार होत नसल्याने त्यांच्यात कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. त्यांना विचारले असता त्या हमालांनी सांगितले की, आमच्या मुलांच्या शिक्षणासाठी आम्हाला पैसे वाचविणे आवश्यक आहे. या देशातील जी माता देवाला प्राप्त करण्यासाठी उपवास करते असे आपण म्हणतो ते तसे नसून माझ्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून ती उपवास करीत असते. मग तिच्या मुलांचा विचार का केला जात नाही. या विधेयकात बदलत्या आर्थिक परिस्थितीचा विचार केला आहे, याबद्दल मला खरे तर आश्चर्य वाटले. अर्जुनसेन गुप्ता यांनी काढलेल्या निष्कर्षानुसार या देशात 26 कोटी लोक असे आहेत की जे उच्च शिक्षण घेत आहेत. पण उर्वरित 80 कोटी जनतेचे काय याचा विचार मात्र केला जात नाही. 83 कोटी लोक दररोज अर्ध पोटी राहतात आणि यासाठी त्यांची क्रयशक्ती 20 रुपयांपेक्षा जास्त नाही. बाजारात जायचे म्हटले तरी 20 रुपयापेक्षा जास्त पैसे खिशात नसतील तर अशा व्यक्ती बाजारात जाऊ शकत नाहीत. त्यातील 40 कोटी जनता अशी आहे दररोज अर्धपोटी झोपतात आणि त्या 40 कोटीमध्ये मुलांसाठी अर्धपोटी राहणाऱ्या "माय" ची संख्या जास्त आहे. शासन या विधेयकातून वरच्या वर्गाच्या लोकांची सोय करीत आहे पण खालच्या वर्गाला मिळणाऱ्या शिष्यवृत्तीची सोय कोण करणार आहे, त्याच्या फी व पुस्तकांची व्यवस्था कोण करणार आहे, त्याला कॉलेजमध्ये येण्यासाठी जो प्रवास करावा लागतो त्या प्रवासाची सोय कोण करणार आहे, ग्रामीण भागातून म्हणजेच मालेगांवहून नाशिकला येण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवासाच्या बाबतीत कोणती सोय करणार

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

c

श्री. कपिल पाटील ........

आहात, या राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत असतात त्याला वेगवेगळी कारणे असली तरी त्यातील एक कारण त्याच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवू शकत नाहीत हे सुध्दा एक कारण आहे, अशा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या मुलांच्या शिक्षणाचा कोणता विचार शासन करणार आहे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर किंवा संत गाडगे महाराज विद्यापीठ, अमरावती आणि गोंडवाना विद्यापीठांमध्ये सर्व सुविधा शासन देण्याचा विचार का करीत नाही, ज्या उच्च शिक्षणासाठी मुलांना परदेशात जावे लागते, आयआयटी आणि आयआयएम सारख्या संस्थांमध्ये इतर राज्यांमध्ये जावे लागते ती सुविधा या विद्यापीठांमध्ये का उपलब्ध करुन देत नाही, नवनवीन तंत्रज्ञानाच्या शाखा जगभरात युरोप, चीन, अमेरिका या देशांमध्ये उघडल्या जात आहेत त्या सुविधा पुरोगामी म्हणविल्या जाणाऱ्या आपल्या देशात प्रामुख्याने राज्यात का निर्माण केल्या जात नाहीत हे खरे प्रश्न आहेत.

महोदय, यासंदर्भात मंत्री महोदयांनी मागणी केल्याप्रमाणे काही उपाय सुचविणार आहे. त्यात पहिला उपाय म्हणजे उच्च शिक्षण देणाऱ्या विविध तंत्रज्ञानाच्या शाखा ज्या जगभर उघडत आहेत त्या आपल्या देशात उघडल्या गेल्या पाहिजेत. त्यानंतर या विद्यापीठांमधील सर्व ज्ञान शाखांचा विस्तार करताना जगभरात जे जे शिक्षण मिळत असेल ती संपूर्ण सुविधा शिक्षणावर होणारा नको तो खर्च थांबवून या शाखांमधून मिळाली पाहिजे, जेणेकरुन राज्यातील मुलांना बाहेरील देशात उच्च शिक्षण घेण्यासाठी जाण्याची गरज राहणार नाही यादृष्टीने प्रयत्न करावेत. तसेच तिसरा उपाय म्हणजे ज्या आयआयटी सारख्या संस्थांमध्ये मुलांना प्रवेश मिळत नाही त्या मुलांसाठी अशा संस्थांमध्ये प्रवेश मिळावा म्हणून जी तयारी आवश्यक असते ती करण्यासाठी बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करुन दिले पाहिजे. त्यानंतर शिक्षणाची वाढती गरज लक्षात घेऊन शिक्षणासाठी बजेटमध्ये आवश्यक तरतूद करावी. जोपर्यंत बजेटमध्ये शिक्षणावरील खर्चाचे प्रतिबिंब पडत नाही तोपर्यंत आम्ही बोलतच राहणार. याचे कारण सध्याच्या परिस्थितीत शिक्षणावर फक्त 2.38 टक्के इतक्या खर्चाचीच तरतूद असते ती वाढून आता 3 टक्क्यापर्यंत आली असावी. ती देखील विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याचा निर्णय तसेच महागाई भत्याची रक्कम द्यावयाची

..4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील......

होती म्हणून ही टक्केवारी वाढलेली आहे. आता जुलै 2014 पासून वाढलेल्या महागाई भत्त्याचा तर शासन विचारही करीत नाही. अशा प्रकारे महागलेल्या शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी निर्वाह भत्ता शासन देणार की नाही, अशा सर्व गोष्टींचा खुलासा झाला पाहिजे.

यानंतर श्री. भारवि ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

कोठारी कमिशनने बजेटमध्ये शिक्षणासाठी 6 टक्के तरतूद करावी असे सुचविले आहे. त्याप्रमाणे आपण तरतूद केली तर आम्ही आपल्या पाठीशी उभे राहू. असे केले तर सगळे प्रश्न सुटतील. मग आपण 100 खाजगी विद्यापीठे आणली तरी त्यावर काहीही चर्चा करणार नाही. चंद्रपूर, गडचिरोली येथील गरीब मुलाला कधीही कुठे प्रवेश मिळेल, कास्तकारांच्या, कामगारांच्या, हमालांच्या मुलाला पाहिजे तेथे प्रवेश मिळेल त्या दिवशी आम्ही काहीही मागणी करणार नाही. मग हवी तेवढी विद्यापीठे आपण काढावित. काही कोर्सेससाठी आमची किमान व्यवस्था करण्यात यावी. आपण मराठा आरक्षण लागू केले आहे. कुणबी समाजाची मुले प्रवेश घेऊ पाहत आहेत त्यांच्या पैशाची सोय कुठे करणार आहात ? कास्तकार तर रोज आत्महत्या करीत आहेत. त्याबद्दल आपण काहीच का बोलत नाही. असे असताना आपण म्हणतात की, पर्याय सुचवावेत. समाजातील उपेक्षित घटकाच्या शिक्षणाकरिता गैरसोय निर्माण होणार नाही किंवा सार्वजनिक हितास, शैक्षणिक धोरणास हानीकारक ठरेल अशी कोणतीही गैरव्यवस्था होणार नाही याची खात्री कायद्यान्वये शासन घेणार आहे. आपण या विधेयकातील तरतुदी पहाव्यात. आज आपल्या हातात काय आहे ? आज आपल्या हातात काहीच नाही. फी नियंत्रण, विद्यापीठाचा दर्जा, मुलांचा प्रवेश हा आपल्या हातात नाही. आपण मुक्त परवाना देत आहात. आज आपण पूर्णपणे बाजार मांडलेला आहे. किमान शिक्षणाचा तरी बाजार मांडू नये. किमान तेवढे तरी थांबवावे. आपण तर अजून दोन पावले पुढे जात आहात. त्यामुळे आज गरिबांच्या शिक्षणामध्ये अडथळा येत आहे. तो आम्ही का थांबवायचा नाही. तो न थांबवता आपण म्हणता की, गैरव्यवस्था होणार नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, बाजार मांडलेला आहे असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. तो बाजार कुठे झालेला आहे हे त्यांनी स्पेसिफाय केले पाहिजे. त्यांनी टू द पॉईंट बोलले पाहिजे. सन्माननीय सदस्यांना अशा प्रकारचे बिलावर बोलता येणार नाही. त्यांनी बाजार कुठे झाला हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. बिलावर कितीही वेळ बोलता येते याची आम्हाला कल्पना आहे. शिक्षणाचा बाजार कुठे मांडला आहे हे त्यांनी सांगावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, 2.49 वाजता आपले भाषण सुरू झाले आहे. आता 3.53 झाले आहेत. आपणाला एक तासापेक्षा अधिकचा वेळ दिलेला आहे. आता आपण 5-10 मिनिटांमध्ये मुद्दे मांडून आपले भाषण पूर्ण करावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय सदस्य बिलाच्या बाहेरील बोलत असतील तर त्यांना म.वि.प.नियम 34 अन्वये थांबविण्याचा आपल्याला अधिकार आहे. तो अधिकार आपण वापरावा अशी आमची विनंती आहे.

**तालिका सभापती** : बिलावर कितीही वेळ बोलता येते याची सर्वांना कल्पना आहे. पण किती वेळ बोलावे याला देखील मर्यादा आहेत. आपले अजून काही मुद्दे राहिले असतील तर ते सन्माननीय सदस्यांनी 5-10 मिनिटात मांडावेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, धन्यवाद. सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम यांनी कुठे कुठे शिक्षणाचा बाजार सुरू आहे हे सांगावे असे सांगितले आहे. मी त्यांचा फार आभारी आहे. त्यांनी मला अधिक बोलावे अशी विनंती केली आहे व त्याबद्दल मी अत्यंत ऋणी आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बिलावर बोलावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी मुद्यावरच बोलणार आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण एक तासा पेक्षा जास्त वेळ बोलला आहात. आता मी आपणाला शेवटची 5-10 मिनिटे देत आहे. या अवधीमध्ये आपण आपले महत्त्वाचे मुद्दे मांडावेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी मुद्याच्या पलीकडे जात नाही. मला अशी अपेक्षा होती की, मंत्री महोदय बिल मांडताना बिलामागची शासनाची भूमिका सांगतील आणि तशी या सभागृहाची प्रथा आहे. मग बोलण्याचा प्रसंग कमी येतो.

श्री.रामदास कदम : माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांनी पाच वेळा शासनाची भूमिका सांगितलेली आहे. त्यामुळे आताच काही वेळा पूर्वी मुख्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे झोपलेल्या व्यक्तीला जागे करता येऊ शकते मात्र झोपेचे सोंग घेणाऱ्याला जागे करू शकत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी या विधानाशी सहमत आहे. झोपलेल्यांना उठविता येते. मात्र झोपेचे सोंग घेणाऱ्याला उठविता येत नाही. असे आताच सन्माननीय मंत्री श्री.रामदास कदम व काही वेळा पूर्वी माननीय मुख्यमंत्री म्हणाले ते अगदी बरोबर आहे. मी एक सारखे दार ठोठावत आहे. पण कोणीच उठत नाही. मला वाटले की, खरोखर झोपले असतील. पण कोणीच झोपले नाही. त्यांनी झोपेचे सोंग घेतले आहे. सोंग घेतलेला माणूस बोलतो पण उठत नाही ही अडचण आहे. माझ्या या विधानाशी सन्माननीय सदस्य श्री.सोले हे सहमत आहेत असे दिसतात. या विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये नमूद करण्यात आले आहे की, "सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 या अन्वये एक सोसायटी म्हणून नोंदणी केलेल्या आणि महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 चा 29 अन्वये न्यास म्हणून नोंदणी केलेल्या फाऊंडेशन फॉर लिबरल अँड मॅनेजमेंट एज्युकेशन सोसायटी, पुणे यांनी लव्हाळे, ता.मुळशी, पुणे येथे फ्लेम विद्यापीठ स्थापन करण्याच्या परवानगीसाठी अर्ज केला आहे. शासनाने काढलेल्या इरादापत्रास अनुसरून उक्त सोसायटीने सादर केलेला अनुपालन अहवाल आणि या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या तपासणी समितीचा तपासणी अहवाल विचारात घेतल्यानंतर उक्त प्रायोजक मंडळाने दिनांक 29 मे 2013 रोजीच्या उक्त शासन निर्णयाच्या आवश्यकतांची पूर्तता केली असल्याबाबत राज्य शासनाची खात्री पटली आहे. म्हणून फ्लेम विद्यापीठ नावाचे एक स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करणे व ते विधिसंस्थापित करणे इष्ट वाटले. सचिवस्तरीय समितीने पूर्ततांचे सत्यापन केल्यानंतर आणि तशा आशयाची अधिसूचना काढल्यानंतरच हे विद्यापीठ कार्यरत होईल." त्यामुळे कोणती पूर्तता करण्यात आली आहे हे सभागृहाला कळण्याचा अधिकार आहे. याचे विश्वस्त कोण आहेत हे सभागृहाला कळण्याचा अधिकार आहे. त्या विद्यापीठाचे कोणते कर्तृत्त्व आहे हे सभागृहाला कळण्याचा अधिकार आहे. त्यांनी जागतिक पातळीवर कोणते संशोधन केले आहे हे सभागृहाला कळण्याचा अधिकार आहे. येथे केम्ब्रिज, ऑक्सफर्ड, एमआयटी विद्यापीठ येऊ घातले आहे काय ? मी येथे लातूर, पुण्याच्या एमआयटीसंबंधी बोलत नाही. अमेरिकेच्या टेक्सास येथे एमआयटी विद्यापीठ असून ते येऊ घातले आहे काय ? ज्या विद्यापीठाने संशोधनाद्वारे जगाला देणगी दिली आहे, जगातील मानव जातीचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

जीवन अधिक सुखकर व्हावे म्हणून प्रयत्न केले आहे अशी ही विद्यापीठे आहेत. पण आपल्या देशातील असे कोणते खाजगी विद्यापीठ आहे त्यांनी असा प्रयत्न केला आहे? आमच्या गरिबांच्या, कास्तकारांच्या मुलांना ॲडमिशन देण्याची गोष्ट दूर राहिली. आता जे येऊ घातलेले विद्यापीठ आहे त्यांनी कोणते संशोधन केले आहे ? या विद्यापीठाने संशोधन करावे अशी अपेक्षा आपण व्यक्त केली आहे.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, जेव्हा आपण माझ्या दालनात आला होता तेव्हा आपण मला दहा मिनिटे या बिलावर बोलावयाचे आहे, शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा विषयावर बोलावयाचे आहे, गोरगरीब समाजाकरिता बोलावयाचे असल्याने आपण अनुमती द्यावी अशी विनंती केली होती. तालिका सभापती श्री.रामनाथ मोते यांनी आपल्याला 2.49 वाजता आपले भाषण सुरू झाले आहे, आता 3.53 झाले आहेत असे सांगितल्याचे मी देखील ऐकले आहे. तेव्हा माझी इच्छा आहे की, आपण पाच मिनिटांमध्ये आपले भाषण पूर्ण करावे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपल्या आदेशाच्या बाहेर जाणार नाही. मघाशी यामध्ये जो वेळ गेला तेवढा वेळ मला वाढवून द्यावा, अशी माझी आपणास विनंती आहे. माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी थोडा जास्त वेळ घेतला.

सभापती महोदय, या सभागृहात बसून काही बोलता येत नाही. जर बसून "पास्का" हा शब्द वापरला जात असेल आणि तो बसून बोलला जात असेल तर त्याबाबत मी फक्त खेद व्यक्त करु शकतो. दुसरे काही बोलू शकत नाही. कारण मला माझी सभ्यता अशी सांगते की, मी फक्त खेदच व्यक्त केला पाहिजे, त्या पलीकडे मी बोलता कामा नये. मी मुद्याला धरुन बोलत आहे एवढेच सांगतो आणि ती खंत व्यक्त करतो.

सभापती महोदय, या सदनाला काही गोष्टी समजण्याचा अधिकार आहे की नाही एवढीच माझी अपेक्षा होती. पण त्या गोष्टी मांडल्या गेल्या नाहीत. ते लोक कोण आहेत हे समजले पाहिजे. मघाशी गोंधळात एक विधेयक मंजूर झाले त्यावेळी माझा आवाज आपल्यापर्यंत पोहोचला नाही. माझ ा आवाज मोठा नाही ही माझी चूक होती. हे विधेयक मंजूर करण्याच्या स्टेजला येईल त्यावेळी आपण मला पोल द्यावा हे मी अगोदरच आपणास सांगत आहे. अन्यथा गोंधळामध्ये ते मंजूर होईल.

**सभापती** : आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे आणि सर्व काही प्रेमाने होत आहे. आपण सांगितले होते की, मी दहा मिनिटांत भाषण संपविणार आहे, परंतु आपण एकूण 63 मिनिटे बोलला आहात.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, पोल मागणे हा सभागृहाचा अधिकार आहे. कोण कोणाच्या बाजूने आहे हे एकदा स्पष्ट झाले पाहिजे.

सभापती महोदय, विद्यापीठाची गुणवत्ता,अध्यापन आणि प्रशिक्षण यांच्या दर्जाबद्दल कोणते नियंत्रण राहणार आहे याबाबत विधेयकात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. आपणास ती व्यवस्था विधेयकामध्ये करावी लागेल. आपणास ही व्यवस्था बाहेरुन करता येणार नाही. कारण खाजगी विद्यालये आणि महाविद्यालये ज्या पद्धतीने काम करतात ती पद्धती पाहिली की, आपल्या लक्षात येईल की, बाजाराशिवाय त्यांनी दुसरे काहीही केलेले नाही. गुणवत्तेच्या नावावर भ्रष्टाचार आणि खेळखंडोबा सुरुआहे. पैसे देऊन विकत घेतलेल्या जागेतून डॉक्टर निर्माण होणार



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

असतील, इंजिनिअर निर्माण होत असतील तर ते डॉक्टर्स किंवा इंजिनिअर्स जेथे कोठे काम करतील तेथील रुग्ण आणि पूलशाबूत राहतील काय ? अशा डॉक्टरकडे पेशंट गेल्यास तो प्रथम त्याचा खिसा कापेल आणि तो कापलेला खिसा पाहून पोट कापलेले बरे असे रुग्णाला वाटेल. इतकी मोठी फी डॉक्टर घेतो. जर एक कोटी रुपये देऊन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला जात असेल तर तो पेशंटकडून ती रक्कम वसूल करणार. म्हणजे यातून गरिबांच्या शोषणाला आणखी एक मुक्त परवाना मिळत आहे असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, हे नवीन सरकार गरिबांच्या बाजूचे नाही. श्रीमतांच्या बाजूचे आहे. हे नवीन सरकार शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्यांच्या बाजूचे आहे. हे सरकार छत्रपती शाहू महाराजांच्या बाजूचे नाही, महर्षी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा गांधी, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या बाजूचे नाही. हे सरकार भांडवलदारांच्या, मोठ्या वर्गाच्या, ज्यांच्याकडे वर्षानुवर्षे ज्ञानाची परंपरा आहे, ज्यांच्याकडे पैसा खेळता आहे त्यांच्या बाजूचे हे सरकार आहे. मघाशी शिक्षण मंत्र्यांनी सांगितले की, त्यांची सोय करण्यासाठी आहे. असे असेल तर मी या विधेयकाचा धिक्कार करतो. या विधेयकाचा निषेध करतो. आपण मला आदेश दिल्यामुळे मी थांबतो. परंतु या विधेयकाच्या बाबतीत माझा असा प्रयत्न होता की, हे विधेयक पुढील अधिवेशनापर्यंत प्रलंबित रहावे. जेणेकरुन गरिबांच्या बाजूने जेवढे करता येईल तेवढे करावे. श्रीमंतांची मुजोरी जेवढी थांबविता येईल तेवढी थांबविण्यात यावी. पण मी कमजोर आहे, हे मला मान्य आहे. सदनाच्या मताच्या पलीकडे मला जाता येत नाही. पण मी येथे सांगू इच्छितो की, आपण वाईट रस्त्याने जात आहोत. हे राज्य चांगल्या मार्गाने चाललेले नाही. आज विनाअनुदानातून जो राक्षस उभा राहिला आहे, ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी काल-परवा केला होता. संघटनेसाठी आणि वकिलांना फी देण्यासाठी अंशकालीन कर्मचाऱ्यांनी पाच-पाच हजार रुपये दिले होते अशी नवीन दुकाने चालत आहेत. आपण आणखी नवीन दुकाने सुरु करणार आहोत. आपणास ही दुकाने बंद करुन गोरगरिबांचे शिक्षण चालू ठेवायचे आहे की, त्यांना ताकद द्यायची हा प्रश्न आहे. या विधेयकाला मी विरोध करतो. अशाप्रकारचे विधेयक आणल्याबद्दल मी सरकारचा धिक्कार करतो आणि येथेच थांबतो.

------------

श्री.विनोद तावडे ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक 14 वर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी विचार मांडले. माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी मला विचारले की, सन्माननीय सदस्यांचे सविस्तर भाषण झालेले आहे तेव्हा आपणास उत्तर देण्यास किती वेळ लागेल. मी त्यांना सांगितले की, मला फक्त तीन मिनिटे लागतील. कारण त्यांनी तेच तेच मुद्दे फिरवून सांगितलेले आहेत. मला अपेक्षा होती की, शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या व्यक्तीकडून काही तरी ठोस सूचना येतील. आम्ही कॉलेजपासून एकत्र आहोत, परंतु आमचे विचार वेगळे असतील. परंतु मला एवढेच कळते की, आहे त्या रचनेमध्ये, आहे ते देऊ शकतो. जे देऊ शकत नाही त्याला कशी ताकद द्यायची यासाठी त्यांनी पर्याय काहीच सुचविले नाही. एक सामाजिक संवेदना असते त्या आधारावर बोलायचे. परंतु अशा गोष्टीने सरकार चालविता येत नाही. आयुष्यभर विरोधात बसावे लागते. पण विरोधात असताना काही ठोस उपाय सुचवावयाचे असतात.

सभापती महोदय, आपणास आठवत असेल की, ज्यावेळी खासगी विद्यापीठ विधेयक चर्चेला आले होते त्यावेळी ते विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते. त्या संयुक्त समितीवर प्रा.बी.टी.देशमुख, आताचे मुख्यमंत्री असलेले श्री.देवेंद्र फडणवीस आणि मी त्या समितीवर होतो. त्यावेळी सरकारने जी खाजगी विद्यापीठे येतील त्यांना मान्यता देण्याचे ठरविले होते. त्यावेळी मी आणि आताचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक विद्यापीठाच्या निर्मितीचे वेगळे बिल आणले पाहिजे अशी दुरुस्ती सुचविली होती. कारण प्रत्येक विद्यापीठाची निर्मिती होताना त्याची तपासणी विधिमंडळाच्या दोन सर्वोच्च सभागृहातून झाली पाहिजे याची काळजी आम्ही त्यावेळी घेतली होती. परंतु आम्ही गरिबांना अंधारात लोटत आहोत. त्यांना कुठे तरी धक्क्याला लावत आहोत ही वर्षानुवर्षे टिपीकल पद्धतीने वापरण्यात येणारी भाषा कुठेतरी बदलली पाहिजे. आपण आपल्या डोळ्यावरील झ ापडे उघडली पाहिजेत.

सभापती महोदय, विधेयकाचा उद्देश आणि कारणे वाचून खूप भाषणे करता येतात. आपण हे विधेयक लक्षपूर्वक वाचले तर या विधेयकातील खंड 35 मध्ये नमूद केले आहे की, "अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

यांमधील विद्यार्थ्यांकरिता व अपंग विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठांमधील प्रवेशासाठीच्या जागा ह्या, राज्य शासनाच्या धोरणानुसार राखून ठेवण्यात येतील" आपण हा मजकूर वाचल्यानंतर सन्माननीय सदस्यांचे अर्धे भाषण असेच केले हे दिसून येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात भरमसाठ फीचा मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत मी खंड 36 मध्ये केलेली तरतूद वाचून दाखवितो "विद्यापीठास, वेळोवेळी आपल्या फी ची संरचना तयार करता येईल आणि राज्य शासनाने त्या प्रयोजनासाठी गठित केलेल्या समितीच्या मान्यतेसाठी ती पाठविता येईल" याचा अर्थ मनमानी होणार नाही. एखादा चांगला बदल होणार असेल तर आपण तो स्वीकारला पाहिजे.

सभापती महोदय, मला असे वाटते की, चळवळीतील तरुण पिढीने आपली कवाडे उघडली पाहिजेत, परंतु दुर्दैवाने तसे झालेले नाही. पण पक्षाची मदत बदलली आहे. पण कवाडे तीच राहिली आहेत. माझी अपेक्षा अशी आहे की, विचार कोणाचाही असो, पण त्यामध्ये सामान्य माणसाचे हित हा आपला उद्देश आहे आणि ते हित साधत असताना केवळ विरोधाला विरोध करता कामा नये. जर काही नवीन येणार असेल आणि ते आपल्या फायद्याचे असेल तर त्याचा आपण स्वीकार केला पाहिजे. जर 50 टक्के पर्यंतच्या आरक्षणामध्ये सामान्य विद्यार्थ्याला न्याय मिळणार असेल तर तो देऊ नका असे म्हणून चालणार नाही. विनाअनुदान पद्धती आली त्यावेळी नाही म्हणणाऱ्यांना आज विचारले पाहिजे की, आज तो ओबीसी विद्यार्थी शिकू शकला असता काय ? आपल्यासारख्या सदस्यांचे त्यावेळी सरकारने ऐकले असते तर आज जे विद्यार्थी लाखोंच्या संख्येने शिकत आहेत त्यांना आपल्या झापड लावलेल्या विचारामुळे वंचित रहावे लागले असते. ते झापड काढण्याचे काम आम्ही करीत आहोत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 16:10

श्री.विनोद तावडे.....

त्यामुळे सामान्य माणसांची, दिनदुबळ्यांची चिंता करणे गरजेचे आहे. पण ही चिंता करीत असताना असे भासविले जाते की, हमालांच्या मुलांसाठी शिक्षणाची दारे बंद केली आणि सर्व काही खाजगी संस्थांना दिले. महोदय, मागच्या सरकारमध्ये तत्कालीन मंत्री श्री.राजेश टोपे यांनी जे विधेयक मांडले होते आणि त्या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी जे भाषण केले होते तेच भाषण आज पुन्हा ऐकायला मिळाले. सन्माननीय सदस्यांनी त्यावेळी मात्र विधेयकाला इतक्या जोरात विरोध केला नव्हता. पण आता संघ विचाराची मंडळी सत्तेत आल्यामुळे पूर्वीच्या तुलनेत विरोध वाढला काय माहीत नाही. महोदय, मला सांगायचे आहे की, या पध्दतीने ज्यावेळी या ठिकाणी मांडले जाते की,....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझी हरकत आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, मागच्या वेळी मी विधेयकाला एवढा विरोध केला नव्हता. माननीय मंत्र्यांना चुकीच्या पध्दतीने बोलण्याचा पूर्ण अधिकार आहे. माननीय मंत्र्यांना त्यांचे मत मांडण्याचा अधिकार आहे. त्यांनी काय मत मांडावे हा माझा अधिकार नाही. सरकारचे मत माननीय मंत्र्यांनीच मांडले पाहिजे याबद्दल शंका नाही. परंतु त्यांना सन्माननीय सदस्यांबद्दल हेत्वारोप करता येणार नाही. माननीय मंत्र्यांनी असा हेत्वारोप केला की, मागच्या वेळी मी विधेयकाला अशा प्रकारचा विरोध केला नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, मी त्यावेळी सुध्दा इतक्याच जोरात विरोध केला आणि पोलही मागितला होता. त्यावेळी आपण सरकारच्या बाजूने होता. परंतु मला याचे आश्चर्य वाटत नाही. मला असे वाटले होते की, आपली भूमिका थोडी बदलेल. माझी विनंती आहे की, माननीय मंत्र्यांनी सन्माननीय सदस्यांवर हेत्वारोप करु नये.

श्री.विनोद तावडे : महोदय, सरकारच्या बाजूने कोण आहे आणि काय आहे हे दुनियेला माहीत आहे. कोण कोणाच्या मदतीने येतो यात मला जायचे नाही. कारण या विधेयकात शिक्षणाचा विचार आहे. जी गोष्ट आम्हाला योग्य वाटली, ती काँग्रेसने आणो की समाजवाद्यांनी आणो, आम्ही तिला पाठिंबा देतो. कारण ती समाजाच्या हिताची असते. एखादी गोष्ट कोणी आणली तर तिला विरोध केलाच पाहिजे अशी झापडे लावून आम्ही कधी काम केले नाही किंवा तसेच काम करण्यास आम्हाला कोणी शिकवलेही नाही.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

महोदय, येणाऱ्या काळात आम्ही राज्यात आयआयएम सुरु करणार आहोत. अशा संस्था आणू नका असे सांगून चालणार नाही. महोदय, देशाचे माननीय पंतप्रधान आदरणीय श्री.नरेंद्र मोदीजी यांनी इयत्ता 8 वी नंतरच्या स्कील डेव्हलपमेंटचा विषय सुरु केला तेव्हा असे प्रश्न उपस्थित केले गेले की, आता आमचा बहुजन समाज तुम्ही हमाल करणार काय, टर्नर करणार काय, फीटर करणार काय ? मी त्यांना सांगू इच्छितो की, जगात काय सुरु आहे, जग कुठे चालले आहे, याचा आपण कधी विचार करणार आहात की नाही ? इयत्ता 8 वी नंतरच्या विद्यार्थ्यांकडे कोणतेही स्कील नसल्यामुळे तो उपाशी राहतो याची या लोकांना चिंता नाही. वास्तविक पाहता अशा मुलांना स्कील दिल्यानंतर चार पैसे त्याच्या खिशात येतील. ज्यांना इयत्ता 10 वी मध्ये 90-92 टक्के गुण मिळाले आहेत त्यांना माननीय श्री.नरेंद्रजी मोदी स्कील देत नाहीत. त्याला त्याचे पुढचे शिक्षण घेण्याची संधी आहे. परंतु ज्याची आवड या पध्दतीच्या व्यावसायिक शिक्षणाकडे आहे त्यांच्यासाठी स्कील उपलब्ध करुन दिले तर ते स्वत:च्या पायावर उभे राहून सन्मानाने जीवन जगू शकतील. तो सन्मानाने जगला तर त्याच्या मनाची, विचाराची दारे उघडतील. परंतु ही मंडळी आपल्याला सोडून तिकडे जातील म्हणून काही जण जाणीवपूर्वक या कामांना विरोध करतात, त्याची उदाहरणे आम्ही या सभागृहात पाहत आहोत. आम्ही अल्पसंख्याक समाजाच्या बाबतीत म्हटले की, अगोदरचे सरकार इतकी वर्षे सत्तेत होते, त्यांनी या समाजाला काय दिले ? त्यांना टायरचे पंक्चर काढण्याचे दुकान दिले, नाही तर भंगाराचे दुकान दिले. या मुलांना स्कील उपलब्ध करुन देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे केले तर ते स्वत:चे आयुष्य वेगळ्या पध्दतीने जगू शकतात. परंतु तो जगला तर गरिबांचा विचार मांडण्याची आपली जी मक्तेदारी आहे, किंबहुना दुकानदारी आहे ती संपेल, या भीतीने अनेक जण या पध्दतीची मांडणी अशा ज्येष्ठांच्या सभागृहाच्या व्यासपीठावरुन करतात तेव्हा चिंता वाटते.

महोदय, विद्यापीठांकडून जवळजवळ 32 च्या वर अर्ज आले होते. सर्व विद्यापीठांच्या बाबतीत विधेयक आणता आले असते. मी स्वत: प्रत्येक विद्यापीठाचे 5-5 तास सादरीकरण बघितले. त्या विद्यापीठांना काही बदल करायला लावले. आजपर्यंत नाही असे वेगळ्या प्रकारचे शिक्षण देता आले पाहिजे या संदर्भातील अभ्यास करण्यास त्यांना सांगितले. यामध्ये माझी मेहनत

..3..



SJB/ पूर्वी श्री.अजित.... 16:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि प्रामाणिकपणा आहे. परंतु समोरच्या बाकावरुन अशा प्रकारचे सवंग भाषण झाल्यानंतर त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका आली असे वाटते आणि त्यामुळे माणूस दुखावतो. त्यानंतर कुठे तरी अशा प्रकारचे वक्तव्य येते. मला कोणाला दुखवायचे नाही किंवा अमुक एका वर्गाला मदत करायची असे नाही. पण मी उपाशी आहे म्हणून तू खायचे नाही, ही मानसिकता बदलावी लागेल. या सरकारकडून जो उपाशी आहे त्याला काही तरी देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. पण मी उपाशी आहे म्हणून तू का खातो, असे म्हणणे योग्य नाही. आम्ही एकाचे काढून दुसऱ्याला देत नाही. महोदय, मी तर म्हणेन की, विधानसभा किंवा विधानपरिषद सभागृहात या विषयावर एकदा मोकळेपणाने चर्चा झाली पाहिजे. कारण अशा प्रकारच्या विचारातून बाहेर आणण्याची या समाजाला गरज आहे. हे सर्व करीत असताना त्यातून आपण समाज मागे तर नेत नाही ना, याचा सुध्दा विचार केला पाहिजे. या निमित्ताने मी सांगतो की, आरक्षणामध्ये ही मुले आल्यानंतर 'नाही रे' वर्गातील किमान 40-50 टक्के मुलांना संधी मिळणार आहे. पूर्वीच्या सरकारने अनुसूचित जाती, इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शुल्काची प्रतिपूर्ती केली तसा निर्णय उद्याच्या काळात या सरकारकडून झाला पाहिजे, या बाबतची सूचना सन्माननीय सदस्यांच्या भाषणात आली नाही. अशा प्रकारची सूचना सन्माननीय सदस्यांच्या संपूर्ण भाषणात कोठेही नाही. जर सकारात्मक मनाने माणूस बोलत असेल तर तशी सूचना करु शकतो. परंतु सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारची सूचना केली नाही.

महोदय, एखाद्या विधेयकाला पाठिंबा म्हणून नव्हे तर त्या विधेयकाचे जेव्हा खरे विश्लेषण केले जाते त्यावेळी सकारात्मक सूचना येतात. पण या ठिकाणी सकारात्मक सूचना केल्या नाहीत. उलट झापड लावून झोडझोड सरकारला झोडपले. कारण उद्या वर्तमानपत्रात रकाने भरले तर अहवालाच्या माध्यमातून ते दाखवायला मोकळे. मी सांगू इच्छितो की, मी कोणतेही काम अहवालासाठी करीत नाही. कारण माझ्याकडून आज एखादे काम होऊ शकले नाही तर ते उद्या होईल. असो.

महोदय, ज्यावेळी 'विनाअनुदान' हा शब्द आला त्यावेळी वसंतदादा यांना नाव ठेवणारी जी मंडळी होती त्यांनी धन्यवाद मांडायला पाहिजे होते. परंतु तशा प्रकारचे धन्यवाद मांडले नाहीत. शेवटी बहुजनाचा माणूस जेव्हा शिकतो तेव्हा कधी कधी त्यांचा विषय मांडणाऱ्याच्या पोटात दुखते.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

कारण बहुजन समाजातील माणूस शिकला आणि पुढे गेला तर उद्या आपले कोण ऐकणार, अशी भीती त्यांना वाटत असते. मी त्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही आता घाबरु नका. कारण जग आता उघडे झाले आहे. महोदय, या संदर्भात अनेक पध्दतीने प्रयत्न झाले. परंतु शेवटी काश्मीरमध्ये सुध्दा दुसऱ्या राष्ट्रीय पक्षापेक्षा भारतीय जनता पक्षाला जास्त मते मिळतात. यावरुन लोकांचे मन किती उघडे झाले हे समजते. त्यामुळे आता झापडे लावून राहता येत नाही.

महोदय, विधेयकाच्या माध्यमातून आम्ही अशी विद्यापीठे आणत आहोत. शिवाय आयआयटी आणि आयआयएम आणत आहोत. केंद्र सरकारने त्यांच्या अर्थसंकल्पात घोषित केल्याप्रमाणे मानांकन पध्दतीनुसार नागपूरमध्ये आयआयएम सुरु करण्याचे ठरविले आहे. राज्य सरकार येत्या काळात नागपूर येथे लवकरच आयआयएम सुरु करेल. वास्तविक पाहता राज्यात संभाजीनगर, पुणे, नवी मुंबई, रायगड या ठिकाणी आयआयएम सुरु करण्याची मागणी होती. परंतु मानांकन पध्दतीचा अभ्यास केल्यानंतर त्यात नागपूर पात्र ठरले. त्यामुळे राज्यातील पहिले आयआयएम नागपूर येथे होणार आहे. नजीकच्या काळात संभाजीनगर, पुणे किंवा अन्य शहरांमध्ये आयआयएम व्हावे अशी अपेक्षा आहे. पुणे येथे आर्कीटेक्चरबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली आहे. या माध्यमातून सांगू इच्छितो की, आमचे शासन समतोल विकासाचा विचार करीत आहे.

महोदय, माझी सभागृहाला विनंती आहे की, या विधेयकाच्या माध्यमातून 'नाही रे' वर्गाच्या खिशातून काढून घेऊन ते दुसऱ्यांना देत आहोत असे नाही. उलट 'आहे रे' च्या खिशात जे आहे तेच काढून त्याला देत आहोत. फक्त हे करण्यासाठी नियमांची थोडी जोड लावत आहोत. या माध्यमातून 'नाही रे' वर्गातील 35-40 टक्के लोकांना तेथे बसविण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे मी पुन्हा एकदा सभागृहाला विनंती करतो की, सभागृहाने या विधेयकाचे स्वागत करुन विधेयकाला पाठिंबा द्यावा व हे विधेयक विचारात घ्यावे.

प्रश्न मतास टाकून एकमताने संमत....

श्री.कपिल पाटील : महोदय, माझा या विधेयकाला विरोध असल्यामुळे आपण हे विधेयक एकमताने नव्हे तर बहुमताने संमत करावे.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मला वाटते एकदा मी समोर गेल्यानंतर पुन्हा मागे येणे हे संसदीय परंपरेनुसार योग्य नाही.

श्री.कपिल पाटील : महोदय, माझी विनंती आहे की, हे विधेयक एकमताने मंजूर करता कामा नये.

श्री.विनोद तावडे : महोदय, आपण पुढे गेला आहात हे ठीक आहे. परंतु सन्माननीय सदस्यांचा या विधेयकाला विरोध असेल तर हे विधेयक एकमताऐवजी बहुमताने संमत करण्यास आमची काहीच हरकत नाही.

**सभापती** : ठीक आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 50 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-39 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2014 चे वि.स.वि.क्रमांक-39 संमत झाले आहे.

----------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा "दिनांक 31 मार्च, 2013 रोजी संपलेल्या वर्षाचा आर्थिक क्षेत्र अहवाल क्रमांक 5" व "स्थानिक संस्था अहवाल क्रमांक 6" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. रवींद्र वायकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई यांचा सन 2011-2012 व 2012-2013 या वर्षांचे वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : विधेयकाला अधिसंमती

**सभापती** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी अतिरिक्त सचिव वाचून दाखवतील.

अतिरिक्त सचिव : खालील विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाली. :-

सन 2011 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 10 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, 2011

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

अतिरिक्त सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक 6(ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 181 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेली निवेदने कृपया छापावीत.)

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती विषयी केलेला आरक्षण कायदा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने रद्द करणे याबाबत सर्वश्री हेमंत टकले, सुनील तटकरे, प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ. रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : केंद्र सरकारने शेड्युल्ड 'के' अंतर्गत शेकडो औषधे जीवनावश्यक औषधांच्या यादीत टाकली असल्याने साठेबाजांकडून औषधांचा साठा करण्यात येणे याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. गिरीष बापट (अन्न व औषध प्रशासन मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी**. : मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील रस्त्यांवर सेवासुविधांचे जाळे पसरविण्यासाठी खोदलेल्या रस्त्यांवरील चर बुजविण्यासाठी देण्यात आलेल्या कंत्राटात दोन वेळा फेरफार करून कंत्राटाची किंमत वाढविणे याबाबत श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : अंध, अपंग, मूकबधिर व कुष्ठरोगी विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या राज्यातील कर्मशाळा शिक्षकांचे निवृत्ती वेतन शासनाकडून नाकारले जाणे याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. राजकुमार बडोले (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : रायगड जिल्ह्यातील अलिबाग सार्वजनिक बांधकाम विभागामधील अलिबाग, पेण, पनवेल, उरण, कर्जत, खालापूर या तालुक्यांमध्ये अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडूनही खड्डे भरण्याचे काम पूर्ण न होणे याबाबत श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. चंद्रकांत पाटील (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : वालधुनी नदीत टाकाऊ रसायन टाकण्यात येणे याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. रामदास कदम (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : शासनाने साधनसामुग्री खरेदीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी तीन लाख रूपयांपेक्षा अधिक रकमेसाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करण्याचा निर्णय घेणे याबाबत श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. चंद्रकांत पाटील (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..11

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सुशिक्षित बेरोजगार संस्थांना मिळणारे अनुदान बंद केलेले असणे याबाबत श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : नागपूरमधील कपिलनगर येथील महानगरपालिकेच्या हिंदी उच्च प्राथमिक शाळेच्या आवारातील भिंत कोसळून चौथीमध्ये शिकणाऱ्या बालकाचा मृत्यू होणे याबाबत श्री. संजय दत्त वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..13

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : चंद्रभागा नदीत मोठ्या प्रमाणात प्रदूषण होणे याबाबत श्री. दीपकराव साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : शासकीय आदिवासी आश्रमशाळा व खाजगी संस्थांच्या आश्रमशाळा यांमध्ये शासनाकडून दुजाभाव करण्यात येणे याबाबत श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. विष्णू सवरा (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : गेवराई (जि.बीड) तालुक्यातील वीज वितरण व्यवस्थेतील अनेक कामे प्रलंबित असणे याबाबत श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : राज्यातील लोकायुक्त व उप लोकायुक्त पद रिक्त असल्यामुळे राज्यातील भ्रष्टाचाराची हजारो प्रकरणे प्रलंबित असणे याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ. रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..17

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभाग यांमधील महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा गट 'ब' मधील सहायक अभियंता (स्थापत्य) श्रेणी-2 मधील काही अभियंत्यांच्या सेवा त्यांच्या मूळ नियुक्तीच्या दिनांकापासून नियमित करण्यात येणे याबाबत श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. गिरीष महाजन (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..18

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : पुणे शहरात वाहतुकीच्या दळणवळणाचा प्रश्न गंभीर होणे याबाबत श्री. अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..19

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शाळांचे पुनर्मूल्यांकन करणे.

**मु.शी.** : शाळांचे पुनर्मूल्यांकन करण्यासंबंधी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन.

श्री. विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

सभापती महोदय, सन्माननीय शिक्षक आमदार सर्वश्री रामनाथ मोते, नागो पुंडलिक गाणार, श्रीकांत देशपांडे आणि इतर मंडळी मला शाळांच्या फेर पुनर्मूल्यांकनाच्या संदर्भात भेटली होती. शाळांचे फेर पुनर्मूल्यांकन सुरू आहे. बहुतांश शाळांचे फेर पुनर्मूल्यांकन पूर्ण झाले आहे. काही शाळांचे फेर पुनर्मूल्यांकन झाल्यानंतर माझ्याकडे अशी माहिती आली की, त्यातील काही शाळांमध्ये थोडी गडबड सुरू आहे. शाळांचे पुनर्मूल्यांकन सरसकट न करता, काही सिलेक्टेड माहिती आली आहे आणि अजूनही काही माहिती गोळा होत आहे, त्याचेही पुनर्मूल्यांकन व्हावे, अन्यथा होऊ नये, असे मी आदेश दिले आहेत.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**संसदीय सभ्याचार आणि शिष्टाचार आचारसंहिता पुस्तिकेबाबत**

**सभापती** : मी एक घोषणा करीत आहे.

संसदीय कार्य प्रणालीमध्ये विधानमंडळाच्या सन्माननीय सदस्यांना सभागृहाच्या कामकाजात सहज, वेळोवेळी काही संकेत, रीतिरिवाज, प्रथा, परंपरा पाळणे आवश्यक आहे. प्रथा व परंपरा पाळण्याच्या दृष्टीने सन्माननीय सदस्यांना या बाबी माहिती असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता, संसदीय सभ्याचार आणि शिष्टाचार आचारसंहिता ही पुस्तिका तयार करण्यात आली असून सर्व सन्माननीय सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात येत आहे.

----

..21

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सन्माननीय विरोधी पक्षनेते व विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले सभागृहात प्रवेश करतात.)

**<u>नथुराम गोडसे यांच्या पुस्तकासंबंधी निवेदन करण्याबाबत औचित्याचा मुद्दा</u>**

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, काल सभागृहात औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात नथुराम गोडसे यांच्या एका पुस्तकासंबंधी माननीय मुख्यमंत्री निवेदन करतील, असे आश्वासन सरकारच्या वतीने देण्यात आले होते. आज सभागृहाचे कामकाज संपत आहे. परंतु, अजूनपर्यंत त्या संदर्भातील निवेदन करण्यात आलेले नाही. एवढी आपण नोंद घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आताच मला ही माहिती मिळालेली आहे. आपले आदेश झालेले असल्यामुळे तातडीने निवेदन ठेवण्याची व्यवस्था करण्यात येईल.

----

..22

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सत्र काळातील कामकाजाचा आढावा

**सभापती** : महाराष्ट्र विधानपरिषद, पाचवे (हिवाळी) अधिवेशन, 2014. दिनांक 8 डिसेंबर, 2014 ते दिनांक 24 डिसेंबर, 2014 या सत्र काळातील कामकाजासंबंधीची सांख्यिकीय माहिती मी आपल्यासमोर ठेवत आहे. हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्र काळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकींची संख्या 13 आहे. प्रत्यक्षात झालेले कामकाज 75 तास 50 मिनिटे आहे. माननीय मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ 23 मिनिटे आहे. अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ 22 तास 20 मिनिटे आहे. रोजचे सरासरी कामकाज 5 तास 50 मिनिटे आहे. एकूण आलेले तारांकित प्रश्न 2624 आहेत, स्वीकृत प्रश्न 863 आहेत, सभागृहात तोंडी उत्तरित झालेले तारांकित प्रश्न 57 आहेत. प्राप्त झालेल्या नियम 93 च्या सूचना 131 आहेत, स्वीकृत सूचना 55 आहेत, निवेदन झालेल्या सूचनांची संख्या 17 आहे. औचित्याचे मुद्दे मांडण्यात आलेल्या सूचना 46 आहेत. प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचना 869 आहेत, मान्य झालेल्या लक्षवेधी सूचना 227 आहेत, चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचना 46 आहेत. विशेष उल्लेखाच्या 179 सूचना प्राप्त झाल्या, त्यातील 57 सूचना मांडण्यात आल्या. नियम 97 अन्वये 3 अल्पकालीन सूचनांवर चर्चा झाली. नियम 46 अन्वये 2 निवेदने करण्यात आली. शासकीय विधेयके संमत झालेली संख्या 11 आहे. नियम 260 अन्वये 3 प्रस्तावांवर चर्चा झाली आहे. अर्धा तास चर्चा प्राप्त सूचनांची संख्या 147 आहे, मान्य इ ालेल्या सूचनांची संख्या 90 आहे आणि चर्चा झालेल्या सूचनांची संख्या 11 आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली आहे.

----

..23

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

**सभापती** : मी जाहीर करतो की, महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 9 मार्च, 2015 रोजी विधान भवन, मुंबई येथे बोलवावे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे.

----

**पृ.शी./मु.शी.** : सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपले आहे. आता मी सत्र समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

"भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2) उप खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी चे. विद्यासागर राव, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल आणि त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

----

यानंतर राष्ट्रगीत झाले.

(संध्याकाळी 4.29 वाजता सत्र संस्थगित झाले.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही